
शनिवार । २२ मार्च १९८० । ७५ पैसे

# माणूस



३०० वर्षांपूर्वी चाकण आणि आसपासच्या ८४ गावांनी एक पराक्रम इतिहासात नोंदवला होता. शाहिस्तेखानाच्या मोगली सैन्याशी चाकण-चौऱ्यांशी त्यावेळी शर्थीने झुंजले होते.

**अशीच झुंज, असाच चिवटपणा यावेळी श्री. शरद जोशी आणि त्यांच्या शेतकरी संघटनेने दाखवून शेतकरी क्रांतीचे एक नवे पर्व सुरू करून दिले आहे.**

**या पर्वाची थोडी ओळख....** **पृष्ठ १**

## शिवाय....

**अस्वस्थ आसाम लेखांक तिसरा**
**मुंबई वार्ता**
**इत्यादी**

# सप्रेम नमस्कार

■ दि. १६ फेब्रु. १९८० च्या माणूसच्या अंकातील अगदी मुखपृष्ठावरील 'नारायणपूर' शीर्षकाखालील लिखाण वाचले. लेखकाच्या कुशलतेचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे! घटनेचे केवळ काही अंश निवडून व्यंजनेच्या साहाय्याने वाचकांच्या डोळ्यांसमोर अगदी निराळेच चित्र उभे करणे कसे शक्य आहे, याचे हे लिखाण म्हणजे एक नमुनेदार उदाहरण आहे. अगदी सुरुवातीलाच लेखक म्हणतो, 'उत्तर प्रदेशातील नारायणपूरचे दुःख आता वेगळेच आहे!' म्हणजे तिथे भयानक मारहाण झाली, काहींची हाडंही मोडली, लुटालूट झाली, त्याचं दुःख आता गावकन्यांना नाही. प्रत्येक महिला पोलिसी अत्याचारांना बळी पडली हा लेखकाच्या मते फक्त 'गवगवा' असल्याने तेही त्यांचे दुःख असण्याचे कारण नाही. 'बरेच जण पोलिसी अत्याचाराच्या धाकाने अगोदरच कुठे कुठे गाव सोडून पळालेले होते,' तेव्हा स्वाभाविकच लुटालुटीखेरीज इतर दुःखे त्यांच्या वाट्याला येणंच शक्य नव्हते. त्यांचे दुःख फारच वेगळे होते आणि ते कोणते? राजकारण्यांनी या घटनेचे भांडवल केलेले असल्यामुळे गावकन्यांना निराळीच चिंता उत्पन्न झाली होती. गावातील साऱ्या महिलांवर बलात्कार झाल्याचा बभ्रा झाला असल्याने त्या वेळी गाव सोडून गेलेल्या एका कुंभाराला आपल्या मुलीचे लग्न आता मोडते की काय, ही चिंता व्याकूळ करीत होती. हीच चिंता व्यक्त करताना एका हरिजन महिलेचा कंठ दाटून आला. एवंच ही घटना पंतप्रधानांनी भेट देण्याइतकी खास महत्त्वाची नव्हती हा कुणालाही तर्क करता आला असता. तरीही पंतप्रधान इंदिरा गांधी स्वतः धावल्या! आता नारायणपूरला झालेली ही घटना आठ–दहा दिवसानंतर एक कम्युनिस्ट कार्यकर्ता गोवारी प्रसाद याने एका हिंदी वृत्तपत्राला कळविली. त्या वृत्तपत्राने पिच्छा पुरवून तो प्रश्न उत्तर प्रदेश विधानसभेत उपस्थीत केला. अत्याचार पोलिसांनीच केले याचा गौप्यस्फोट एका आमदारानेही केला. तरी उ. प्र. मुख्य मंत्री बनारसीदास गुप्ता यांनी ते साफ नाकारले. हे प्रकरण एका ट्रान्सपोर्ट लॉरीखाली दोन लहान मुलांची पोशिंदी एक म्हातारी ठार झाल्याने निर्माण झाले. गावकन्यांच्या हट्टामुळे ट्रान्सपोर्ट मालकाने त्या लहान मुलांच्या पोटापाण्यासाठी ४००० रु. द्यायचे कबूल केले; पण त्याने ते पोलिसांच्या स्वाधीन केले, इत्यादी बातम्या इंदिराजींच्या कानी आल्या असल्या तरी काय त्यांनी स्वतः जायचे? बेलचीला भयंकर अत्याचार झाल्यावरही आपले निवासस्थान न सोडणाऱ्या पंतप्रधान गांधी–भक्त मोरारजी देसाईंचा कित्ता गिरविण्याऐवजी इंदिराजी स्वतः जातात म्हणजे काय? बरं, नारायणपूरहून एखादं शिष्टमंडळ आलं असतं गाऱ्हाणं सांगायला तर त्यांना कसं उत्तर द्यायचं आणि आपल्या निःस्पृहतेचा डिंडिम वाजवायचा हेही माजी पंतप्रधानांनी अनेक वार दाखवून दिलं होतंच. तरी इंदिराजी तडक नारायणपूरला गेल्या. बरं गेल्या त्या संजयच्या आग्रहाखातर! आता हे बाहेर येणार नाही, हे सोडा; पण स्वतःच्या 'मनानं' गेल्या असत्या तर नक्कीच आता झालं ते होतं ना. संजय आला, असेल खासदार म्हणून निवडून; पण आईला सल्ला द्यायचं काय त्याचं वय आहे? स ल्ला द्या य चा व यो वृ द्धां नी! संजयने या असल्या उचापती केल्याच नसत्या तर पवनारमहर्षींना काळजी लागायचं काही कारण होतं का? बरं तर बरं, श्री. वसंतराव साठे तिथे होते योगायोगाने! नाही तर मोठा उत्पात झाला असता, नाही का? आणि इकडच्या या स्त्रीमुक्तिसंघटना! एव्हाना धमाल उडवून द्यायला हवी होती; पण पहावं तर गप्प. सत्यं शिवं सुंदरम्च्या वेळचं त्यांचं अवसान कुठे गेलं? स्त्रीच्या अब्रूचा वापर केल्यानेच रामायण–महाभारत घडलं येवढं तरी लक्षात घ्यायचं की नाही?

या लेखकमहोदयांना 'माणूस'च्या त्याच अंकाच्या पृष्ठ एकवरील एक शीर्षक उद्धृत करून विनंती करावीशी वाटते, 'न बुद्धिभेदम् जनयेत्'

र. वि. सोमण

२० फेब्रुवारी कल्याण

[मागील अंकातील यासंबंधीचा खुलासा पहावा. नारायणपूरची घटना आता वर्तमानपत्रांतून एकदम अदृश्यच का व्हावी? नक्कीच यात प्रथमपासून राजकारण घुसडले गेले होते. आणि हे निदर्शनास आणणे हा त्या १६ फेब्रुवारी अंकाच्या मुखपृष्ठावरील लिखाणाचा मुख्य हेतू होता–सं.]


**साप्ताहिक माणूस**

**वर्ष : एकोणिसावे**
**अंक : त्रेचाळीसावा**
**२२ मार्च १९८०**
**किंमत : ७५ पैसे**

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**
वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
**१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९**

# जेव्हा शेतकरी जागा होतो, संघटित होतो....

चाकणचे कांदा आंदोलन म्हणजे ग्रामीण विकासाचा, शेतकरी क्रांतीचा एक पुढचा, महत्त्वाचा टप्पा. अनेक दृष्टिकोनातून या आंदोलनाचा अभ्यास व्हायला हवा. जरी सध्या हे आंदोलन तात्पुरते स्थगित झालेले असले तरी. 'ग्रामायन'चे एक पूर्णवेळ कार्यकर्ते नामदेव माळी आंदोलन पाहायला म्हणून गेले आणि त्यात प्रत्यक्ष ओढलेच गेले. इतका हा प्रवाह सुरुवातीला वेगवान आणि जोरकस होता. त्यांचे टिपण खाली प्रथम दिले आहे. पुण्याच्या ज्ञान प्रबोधिनीचे एक कार्यकर्ते अभय जांभेकर यांनाही हा उठाव असाच स्पर्श करून गेला. दुसरे टिपण त्यांचे. शिवाय आंदोलनाचे शिल्पकार श्री. शरद जोशी यांच्या विचारांचा मागोवा घेणारा पत्रकार विजयकांत साळुंके यांचा समारोप.

३०० वर्षांपूर्वी चाकण-चौऱ्यांशी मोंगलांशी झुंजले. झुंज विषम होती. मोंगल संख्येने आणि बळाने अफाट होते. मावळे मूठभर होते. शेवटी मावळ्यांना किल्ला सोडून जावे लागले.

यावेळी मात्र किल्ला न सोडण्याचा चाकण-चौऱ्यांशीचा मनसुबा दिसतो....

## रस्तावंदी, उत्स्फूर्त सत्याग्रह, निर्धार....

नामदेव माळी

शनिवार दि. ८-३-८० रोजी चाकण परिसरातील शेतकरी संघटनेच्या ४९१ शेतकऱ्यांना पोलिसांनी अटक केली आणि त्यांचेवर १५ तारखेपर्यंत रिमांड काढण्यात आले. ही बातमी वर्तमानपत्रात झळकताच शेतकऱ्यांविषयी आणि शेतीमालाविषयी आस्था असणाऱ्यांचे लक्ष त्या घटनेकडे वेधले गेले. शेतकरी संघटनेचे अध्यक्ष शरद जोशी यांनी त्याच दिवसापासून बेमुदत उपोषण सुरू केले. 'जोपर्यंत शेतकऱ्यांच्या कांद्याला योग्य भाव मिळत नाही आणि नाफेडअधिकारी व कलेक्टर यांनी दिलेल्या आश्वासनाची परिपूर्ती होत नाही तोपर्यंत मी उपोषण सोडणार नाही!' असे शरद जोशींचे म्हणणे.

त्याची प्रतिक्रिया म्हणूनच दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवारीही असाच एक मोर्चा शासनाचा निषेध करण्यासाठी निघाला व त्यातील ३३ लोकांना अटक करण्यात आली.

शासनयंत्रणेला व पोलिसअधिकाऱ्यांना वाटत होते की, ही शेतकऱ्यांची चार पागोटी काय करणार आहेत? पण सोमवारी १० मार्चला त्यांचा भ्रमनिरास झाला. एवढेच नव्हे तर त्यांच्या तोंडचे पाणी पळाले!

शेतीमालाला रास्त भाव मिळावा म्हणून गेल्या काही वर्षांपासून प्रयत्न सुरू झालेत; पण ही मागणी अद्याप मोठी शक्ती वा चळवळ उभी करू शकली नव्हती. संघटित कामगार, संघटित नोकर स्वतःच्या संघटित शक्तीवर कारखानदार, भांडवलदार आणि शासन यांची नाकेबंदी करून आपल्या मागण्या मान्य करून घेऊ शकतात; पण खेड्यापाड्यांत इतस्ततः विखुरलेल्या आणि परिस्थितीने पिळलेल्या शेतकऱ्यांच्या समस्या कोण सोडविणार? शेतकरी शेतीमाल पिकवितो. शेतीमाल तयार होताच स्वतःच्या निकडीच्या गरजा भागविण्यासाठी तो माल बाजारात आणतो आणि मिळेल त्या किंमतीत माल विकून मोकळा होतो. जोपर्यंत शेतकऱ्याचा माल बाजारात येत असतो तोपर्यंत भाव कमी; परंतु जेव्हा शेतकऱ्याजवळचा माल संपतो त्याच क्षणापासून बाजारभाव भडकतात आणि भडकलेल्या भावाने पुन्हा स्वतःच्या उपजीविकेसाठी तोच माल घेऊन तो स्वतःला भरडून घेत असतो.

हे दुष्टचक्र केव्हा संपणार? हे आपल्या नशिबातच लिहिले आहे, त्याला आपण काय करणार? असे म्हणून शेतकरी चूप व्हायचे; पण आता शेतकरी जागा होतोय आणि आपल्या अस्तित्वाची जाणीव इतरांना करून देतोय. अशा ह्या नवजागृतीच्या ठिणग्या जागोजाग पडून भडके उडतायेत आणि ह्याची प्रचीती १० मार्चला चाकण-पुणेला आली.

दुपारी १-४५ वाजता नासिकरोडवरून चाललेला मोर्चा चाकण मार्केटयार्डच्या जवळ येऊन थांबला. शरद जोशींनी जर आपल्यासाठी आणि आपल्या कांद्यासाठी उपोषण सुरू केले आणि तेही कांद्याला योग्य भाव मिळेपर्यंत, तर मग आपण का स्वस्थ रहायचे? एवढा बडा माणूस. त्याला काहीच कमी नाही; पण केवळ आमच्यासाठी आणि कांद्यासाठी उपोषण करतोय तर आम्ही शेतकरी असून, आमचा कांदा असून, आम्ही का स्वस्थ बसावे? नाही, हे शक्य नाही. आम्ही पण शासनाची नाकेबंदी करणार! असे म्हणत म्हणत निघोजे गावच्या शेतकऱ्यांनी मोर्चासाठी आणलेल्या बैलगाड्या नासिक-पुणे-रोडवर आडव्या सोडल्या. सुरुवातीला १५-२० गाड्या होत्या. १५०-२०० माणसे होती. गाडीत स्त्रिया, पुरुष, तरुण होते. त्यांच्या घोषणा- 'शरद जोशी- झिंदाबाद,' 'नाफेडचा धिक्कार असो,' 'आमच्या कांद्याला योग्य भाव- (५० ते ७० रु. क्विंटल) मिळालाच पाहिजे!' ह्या होत्या. हळूहळू वातावरण तापत होते.

पोलिसांनी सत्याग्रहीभोवती कडं केलं. पोलिसांना वाटलं, आता आपण यांना अटक करू. म्हणजे थोड्या वेळात रस्ता खुला होणार सत्याग्रहींच्या नेत्यांची लहानलहान भाषणे झाली– ' जोपर्यंत आमच्या कांद्याला योग्य भाव मिळत नाही तोपर्यंत आम्ही रस्ता सोडणार नाही. आम्ही शांततामय मार्गाने– गांधीजींच्या मार्गाने–आंदोलन करू. कलेक्टरनी दिलेलं आपले वचन पुरे करावे मग आम्ही रस्ता खाली करतो. '

पोलिसांनी सत्याग्रहींच्या जवळ व्हॅनस् आणल्या. सत्याग्रहींना पोलीस म्हणू लागले, ' चला तुम्हाला अटक करतो. ' त्यावर सत्याग्रहींनी घोषणा द्यायला सुरुवात केली– ' आम्हाला गाडीबैलांसह अटक करा: अगोदर आमच्या गाडीबैलांची व्यवस्था करा मग आम्हाला अटक करा ! ...'

' गाडीबैलांबरोबर...अटक करा–'

ह्या घोषणा ऐकताच पोलिसांची घाबरगुंडी उडाली. काय करावे तेच पोलिसांना कळेना. हे सगळे दृश्य सत्याग्रहींच्यापासून लांब अंतरावर उभे राहून पहाणारे शेतकरी, तरुण यांचे रक्त मग संचारले. त्यांच्या डोक्यावर असणारी भीतीची कुऱ्हाड येव्हाना पळून गेली. एक एक जण सत्याग्रहींत सामील होऊ लागला. पहातापहाता ५ वाजले, ६ वाजले आणि सत्याग्रहींची संख्या झाली २५००–३००० हजार. कोणाला अटक करणार ? पोलीस सत्याग्रहींना अटक करणार की सत्याग्रही पोलिसांना, हेच कळेना. आता बैलगाड्यांची संख्या ४०–५० वर गेली होती. नासिकरोडला लागून असणाऱ्या सर्व रस्त्यांची ( पळवाटांची ) पण नाकेबंदी झाली होती. एस्टया, ट्रक्स, टाक्या थांबल्या होत्या. बैलगाड्या जुंपून हलवाव्यात म्हटले तर शेतकरी म्हणताहेत ' पोलिसांनी बैलगाड्या जुंपाव्यात. ' पोलिस बैलांना हात लावायला जातील तर अगोदरच मारके म्हणून निवडन आणलेले बैल पोलिसांची थोडीच दयामाया करणार आहेत ? शेतकरी-सत्याग्रही गाडीतून उतरायला तयार नाहीत. पोलिसांच्या हाताबाहेर वातावरण गेलं. पोलिसांनी त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना फोन केला. वरिष्ठ अधिकारी म्हणजे कलेक्टरसाहेब ! कलेक्टरसाहेबांनी मुंबईला फोन लावला; पण उत्तर सापडत नव्हतं. आता लोकांनी अशी मागणी सुरू केली की, कलेक्टरांनी आमच्यासमोर येऊन दिलेले वचन पाळायचं मान्य केलं तरच आम्ही रस्ता सोडू. कलेक्टरांनी असं कोणतं वचन दिलं होतं ?

कांद्याला भाव मिळावा म्हणून शेतकरी संघटना गेली एक-दोन वर्षे प्रयत्नशील आहे. त्याच प्रयत्नाचा एक भाग म्हणून याही वर्षी शेतकरी संघटनेच्या लोकांनी कांद्याला रास्त भाव मिळावा म्हणून प्रयत्न सुरू केला होता. ७ मार्च, कलेक्टर ऑफिस. तिथे शेतकरी संघटनेचे व चाकण भागातील ३०–३५ लोक, नाफेडचे अधिकारी जमले. चर्चा सुरू झाली. नाफेडच्या अधिकाऱ्यांनी चाकणमार्केटमधील कांदा ५० ते ७० रु. प्रतिक्विंटल या भावाने घ्यायचे मान्य केले. कलेक्टरसाहेबांनीही तसे आश्वासन दिले. व्यवहारामध्ये संदिग्धता राहू नये म्हणून शरद जोशी यांनी असे स्पष्ट केले की, नाफेड ५० ते ७० रु. प्रतिक्विंटल भावाने कांदा खरेदी करणार ! म्हणजे gradation प्रमाणे खरेदी केली तर त्याची सरासरी किंमत ५८ ते ६० रु. प्रतिक्विंटल येणार. त्यावर नाफेडच्या अधिकाऱ्यांनी होकार दिला. शनिवार दि. ८।३।८० पासूनच खरेदी सुरू होणार. त्या आशेवर शेतकऱ्यांनी भराभर कांदा चाकणला आणला. शनिवारी नाफेडचे अधिकारी चाकणला आले आणि कांद्याचे लिलाव पुकारू लागले. त्यांनी कांद्याच्या लिलावाची सुरुवात ४५ रु. क्विंटल पासून सुरू केली. दुसरे असे की, आलेल्या कांद्याच्या १० टक्के कांदा खरेदी करणार असे तो अधिकारी म्हणू लागला. बाकीच्याचे काय ? चाकणच्या शेतकऱ्यांनी कालच्या बोलण्याची त्यांना आठवण करून दिली; पण नाफेडचे अधिकारी म्हणजे काय राजेच ना ? त्यांच्या मनात येईल ते करणार ! ४५ रु. क्विंटल वरून कसाबसा ५०–५५ पर्यंत भाव वाढला. त्यापुढे भाव वाढेनाच. लोक विनंती करीत; पण तिकडे लक्ष द्यायला नाफेडच्या लोकांना वेळ कोठे आहे ? लोकांनी कलेक्टरसाहेबांबरोबर झालेल्या बोलण्याची आठवण करून दिली; पण नेहमीच अरेरावी करणारांना सर्वसामान्यांचा आक्रोश काय ऐकू येणार ?

तेव्हा परिस्थिती हाताबाहेर गेली. काल माणूस कलेक्टरसमोर एक बोलतो आणि आज कृती वेगळीच करतो ! शेतकऱ्याकडे आपला राग व्यक्त करण्याचे एकच साधन. पुणे–नासिक–रस्ता अडविणे. लोकांनी पुणे–नासिक–रस्ता अडविला. तावडतोब पोलीस आलेच. अटकेचे सत्र सुरू झाले. मिळेल त्या वाहानातून कैद्यांना येरवडा जेलकडे पाठविण्यास सुरुवात झाली. एकूण ४९१ लोकांना अटक झाली. अटकेनंतर १५ तारखेपर्यंत रिमांड दिला. वाटलं आता लोक गप्प बसतील. शरद जोशींनी तर जाहीर करून टाकले की, जोपर्यंत नाफेड ठरलेल्या भावाने म्हणजे ५० ते ७० रु. प्रतिक्विंटल या भावाने कांदा खरेदी करीत नाहीत तोपर्यंत मी उपोषण करणार ! दुसरी अट अशी की, मार्केटमध्ये असणारा सर्व कांदा नाफेडने खरेदी करावा ! ' शरद जोशींच्या बरोबर आणखी काही लोकांनी साखळी-उपोषण सुरू केलं.

शनिवारचा दिवस गेला. रविवारी पुन्हा रस्ता बंद ! पुनः ३३ लोकांना अटक. त्यावर शेतकरी संघटनेच्या लोकांनी एक प्लॅन तयार केला की, बुधवारी नाफेड पुन: येणार तेव्हा आसपासच्या भागातील शेतकऱ्यांनी बैलगाड्यांनिशी यावे व रस्ते अडवावेत. सगळीकडे निरोप पोहचले; पण बुधवारची कोण वाट पहातो ! शरद जोशी उपाशी असताना आम्ही गप्प बसायचं ! सोमवारी (१०–३–८०) दुपारीच १ वाजता निघोजचे लोक बैलगाड्या घेऊन, घरातील स्त्रिया–मुले घेऊन सत्याग्रहासाठी नासिकच्या रस्त्यावर उतरले.

लोकांची समजूत घालण्यासाठी साहेबराय सातकर, आनंदराव पाटील वगैरे मंडळी येऊन गेली; पण त्यांना गप्प बसावे लागले. लोकांनी आपला निर्णय पक्का असल्याचे सांगितले. शेवटी रात्रीचे दहा वाजले. कलेक्टरना चाकणला यावं लागलं. कलेक्टर आणि शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांची बोलणी सुरू झाली. तोपर्यंत सर्व सत्याग्रही रस्त्यावर थांबले होते. लोकांना रस्त्यावर थोपवून धरणे आवश्यक होतं. मग आम्हीच तिथे भाषणे द्यायला व गाणी म्हणायला सुरुवात केली. त्या वेळी काही शेतकऱ्यांनी त्यांच्या गावठी भाषेत जी काही भाषणे केली त्याला तोडच नाही. ती भाषणे म्हणजे शेतकऱ्यांमधील सुप्तशक्तीचा साक्षात्कार होता. हा कार्यक्रम इतका

रंगला होता की रस्त्यावर गाडी अडविल्यामुळे थांबलेल्या ट्रकचा एक सरदारजी भाषण देण्यासाठी पुढे सरसावला. तो म्हणतो, ' आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी लोकांनी रक्त दिलं. तुम्ही पण तुम्हाला न्याय मिळविण्यासाठी रक्त देण्याची तयारी दाखविली पाहिजे !' ह्या वेळी सभा अगदी ढवळून निघाली होती. दुपारी लोकांच्या चेहऱ्यावर दिसणारी भीती आता कमालीच्या भयमुक्त जोषानं रूपांतरित झाली होती आणि तीच त्यांच्या हक्कप्राप्तीची चाहूल होती.

कलेक्टरांबरोबरची बोलणी फिसकटली. कलेक्टर म्हणत होते की, येत्या बुधवारी नाफेड कांदा-खरेदी सुरू करेल आणि सर्वच्या सर्व कांदा खरेदी करेल; पण ते कोणत्या भावाने कांदा खरेदी करेल हे सांगता येत नाही. शेवटी कलेक्टरसाहेबांनी हे जाहीर सभेत बोलून दाखविले. शरद जोशी पण उपोषणाचा त्रास होत असतानाही सभेस हजर होते. लोक म्हणाले तुम्ही दराचे निश्चित सांगत नाही, तोपर्यंत आम्ही रस्ता सोडणार नाही ! पण कलेक्टर म्हणू लागले की, दराबाबत मी काहीही निर्णय घेऊ शकत नाही; तो नाफेडचे अधिकारीच घेऊ शकतात. त्यावर लोकांनी रस्ता खुला न करण्याचा निर्णय सांगितला. जोशींनी त्यावर असे सांगितले की, मार्केटयार्डात जो ६० हजार पिशवी कांदा उन्हात सडत आहे, तो कांदा जरी कलेक्टरसाहेबांनी ५० ते ७० रु. च्या भावात घ्यायचे आश्वासन दिले तरी आम्ही आतापुरता रस्ता मोकळा करू. पुढचा निर्णय त्यांनी नाही दिला तरी चालेल; पण कलेक्टर त्यावर काहीच बोलू शकले नाहीत. शेवटी रस्ता अडविण्याचा निर्णय पक्का झाला. दुपारपासून अडकून पडलेल्या एस्. टी. गाड्यांना तेवढे इकडून तिकडे यायला परवानगी द्यावी व अडकून पडलेल्या प्रवाश्यांची सुटका करावी अशी सूचना कलेक्टर व जोशी यांनी मांडली. सुरुवातीला लोकांनी विरोध केला; पण पुनः रात्री ११॥ वाजता जोशींनी विनंती केल्यावर फक्त एस. टी. गाड्या जाऊ दिल्या. एस. टी. गाड्या गेल्यावर पुनः रस्ता बंद ! ◻

# आणि डूंगन जागा होतोय

अभय जांभेकर

कालच चाकणला जाऊन आलो. (दि. १३ मार्च) तेथील दृश्य बघून चकितच झालो. एवढ्या मोठ्या प्रमाणावर एखादा वर्षानुवर्षे झोपलेला समाज खडबडून जागा होतो आणि मागचापुढचा विचार न करता सरळ रस्त्यावर उतरतो. खरंच विसरणार नाही हा दिवस ! ह्याच समाजाचा एक प्रतिनिधी फारच डिवचल्यावर चिडून म्हणतो-' इंदिराबायने आमची कामं केली नाहीत तर खाली ओढू !' डूंगन जागा होऊ घातल्याचं चिन्ह होतं ते. स्वतःच्या अमर्याद ताकदीच्या स्वरूपाची जाणीव झाल्याचं ते चिन्ह होतं.

मागे एकदा उत्तरप्रदेशात गेलो होतो. ऊस त्या वर्षी फारच पिकला होता. उसाच्या गाड्याच्या गाड्या कारखान्यासमोर उभ्या होत्या. कारखानदारांनी दरवाजे बंद करून घेतले होते. शेवटी ऊस जाळायला लागला कचऱ्याच्या भावानं. त्यातून आंदोलनासाठी शेतकरी उभा राहिला. अगदी त्याचीच आठवण शेतकरी संघटनेचे कांद्याचे आंदोलन बघून झाली. आणि हो, चरणसिंगांच्या तत्त्वज्ञानाची पण आठवण झाली. कुणी तरी म्हणालं होतं, ज्या दिवशी चरणसिंग जनतेतून बाहेर पडले त्या दिवशी जनता पक्षाचे भवितव्य संपले ! यातील अतिशयोक्तीचा भाग सोडल्यास चरणसिंगांच्या पाठीमागे कोणती ताकद उभी होती याची जाणीव झाली. किसानसंमेलनात घडलेले शेतकरी समाजाचे ७५ टक्के दर्शन व्यक्त करणारे होते आणि त्यांनी मांडलेले तत्त्वज्ञान भारतीय समाजासाठी होते. शेतकरीवर्गाला जर पैसा मिळाला, न्याय मिळाला तर भारत देश समृद्ध होईल. आजवर दिलेल्या priorities चुकलेल्या आहेत. ह्या priorities बदलायला हव्यात. सगळीच समाजरचना शेतकरीअभिमुख करायला हवी. कदाचित ह्यातून दोन-तीन वर्षं गोंधळाची जातील; पण त्यातून घडेल तो एक चांगला, समृद्ध भारत ! चरणसिंगांच्या ह्या तत्त्वज्ञानाने शेतकरी आंदोलनाला राष्ट्रीय मान्यता मिळाली, आधार मिळाला. वर्षानुवर्षं झोपलेला समाज स्वतःच्या स्वार्थाकरता का होईना जागा झाला.

सहज अभ्यास करता करता लक्षात आलं, भाव कमी झाले किंवा जास्ती झाले तर त्याचा फायदा शेतकऱ्याला कधीच मिळत नाही. त्या बिचाऱ्याचे सर्वच भवितव्य अवलंबून असते ते धान्य विकून मिळणाऱ्या पैशावरच. तो पैसा जर मिळाला नाही तर सर्वच संपून जाईल आणि अशा स्थितीचा व्यापारी बरोबर फायदा घेतो. (त्यात त्याचाही दोष नाही.) सुगीच्या काळात अत्यंत कमी भावात माल साठवून ठेवतो आणि मग जास्ती भाव आला की, त्याची विक्री करतो आणि वर्षानुवर्षं शेतकरी त्याच कर्जबाजारीपणाच्या चक्रात भरडला जात असतो.

आणि ह्याच विचारावर शेतकरी-आंदोलन उभे राहिले आहे. जशा पद्धतीने हे आंदोलन उभे राहिले आहे त्या पद्धतीचे मूल्यमापन करण्याच्या आधी ह्याचे स्वागत करायला हवे. कारण हजारो वर्षं दडलेली अस्मिता जागी व्हायला लागली आहे.

दुर्दैवानं वर म्हटल्याप्रमाणे ज्याभोवती हे आंदोलन उभे आहे त्याची कारणे अत्यंत तात्कालिक आहेत. त्यावर उत्तर सापडले की, हे आंदोलन संपून जाते, विरून जाते. शिवाय या ठिकाणी constructive approach नाही हे दुर्दैव ! त्याचे कारण आपण जी आंदोलनाची पद्धत स्वीकारली आहे ती कम्युनिस्टांच्या पठडीतून आलेली आहे, ज्यांचा मुख्य उद्देश अशा प्रकारच्या आंदोलनातून सत्तेच्या जवळ जाणे असा असतो. मला पडलेला प्रश्न-प्रत्येक गोष्टीत सरकारवरच अवलंबून राहायला हवे का ? ह्याशिवाय इतर काही मार्ग नाहीत का ? कांद्याचेच उदाहरण घेतले तर आज समजा सरकारने मागण्या मान्य केल्या आणि प्रश्न सोडवले तर पुढील वर्षी हे प्रश्न उभे राहणार नाहीत असे नाही. पुन्हा एकदा अशाच पद्धतीचे आंदोलन हातात घ्यावे लागेल. ह्यातून झाली तर

पृष्ठ २१ वर

# संध्याकाळचे पुणे

दि. बा. मोकाशी

## बलात्कार हा अनार्य–इति वात्स्यायन

आधी राजकीय की आधी सामाजिक हा वाद लोकमान्य टिळकांचे वेळी गाजला होता. टिळकांनी तेव्हा 'आधी राजकीय' असा पक्ष केला व बाजी जिंकली. आता स्वातंत्र्यानंतर तेहतीस वर्षे झाली आहेत. माझी खात्री आहे की लो. टिळकांची मते आता ती राहिली नसती. 'आधी सामाजिक' असे त्यांनी केसरीतून गर्जून लिहिले असते.

विशेषत: आज संध्याकाळी टिळकांच्या स्मारक मंदिरात जो स्त्रियांवरील बलात्काराचा विषय परिसंवादास होता तो ऐकून ते गदगदले असते. तो ऐकल्यावर सभागृहांतील त्यांच्या पुतळ्याच्या डोळ्यांत नक्की अश्रू आले असतील. पायऱ्या चढून वर जाताच या विस्तृत सभागृहात आपण प्रवेश करतो. समोरच्या भिंतीपुढे लो. टिळकांचा हा पुतळा उभा आहे. पुतळ्यामागच्या भिंतींवर श्रीशिवाजीमहाराजांपासून तो सावरकरांपर्यंत, त्यांच्या त्यांच्या आयुष्यातील एक एक प्रसंग घेऊन भित्तिचित्रे रंगवली आहेत. स्त्रियांवरील अत्याचार ऐकून ती चित्रेही हलली असतील.

या परिसंवादाच्या निमंत्रिका डॉ. कुमुद पोरे विषयाचा आरंभ करून देत म्हणाल्या,

'जाणीव असलेल्या माझ्या बंधुभगिनींनो, तुमचे स्वागत. आपण बलात्काराच्या बातम्या वाचतो. कारणं क्षुल्लक वाटतात. मजूर कामावर आला नाही म्हणून जमीनदार त्याच्या स्त्रीवर बलात्कार करतो. सैनिक पराभूत लोकांच्या स्त्रियांवर अत्याचार करतात. बलात्कार हा अपघात मानला जातो. तो अपघात नसून ती सामाजिक समस्या आहे. लढाईत पराभूतांच्या स्त्रिया पळविल्या जातात तो त्यांचा तेजोभंग करण्यासाठी, दलितांवर अत्याचार केले जातात त्यात त्यांची अस्मिता तुडविण्याचा हेतू असतो– त्यांनी मानलेली नाती तुडवणं हा हेतू असतो. बलात्कार ही विकृती आहे. निकोप माणूस बलात्कार करणार नाही अशी एक समजूत आहे; पण हाही फसवा युक्तिवाद आहे. मग आपले सरपंच, पोलिस इत्यादि सर्वच विकृत आहेत असे म्हणण्याची वेळ येईल.

¤

'स्त्री मुक्ति आंदोलन संपर्क समिती'च्या वतीने हा परिसंवाद भरण्यात आला होता.' बलात्काराचा कायदा स्त्रीला पुरेसे संरक्षण देतो का? हा परिसंवादाचा विषय होता. स्त्रीमुक्ति आंदोलन संपर्क समिती, ९७ या समितीतर्फे हा परिसंवाद टिळक स्मारक मंदिरात दि. २–३–८० ला म्हणजे धूलिवंदनाच्या दिवशी सायंकाळी सहा वाजता ठेवलेला होता. ही समिती वेगवेगळ्या नऊ स्त्रीसंघटनांमधून स्थापन केलेली आहे. या स्त्रीसंघटनांच्या नावांवरून वेगवेगळ्या थरांतल्या, वेगवेगळ्या राजकीय दृष्टीच्या आणि वेगवेगळ्या कारणांसाठी स्थापन झालेल्या स्त्रीसंघटनांतील स्त्रिया सर्व स्त्रीजातीवर होणाऱ्या समाईक अत्याचारांसाठी एकत्र आल्या आहेत हे कळेल आणि ते योग्यच आहे. या नऊ संघटना अशा (१) श्रमिक महिला समिती (२) समाजवादी महिला सभा (३) पुरोगामी स्त्रीसंघटना (४) युवक क्रांति दल (५) स्त्रीसखी मंडळ (६) सावित्रीबाई फुले महिला मंडळ (७) राष्ट्रसेवा दल (८) पुणे विद्यापीठ विद्यार्थी संघटना (९) स्त्री शक्तिजागृती. या समितीतर्फे दि. ८–३–८० ला मोर्चा होता. हा मोर्चा फुले मंडई ते संभाजी पूल चौक असा जाणार होता.

¤

डॉ. कुमुद पोरे पुढे म्हणाल्या, 'पुरुषाने स्त्रीला केव्हाही उपभोगात्री हे प्रस्थापित करण्याचा हा प्रश्न आहे. बलात्कार हा मानसिकही असू शकतो. जाहिरात–साहित्य–नाटक–सिनेमा यातून जे स्त्रीशरीराचं प्रदर्शन होतं व पुरुष ज्या तऱ्हेनं ते बघतात व ऐकतात तोही बलात्कारच.

'बलात्कार ही सामाजिक समस्या आहे असे धरून काही लोक उपाय सुचवितात–' स्त्रिया फॅशन फार करतात. त्यामुळे पुरुषांची मने बिथरतात– 'पुरुष काय कमी फॅशन करतात? कुणी सुचवितात–' 'स्त्रियांनी एकटं-दुकटं हिंडू नये, 'म्हणजे स्त्रियांना स्वतंत्र धीटपणे हिंडण्याचे स्वातंत्र्य नाही?' आमचे विनोदी लेखक चवीनं बलात्काराचं वर्णन करतात. स्त्रियांना बलात्कार आवडतो अशी काही तरी समजूत. एकदा बलात्कार झालेली स्त्री आयुष्यातून उठते– त्यामुळे तिच्यावर आणखी बलात्कार घडतात. बलात्कारात सापडलेल्या स्त्रिया सर्व जातिधर्मांच्या, सर्व वर्णांच्या, सर्व परिस्थितीतील आढळतील. इंग्लंडमधील स्त्रियांनी बलात्काराविरुद्ध लढा देण्यास डब्ल्यु. ए. आर. ही संघटना स्थापन केली. पुरुषही एम. ए. आर. संघटना स्थापून मदतीला आले. त्या संघटनांनी थोर–लहान न पाहता मंत्री, न्यायाधीश, पोलिस, ज्यांनी अत्याचार केले त्यांना गुन्हेगार ठरवले. आपल्याकडे जळगावजवळील एका आदिवासी स्त्रीवर बलात्कार झाला. ती पोलिसकडे गेली. दाद लागली नाही. तेव्हा तिने स्त्रिया गोळा करून

बलात्कार करणाऱ्या पुरुषाला त्याच्या घराबाहेर काढून त्याची धिंड काढली.

डॉ. कुमुद पोरे यांनी परिसंवादाची भूमिका मांडून परिसंवादात भाग घेणाऱ्या वक्त्यांची ओळख करून दिली. भाग घेणारांत लॉ कॉलेजचे प्राचार्य सत्यरंजन साठे, नागपूरच्या डॉ. सीमा साखरे, विख्यात सर्जन डॉ. एल. बी. जोशी व डॉ. अरुण लिमये हे होते. डॉ. सीमा साखरे यांनी स्त्रियांवरील अत्याचाराच्या विदर्भातील काही भयाण। कथा सांगितल्या. त्यापैकी एकाही केसमध्ये अपराध्याला शिक्षा झाली नाही हे सांगून त्या म्हणाल्या की, कोर्टात केस गेली की वकील खोडसाळ प्रश्न विचारतात. डिड शी रेझिस्ट? डिड शी काय ? तिनं ओचकारलं का ? एवढी अडदांड आहे तिच्यावर अत्याचार कसा होईल ? ' एवढेच काय पण वकील त्या वेळचे वर्णन करावयास सांगतात. कोणती स्त्री उघडचा कोर्टात याची उत्तरे देईल ? मूठभर गर्भाशयाच्या बदल्यात तुम्ही पुरुष बलात्कार करता. वर्तमानपत्रे अत्याचार झालेल्या स्त्रीचा फोटो छापतील पण ज्यांनी अत्याचार केला त्याचा छापणार नाहीत.

डॉ. सीमा साखरे अत्यंत कळकळीने बोलत होत्या. त्यांच्यानंतर डॉ. एल. बी. जोशी म्हणाले, ' बलात्कारच्या बाबतीत नव्वद टक्के स्त्रिया तक्रार करीत नाहीत. त्यांनी धीटपणाने तक्रार करावी. बलात्काराचे वेळी बाईने आपला प्राण गमावू नये. मी सांगेन आपले प्राण वाचवा. त्या वेळी स्वस्थ पडून रहावे. लग्न झालेल्या बाईवर जबरदस्ती केली तर बलात्कार झाला का ? जी बाई स्वत:ला विकते ती वाईट नसते. तिच्यावर बलात्कार होऊ नये. एक मुलगी म्हणाली, मी पुरुष असते तर पाच सहा बायकांवर बलात्कार केला असता. स्त्रियांच्या अशाही मनोवृत्ती असतात. कायदा करताना फार जपावे लागते. पुरुषावरही खोटा आरोप केला जातो. बलात्कार झालेल्या मुलींना मी सांगतो की, स्वस्थ बसा. कायदा वेडा आहे. '

नंतर डॉ. जोशींनी दोन सूचना केल्या. ( १ ) तपासनीस स्त्री पोलीस असावेत. ( २ ) कोर्टात कॅमेऱ्यांत तपासणी घ्यावी व न्यायाधीश स्त्री असावी.

¤

परिसंवादाच्या आरंभी अगदी थोडे श्रोते होते; पण आता पहाता पहाता सभागृह स्त्री पुरुषांनी भरून गेले. श्रोत्यांत पुरुषांची संख्या जास्त होती. तिला उद्देशून भाषणास सुरुवात करताना डॉ. अरुण लिमये म्हणाले,

' येथे पुरुष जास्त आहेत......बलात्कार अमानवी आहे. म्युच्युॲलिटी इज मॉरॅलिटी. बलात्कारात अनीति आहे ही कल्पना मान्य. प्रेमजीवनात बलात्कार नसतो. बलात्काराचा प्रश्नच वेगळा. बलात्कार पोषाखावर नाही. सिनेमात बलात्कार दाखवितात तेव्हा आपण बलात्कार करणाऱ्याच्या जागी का नाही असे प्रेक्षकांस वाटते. ... भारतीय समाज विकृत आहे. पुरुषी नजर स्त्री ओळखू शकते. नर्सेसना सरपंचावर अवलंबून रहावे लागते व किंमत द्यावी लागते. आपल्याकडेच नाही. सर्वत्र हेच चित्र. कॉन्फिडेन्शिअल रिपोर्ट म्हणजे काय ? बोलू शकत नाही. त्यांच्यावर अत्याचार ... समाजवादी देशांत स्त्रीच्या देहाची विक्री नाही ... बलात्काराच्या केसमध्ये स्त्रीला आरोप सिद्ध करावा लागतो. बलात्कार केला नाही हे सिद्ध करण्याची जबाबदारी आरोपीची हवी. कायद्याची मर्यादा ओळखून कायद्यावर अवलंबून राहू नये. जंबिया व कराटाचा उपयोग काय ? हिंसेचा प्रतिकार हिंसेने करू नये हे खरे, पण स्त्रीने म्हटले की बलात्काराचा मी प्रतिकार करीन तर महात्मा गांधींनीही हो म्हटले असते.

¤

बलात्काराचा हा विषय इतका विचित्र आहे ! म्हणून मी स्वतःचे काही न सांगता परिसंवाद जसा घडला तसा द्यावा असे ठरवून आतापर्यंत लिहिले; पण एवढ्यात मला कामसूत्रकार वात्स्यायनाचे मत आठवले. वात्स्यायन म्हणतो, ' स्त्री ही फुलाप्रमाणे कोमल असते. बलात्काराने विपरीत प्रकार संभवतात. स्त्रियांना बलात्कार आवडतो ही कल्पना त्याला मान्य नव्हती. त्याच्या काळातली उदाहरणे त्याने दिली आहेत. कुंतलदेशाच्या शातकर्णि सातवाहन राजाने संभोगसमयी महादेवी मलयावतीवर प्रहार करून तिला ठार मारले. पांड्य देशाच्या राजाचा सेनापती नरदेव याने नृत्य करीत असलेल्या नटीवर आसक्त होऊन तिच्या गालावर आघात करण्यास हाताने मारले; पण तो फटका डोळ्यावर बसून तिचा डोळा गेला ! चोल देशाच्या राजाने कामांध होऊन गणिका चित्रसेनेच्या उरावर कीलाघात केला व ती मरण पावली.

वात्स्यायनाच्या मते कोणताही दुःखद संभोग बलात्कार होय. ही त्याच्या अनेक सुटसुटीत व्याख्यांतील एक व्याख्या. मला वाटते डॉ. अरुण लिमयेंच भाषणात असे काही तरी म्हणाले की शेकडा ९० टक्के स्त्रियांवर बलात्कार होत असतो. विस्तृत अर्थाने ते खरे आहे.

पण भयंकर अत्याचार देशाच्या प्रत्येक भागात होत आहेत, त्याचा वरील अत्याचारांशी संबंध नाही. या अत्याचारांची कारणे पुष्कळ आहेत. त्यांत डॉ. पोरे म्हणाल्या तसा एका समाजाचा दुसऱ्या समाजाची अस्मिता तुडविण्याचा हेतू असेल. किंवा स्त्री ही उपभोगाची वस्तू आहे ही भावना असेल किंवा स्त्रीसुख न मिळाल्याने येणाऱ्या अवस्थेतून उद्भवणारी प्रवृत्ती असेल किंवा वैयक्तिक आकस असेल किंवा नोकरीसाठीं तिला द्यावं लागणारं मोल असेल. या सर्वांत एकच दिसतं की, स्त्रीचे सर्व बाबतीतले परावलंबित्व तिच्यामागे हात धुऊन लागले आहे. तिने परावलंबित्व घालवले नाही, तर अत्याचारांची ही टांगती तलवार तिला कधीच दूर करता येणार नाही आणि परावलंबित्व दूर करण्यात तिचा कुठलाहीं तोटा नाही किंवा पुरुषांचाही तोटा नाही. अत्याचाराचे भय तर स्त्रीच्या रोमारोमात भरलेले असते. आयुष्यभर ती हे भय मनाशी ठेवून असते. मला नेहमी वाटते की जर स्त्रियांच्या मागचे अत्याचाराचे भय गेले तर स्त्रीच्या कर्तृत्वाला सीमा राहणार नाही.

¤

परिसंवादाच्या आरंभी दोन पदे झाली. पहिला पोवडा होता–' करू पहिले नमन ज्योतिबाला ज्याने स्त्रीमुक्तीला जन्म दिला। इसवी सन अठराशे सालाला–स्त्रिया होत्या अज्ञानात ।।

लिहिण्याची शाळा नव्हती–अशा अंधारात ज्योतिबानं दिवा लावला ।।

तसेच एक स्त्रीमुक्तीचे समरगीत म्हटले;

एकी करून लढा देऊनशान–यो तुरुंग फोडायचा हाय वो ।।

पृष्ठ २० वर

# मुंबई वार्ता

किरण मोरेश्वर जोग

## □ आय. आय. टी. त स्मशानशांतता !

तंत्रविज्ञान व विकास या क्षेत्रात अभिमानाने सांगता येण्याजोग्या भारतात ज्या काही थोडया गोष्टी आहेत त्यात आय. आय. टी. ही एक ! मुंबापुरीतील भूषण असलेली ही आय. आय. टी. आज मात्र कमालीची शांत झाली आहे. नव्हे, तेथे स्मशानशांतता पसरली आहे. गेल्या आठवडयात आय. आय. टी. च्या अभ्यासू परिसरात एकदम आंदोलनाचे वारे पसरते काय, आणि २ दिवसांच्या आत २५०० विद्यार्थी आय. आय. टी. खाली करतात काय ! सर्वच अजब, परंतु यामागे एक योजनाबद्ध मोहीम असावी असा संशय संबंधितांशी चर्चा केल्यानंतर निश्चितच येतो.

आंदोलनाची सुरुवात झाली ती ४ विद्यार्थ्यांना आय. आय. टी. तून बाहेर जावयास सांगितल्याने ! या चार विद्यार्थ्यांनी त्यांच्या अभ्यासक्रमात समाधानकारक प्रगती न दाखवल्याने त्यांना काढून टाकण्याचा निर्णय व्यवस्थापनाने घेतला. बरनागर, इलेकोव्हर, राघवन व चंद्रशेखर हे ते विद्यार्थी होत. त्यांनाच प्रथम आय. आय. टी. बाहेर काढले असे झालेले नाही. यापूर्वीही पुरेशी प्रगती दाखवली नाही म्हणून आय. आय. टी. च्या पवई विद्यालयातून विद्यार्थ्यांना दरवाजाचा रस्ता दाखवण्याचे प्रकार झाले आहेत व त्यात आयोग्य असे काहीच नाही.

परंतु या वेळेस मात्र 'मामला' बिघडला. काही जणांशी चर्चा केल्यावर वेगळयाच (सर्व वृत्तपत्रात न आलेल्या) गोष्टी लक्षात आल्या. मुळात 'समाधानकारक प्रगती' म्हणजे काय ? तर आय. आय. टी. सेमिस्टारमध्ये जे विषय असतात त्या प्रत्येक विषयाला एक मूल्यांक (वेटेज) असते. या मूल्याकांना धरून प्रत्येक विद्यार्थ्याला विशिष्ट दर्जा (ग्रेड) दिला जातो. उदाहरणार्थ १० गुण म्हणजे १ ला वर्ग, ८ म्हणजे दुसरा इत्यादी; परंतु ज्या विद्यार्थ्यांचा दर्जा खूपच घसरतो त्यांना 'प्रोबेशन' वर ठेवण्यात येते. म्हणजे ६ महिन्यांची मुदत देण्यात येते. या काळात त्यांचा दर्जा वाढावा ही अपेक्षा असते. असा 'प्रोबेशन' काळ दोनदा देण्यात येतो व तरीही जर विद्यार्थी गुणात्मक वाढ दाखवू शकला नाही तर कृती करण्यात येते. 'असमाधानकारक प्रगती' या शब्दामागे या सर्व गोष्टी आहेत.

आता ज्या ४ विद्यार्थ्यांना काढण्यात आले त्यांच्या संदर्भातही हे नियम काटेकोरपणे पाळण्यात आले होते. इतकेच नव्हे तर त्यांच्या अभ्यासात सुधारणा व्हावी म्हणून त्यांना अधिक सवलतीही देऊ केली होती; परंतु या कशाचा उपयोग न झाल्याने अखेर सर्वांना काढण्यात आले. आय. आय. टी.चे विद्यार्थीही हे मान्य करतात की अशा तऱ्हेची कृती करण्याची ही पहिलीच वेळ नव्हे. मग आंदोलन कशासाठी ? तर हा सर्व राजकीय मामला आहे. आंदोलन करणारे व त्यांना चिथावणी देणारे विद्यार्थी हे 'कम्युनिस्ट' होते व डावी आघाडी वगैरेचा उद्घोष करणाऱ्या मंडळीचा यात हात आहे असा संशय आहे. पूर्ण माहितीनिशी मी हे लिहीत आहे.

आय. आय. टी. च्या विद्यार्थ्यांना स्वतःची अशी स्वतंत्र विद्यार्थी संघटना नाही. परंतु विद्यार्थ्यांचे प्रश्न संचालकांपर्यंत पोहचतील अशी एक प्रातिनिधिक सोय मात्र आहे; परंतु या ४ विद्यार्थ्यांच्या प्रश्नाच्या वेळेसच (मुळात हा 'प्रश्न' असा नाहीच) अचानक काही विद्यार्थ्यांना या गोष्टीची जाणीव झाली की, विद्यार्थीमंडळातर्फे विद्यार्थ्यांचे प्रश्न संचालकांपर्यंत पोहचू शकत नाहीत, कारण त्यात विद्यार्थ्यांना योग्य प्रतिनिधित्व नाही.

हे लक्षात (!) आलेल्या विद्यार्थ्यांनी प्रत्येक हॉस्टेलात वरील भूमिका पसरवली व ज्या चार विद्यार्थ्यांना काढले गेले त्यांनी उपोषणाला प्रारंभ केला. याच वेळेस ज्यांना 'नेतृत्व' म्हणण्याजोगे नेतृत्व नाही असे ४०० (६०० नव्हे !) विद्यार्थी संचालक श्री. डे यांच्या खोलीत व जवळ पोहचले व 'या' चार विद्यार्थ्यांना परत घ्यावे म्हणून सकाळी १० पासून त्यांनी संचालकांना घेराव घातला. हेल्मेटधारी पोलीस या सुमारास आय. आय. टी. बाहेर उभे होते; परंतु परवानगीशिवाय आत येण्यास त्यांना प्रतिबंध असल्याने ते आत आले नाहीत.

घेरावनंतर संचालकांनी तातडीने आय. आय. टी. किमान महिन्यासाठी बंद केले व विद्यार्थ्यांना खोल्या खाली करावयास सांगितल्या. पुढे काय ? तर सगळयात कहर म्हणजे आय. आय. टी. च्या विद्यार्थी चिटणीसाने आता पत्रक काढून ४ विद्यार्थ्यांच्या संदर्भातील संचालकांचा निर्णय (त्यांना काढण्याचा) विद्यार्थ्यांना मान्य असल्याचे म्हटले आहे. म्हणजे आता आंदोलनाचे काही कारणच उरलेले नाही. असे होते तर आधी आंदोलन का झाले ? व आता विद्यार्थीनेते एकदम मागे कसे हटले ? असा प्रश्न कोणाच्याही मनात येईल.

परंतु असे समजते की, सर्व विद्यार्थी या आंदोलनात सहभागी नव्हतेच. हा उपद्व्याप करणारे विद्यार्थी व त्यांचे बोलवते धनी हे एका राजकीय विचारप्रणालीचे होते हे निःसंशय ! सध्या मात्र आय. आय. टी. बंद आहे. त्या 'चार' विद्यार्थ्यांनी आय. आय. टी. न सोडल्यास पुढे काय ? हा प्रश्न आहेच.

परंतु या निमित्ताने काही प्रश्न उपस्थित झाले आहेत. एक म्हणजे प्रचलित कायदे मोडून भलत्याच मार्गाने आपले प्रश्न (?) जर मूठभर विद्यार्थी मांडू लागले तर ते चालणार काय ? असे जर चालू लागले तर आय. आय. टी. सारख्या दर्जेदार शिक्षणसंस्थेचे सर्वसामान्य विद्यालयात रूपांतर व्हायला वेळ लागणार नाही व ते सर्वांचेच दुर्दैव असेल !

दुसरी गोष्ट म्हणजे ५० हजार रुपये खर्च

करून आपली शक्ती, वेळ व पैसा 'मूड इंडिगो' सारख्या कार्यक्रमात खर्च करणारे आय. आय. टी. चे विद्यार्थी कोणत्याही क्षुल्लक भानगडीत आपला वेळ, पैसा व शक्ती खर्च करीत राहणार काय? 'मूड इंडिगो' मुळे कदाचित त्यांना आनंद मिळत असेल; परंतु महिनाभर (सध्या तरी) ही शिक्षणसंस्थाच बंद राहिल्याने ना विद्यार्थ्यांना आनंद ना संचालकांना ना शिक्षणप्रेमींना!

या सर्व गोष्टीत एका व्यक्तीचे अभिनंदन करणे आवश्यक आहे. ते म्हणजे संचालक श्री. डे यांचे! त्यांनी योग्य व तातडीने पावले टाकून प्रकरण आटोक्याबाहेर जाऊ दिले नाही. ज्या वेगाने त्यांनी ही परिस्थिती हाताळली, त्यामुळे तथाकथित विद्यार्थी-नेत्यांना हुल्लडबाजीची संधीच मिळाली नाही.

तूर्त तरी आय. आय. टी. बंद आहे. सर्व विद्यार्थ्यांनी आपापल्या खोल्या खाली केल्या आहेत. संस्थेतील परदेशी विद्यार्थ्यांनी आपली सोय मुंबईतील निरनिराळ्या हॉटेल-मध्ये केली आहे. प्रश्न तात्पुरता सुटला आहे; परंतु अशा प्रकारच्या बूड नसलेल्या गोष्टी करण्याचा मोह काही विद्यार्थी नेत्यांना होणारच नाही असे नव्हे. तेव्हा संबंधितांना सावधान राहावे लागेलच. रचनात्मक कार्य करणाऱ्या चांगल्या विद्यार्थीसंघटना या संदर्भात काय करणार आहेत? ※

## □ जागरूक महिलांचा आवाज

दि. ७ मार्च रोजी मंत्रालयाकडे जाणारे रस्ते महिला फेडरेशन, स्त्री मुक्ति-आंदोलन व इतर महिला संघटनांच्या हजारो कार्यकर्त्यांनी व्यापले होते. स्त्रियांवरील अत्याचारांना वाचा फुटावी व देशभर ठिक-ठिकाणी होणारी बलात्काराची प्रकरणे लोकांच्या नजरेसमोर यावीत असा या मोर्चाचा हेतू होता.

मोर्चा सुरू होण्याआधी ओव्हल मैदाना-जवळ या संघटनांतर्फे एक अभिनव प्रदर्शन मांडण्यात आले होते. या प्रदर्शनाचा हेतू बऱ्याच प्रमाणात सफल झाला असे म्हणता येईल. कारण गुलामगिरीत अडकलेली 'स्त्री' या प्रदर्शनातून व्यवस्थितपणे लोकां-समोर आली.

'बलात्कार विरोधी मंच' नुकताच स्थापन करण्यात आलेला आहे. या मंचाचा उद्देश बलात्काराला आळा घालण्यासाठी विविध स्तरावर संघर्ष करणे व लोकजागृती करणे हा आहे. मोर्चात ही गोष्ट स्पष्टपणे दिसून आली. समाजातील सर्व तऱ्हेच्या महिलांचे प्रतिनिधित्व या मोर्चात दिसून येत होते. अगदी झोपडपट्टीतील अशिक्षित महिलांपासून ते स्त्री मुक्तिआंदोलनातील कार्यकर्त्यांपर्यंत महिला यात मोठ्या संख्येने सामील झाल्या होत्या.

विशेष गोष्ट म्हणजे आंतरराष्ट्रीय महिला-दिनानिमित्त (दि. ८ मार्च) निघालेल्या या मोर्चाने अनेकांची वाढवलेली उत्सुकता! ही गोष्ट लक्षात येण्याचे कारण म्हणजे सर्वसाधारणपणे चर्चगेट ते व्ही. टी. परि-सरात हिंडणाऱ्या नागरिकांना 'मोर्चा' या प्रकाराचे कौतुक नसते; परंतु या मोर्चाच्या वेळी लोक, विशेषतः महिला मोठ्या संख्येने या मोर्चासंबंधी चर्चा करताना दिसल्या.

काळा घोड्याजवळ पोलिसांनी हा मोर्चा अडवल्यावर त्याचे सभेत रूपांतर झाले. त्या प्रसंगी बोलताना माजी खासदार मृणाल गोरे यांनी स्त्रियांचे पारंपारिक दुःख वेशीवर आणल्याबद्दल या उपक्रमाचे अभिनंदन केले. स्त्रियांकडे बघण्याचा विकृत दृष्टिकोन बदलण्याची गरजही त्यांनी प्रतिपादन केली.

त्यानंतर श्रमिक महिला संघाच्या वतीने माजी खासदार श्रीमती अहिल्या रांगणेकर यांचे भाषण झाले. त्यांनी आपल्या मुद्देसूद भाषणात अनेक गोष्टींचा ऊहापोह केला. पोलीस व बलात्कार या संदर्भात बोलताना त्यांनी सांगितले की, कोणत्याही आरोपी स्त्रीला रात्री-बेरात्री पोलीसचौकीवर बोलावले जाऊ नये. त्यांनी मोर्चाची प्राति-निधिक अशी आणखीन् एक मागणी केली की, बलात्काराचा खटला खुल्या कोर्टात न चालवता तो बंदिस्त कोर्टात चालविला जावा.

भारतीय महिला फेडरेशनतर्फे झालेले श्रीमती मंजू गांधी यांचे भाषण समयोचित होते. त्यांनी अत्याचारित महिलांना सांगितले की, 'बेअदबी होईल या भीतीने बलात्कारा-सारख्या हीन कृत्यावर त्यांनी पांघरुण घालू नये. तसे करणे योग्य होणार नाही.'

हा मोर्चा जसा वैशिष्टयपूर्ण व महत्त्वाचा होता, तसेच या समयी वाटण्यात आलेली पत्रकेही 'बलात्कार व कायदा' असे नाव असलेली एक इंग्रजी पुस्तिका या प्रसंगी वाटण्यात आली. बलात्काराच्या संदर्भात कायद्यातील वैगुण्य व त्यात सुधारणा कर-ण्याची असलेली गरज व इतर संबंधित गोष्टी यांना या पुस्तिकेत स्थान आहे. या पुस्तिकेच्या मागे काढलेले बलात्कार व कायदा या विषयावरील व्यंगचित्रही झोंब-णारे आहे. या व्यंगचित्रात असे दाखविले आहे की, एक पोलीस इन्स्पेक्टर न्यायालयात असे म्हणतो आहे की, जर तुम्हाला 'बला-त्कारातून सुटका हवी असेल तर त्याचा प्रतिकार करू नका!' व न्यायाधीश पुढे असे सांगत आहे की, 'ज्या अर्थी तुम्ही प्रतिकार करीत नाही, त्या अर्थी 'तो' (बलात्कार) तुम्हाला हवा आहे.' हे व्यंग-चित्र म्हणजे कायद्यातील पळवाटेवर ठेवलेले बोटच आहे.

या मोर्चासमयी विकण्यात आलेली आणखी एक पुस्तिकाही चिंतनीय आहे. मराठीतील या पुस्तिकेत बलात्काराच्या प्रश्नाची सर्व दृष्टींनी व सांगोपांग चर्चा केली आहे. राजकन्या व राक्षस यांची गोष्ट लहानपणापासून स्त्रीमनावर बिंबवण्यात येते, हे सांगून जात्याच स्त्री दुबळी आहे असा प्रचार करणाऱ्या समाजाविरुद्ध या पुस्तिकेत कोरडे ओढण्यात आले आहेत.

गेल्या वर्षातील काही महिन्यांत उत्तर-प्रदेशापासून ठिकठिकाणी स्त्रियांवर कसे व कोठे बलात्कार झाले याची तपशीलवार माहिती देऊन वाचकांना 'या प्रश्नाचा विचार करा' असे सुचविण्यात आले आहे. 'बलात्कार' या विषयात कायदेशीर अड-चणी सरकारने निवाराव्यात व असहाय स्त्रियांना न्याय देण्यात यावा अशीही प्रमुख मागणी आहे.

कोणत्याही राजकीय पक्षाचा झेंडा नस-लेली ही चळवळ सध्या तरी पूर्णपणे अराज-कीय दिसत आहे. त्यांच्याच म्हणण्याप्रमाणे भारतीय स्तरावर या प्रश्नाचा विचार करण्यासाठी ठिकठिकाणी लोकजागृतीचे कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहेत. एकूण महिलादिननिमित्त निघालेला हा मोर्चा म्हणजे अनेक शतके ठसठशीत राहिलेली ही जखम बरी करण्यासाठी औषधयोजना

मलपृष्ठ १ वर

# जनता पक्ष
## विघटनातून पुढची वाट

वा. दा. रानडे

जगजीवनराम यांच्या पक्षत्यागाने अखेर जनता पक्ष दुसऱ्यांदा फुटला ! पहिल्या फुटीप्रमाणेच ही दुसरी फूटही दुहेरी सभासदत्वाच्या म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंध ठेवण्याच्या प्रश्नावरच पडली. काँग्रेस पक्षात दोनदा पडलेली फूट आणि जनता पक्षात दोनदा पडलेली फूट यात काही साम्य आहे का ? पक्ष विघटनाबाबत काही निष्कर्ष त्यातून काढता येतील का ?

काँग्रेस पक्षात पहिली फूट १९६९ साली म्हणजे १९६७ च्या निवडणुकीनंतर दोन वर्षांनी पडली. जनता पक्षातही पहिली फूट १९७७ च्या निवडणुकीनंतर दोन वर्षांनी पडली. पक्षाचे नेतृत्व बदलले नाही, तो समाजवादी कार्यक्रम धडाडीने हाती घेत आहे अशी प्रतिमा जनमनात निर्माण केली नाही तर पुढच्या निवडणुका काँग्रेस जिंकू शकणार नाही हे इंदिरा गांधींना स्पष्ट दिसू लागले होते. चौदा मोठ्या बँकांचे राष्ट्रीयीकरण आणि संस्थानिकांचे तनखे रद्द करणे ही धडाडीची पावले याच उद्देशाने त्यांनी टाकली. त्याचा अपेक्षित परिणाम जनमनावर झाला. त्यापाठोपाठ १९७१ च्या निवडणुकांचे वेळी 'गरिबी हटाओ'ची घोषणा त्यांनी दिली. ही बाई खरेच काही तरी करून दाखवील अशी आशा त्यांनी जनमनात निर्माण केली होती. त्यामुळे १९७१ च्या निवडणुकीत जनतेने त्यांना मोठा विजय मिळवून देऊन देशाची सूत्रे त्यांच्या हाती सोपविली. जुन्या नेतृत्वाची हकालपट्टी करून पक्षाची व देशाची सत्ता आपल्या हाती एकवटण्याचा इंदिरा गांधींचा उद्देश सफल झाला.

जनता पक्षात १९७९ साली फूट पाडणारांचे असेच काही उद्देश होते का ? या फुटीमागे पंतप्रधानपद मिळविण्याची चरणसिंगांची वैयक्तिक महत्त्वाकांक्षा होतीच; पण दुहेरी सभासदत्वाचा प्रश्न उपस्थित करून मधु लिमये यांनी त्याला तात्त्विक अधिष्ठान दिले. जनता पक्षाचा आणि सरकारचा दोन वर्षांचा अनुभव लक्षात घेता जनता पक्षाची अधिक पुरोगामी प्रतिमा उभी केल्याशिवाय पुढच्या निवडणुका आपण जिंकू शकणार नाही असे लिमये यांना स्पष्टपणे वाटू लागले होते. दुहेरी सभासदत्वाचा प्रश्न धसास लावून जनसंघाशी फारकत घ्यावी, जनसंघविरहित जनता पक्ष, डावे गट आणि काँग्रेस यांची आघाडी करून पुढच्या निवडणुका जिंकता येतील असा त्यांचा आडाखा होता; पण जनसंघ बाहेर जाण्याऐवजी भालोद आणि समाजवाद्यांतील लिमये–फर्नांडिस–गट यांनाच बाहेर पडावे लागले. बाहेर पडून आपण प्रभावी पर्यायी पक्ष उभारू हा त्यांचा अंदाज मात्र चुकला. जनता पक्षातल्या फुटीमुळे चरणसिंग यांना अल्पकाळ पंतप्रधानपद उपभोगायला मिळाले खरे; पण खरा फायदा इंदिरा गांधींचा होऊन त्यांना सत्तेवर येण्याची संधी मिळाली. काँग्रेस पक्षातल्या पहिल्या फुटीनंतर संघटना काँग्रेस अगदीच निष्प्रभ ठरून इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली प्रभावी पक्ष निर्माण झाला; पण जनता पक्षातल्या पहिल्या फुटीनंतर मात्र तसे घडले नाही. दोन्ही गट कमकुवत होऊन त्यांनी सत्ता गमावली !

१९७७ च्या निवडणुकीतील पराभवानंतर काँग्रेस पक्ष दुसऱ्यांदा फुटला. पक्ष पूर्णपणे आपल्या पकडीखाली राहण्याची शक्यता नाही असे दिसताच इंदिरा गांधींनी नवा पक्ष काढला आणि जुन्या संघटना काँग्रेसपेक्षाही चव्हाण–स्वर्णसिंग-अरस काँग्रेसची स्थिती त्यांनी अधिक दयनीय केली. फेब्रुवारी १९७८ च्या विधानसभा निवडणुकात आंध्र प्रदेश व कर्नाटक या दोन राज्यांची सत्ता इंदिरा काँग्रेसच्या हाती आली आणि चव्हाणांचा बालेकिल्ला मानला जाणारा महाराष्ट्र अर्धा जिंकून सत्तेत अल्पकाळ का होईना पण अर्धा वाटा तिने मिळविला आणि जानेवारी १९८० च्या निवडणुकीत सबंध देशाची सत्ता आपल्या हाती परत मिळविली. त्यानंतर आता सर्व राज्ये काबीज करण्यासाठी त्यांच्या हालचाली चालू आहेत. उलट जनता पक्षाच्या दुसऱ्या फुटीतून नवा प्रभावी पक्ष तर निर्माण होण्याची शक्यता दिसत नाहीच; पण पक्षाची शकले मात्र अधिकच दुबळी होणार आहेत ! मग नेते तसे बाह्यतः मान्य करोत किंवा न करोत.

जगजीवनबाबूंच्या पक्षत्यागानंतर तरी दुहेरी सभासदस्यत्वाचा प्रश्न संपून बाकीचा जनता पक्ष एकसंधपणे काम करील असे वाटत होते; पण हा प्रश्न पक्षाला अजूनही सतावत आहे. बावीस मार्चला बाबूजींच्या गटाचा मेळावा भरण्यापूर्वीच या प्रश्नाचा निर्णय व्हावा अशी मागणी दिनेशसिंगांनी केली आहे. कदाचित अनुकूल निर्णय झाला तर बाबूजींचा पक्षाबाहेर पडण्याचा बेत बदलेलही असे त्यांना वाटत असावे; पण अशी आशा बाळगण्यात काही अर्थ नाही. कारण दोन्ही बाजूंच्या आग्रही भूमिका लक्षात घेता उभयमान्य तोड निघणे कठीण आहे. बावीस मार्चलाच रा. स्व. संघाच्या प्रतिनिधिसभेची बैठक नागपूरला आहे. जनता पक्षाने आता या प्रश्नावर काहीही निर्णय न घेता या प्रतिनिधि-सभेवरच तो सोपवावा अशी सूचना जनसंघाच्या काही नेत्यांनी केली आहे. दिनेशसिंगांना ते मान्य नाही. जनता पक्षासंबंधीचे निर्णय त्या पक्षानेच घेतले पाहिजेत. रा. स्व. संघाच्या प्रतिनिधी-सभेवर ते सोपविणे म्हणजे बाहेरच्या केंद्राचे अधिकार मान्य करण्यासारखेच आहे असे त्यांना वाटते.

रा. स्व. संघाशी संबंध नको आणि त्या संघटनेशी निगडित असणाऱ्या गटांशीही संबंध नको असे या साऱ्या पक्षांना का वाटते ? त्यांचे चुकत आहे की रा. स्व. संघाचे चुकते आहे ? की दोघांचेही चुकते आहे ? की रा. स्व. संघावर वेळीअवेळी जातीयवादाचा आरोप केल्याशिवाय आपला पुरोगामीपणा सिद्ध होत नाही असा या साऱ्या पक्षांचा समज आहे ? रा. स्व. संघाचे स्वरूप खरोखरच बदलत आहे की बदलाचा केवळ देखावा केला जात आहे ? आणीबाणीत जो चांगला अनुभव जयप्रकाशजींना रा. स्व. संघाबद्दल आला त्याला काहीच महत्त्व नाही का ? या साऱ्या प्रश्नांची उत्तरे कोणतेही पूर्वग्रह मनात न बाळगता आपणच खुल्या मनाने शोधायची आहेत. साऱ्याच प्रश्नांची उत्तरे एकदम मिळतील असेही नाही. त्याबद्दल घाई करण्याचेही कारण नाही. इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील एकाधिकारशाही प्रवृत्तीविरुद्ध सामना देताना रा. स्व. संघ आपल्याबरोबर यायला तयार आहे की नाही आणि तयार असेल तर आपण त्याला बरोबर घेणार की नाही हा खरा महत्त्वाचा प्रश्न असून बाकी सर्व प्रश्न त्याच्याशी निगडित आहेत. या साऱ्या प्रश्नांचा विचार करताना रा. स्व. संघामध्येही एकाधिकारशाही प्रवृत्ती आहे हे विसरता येणार नाही. तरीही इंदिरा नेतृत्वाखालील एकाधिकारशाहीचा धोका सर्वांत मोठा आहे. त्याविरुद्ध सर्वांनी एकजुटीने कार्य करणे हे आजच्या परिस्थितीचे आपणा सर्वांना आव्हान आहे. या एकत्रित कार्यातून रा. स्व. संघातही कदाचित चांगले बदल होतील, कदाचित होणार नाहीत; पण प्रयोगाला आपली तयारी हवी. □

## बगाड (११)

# मराठी सत्तेची संध्याकाळ

बध्या

एक सत्ता जाऊन दुसरी सत्ता येते ती कशामुळे ? मूळ सत्ता जुलमी असते, भ्रष्ट असते यामुळे, की नवी सत्ता अधिक कार्यक्षम आणि कर्तबगार असते म्हणून ? सत्तांतर होण्यात प्रजेचा वाटा किती असतो ? तिच्या औदासीन्यामुळे नवी सत्ता स्थिरावते, की तिने केलेल्या बंडामुळे जुनी सत्ता संपते ? आजकाल लोकशाही राज्यपद्धतीमुळे प्रजेचा सत्तेत साक्षात् सहभाग ही कल्पना प्रत्यक्षात आली आहे; पण जेव्हा सत्ता आनुवंशिक पद्धतीने एकाच घराण्यात चालत राही तेव्हा सत्तांतर कोणत्या कारणांमुळे होत असे ?

मराठी सत्ता नाहीशी होऊन येथे इंग्रजी सत्ता आली या घटनेच्या संदर्भात वरील प्रश्नांचा ऊहापोह नुकताच करण्यात आला. प्रसंग होता बापू गोखले या मराठी राज्याच्या शेवटच्या सेनापतीच्या श्राद्धदिनाचा. जागा अर्थातच भारत इतिहास संशोधक मंडळ ! प्रमुख वक्ते होते नगरच्या सारडा कॉलेजचे प्राचार्य सदाशिवराव आठवले. त्यांचे व्याख्यान इतके विचारप्रक्षोभक झाले की भाषणाच्या शेवटी मोठाच वाद उपस्थित होऊन मोजकाच श्रोतृवर्ग वादाच्या दोन्ही बाजूंत विभागला गेला.

भा. इ. सं. मध्ये नेहमी ठराविक मंडळीच दिसायची. मनुष्य वयोमानानुसार प्रवाहामधून बाहेर फेकला जातो; मागे पडतो. का कोण जाणे पण चालू समाजाला तो लोढणे झाल्यासारखा वाटू लागतो. अगदी नामांकित व्यक्तींची अशी स्थिती झाल्याचे आपण अनेकदा पाहतो. काही जण तरीही स्वतःला इतरांवर लादण्याचा प्रयत्न करतात; मला अध्यक्ष करा, मला बोलवा असे फोन करतात. सभा-संमेलनात घोटाळत राहतात. उत्सवमूर्ती ऐन वेळेस न आल्यास आपल्याला व्यासपीठावरची खुर्ची मिळेल अशी अपेक्षा ठेवतात. त्याहून समंजस माणसे आपली मुकाटपणे भा. इ. सं. मं. मध्ये येऊन बसतात किंवा टिळक महाराष्ट्र विद्यापीठात सामील होतात. तिथे त्यांचे स्वागत होते की नाही, ते माहीत नाही; पण तुम्ही इथे नकोत, असे सुचवले तरी नक्कीच जात नाहीत.

भा. इ. सं. मं. आणि टि. म. वि. या दोहोंची अशी सुपर-अॅन्युएटेड व्यक्तींची ठिकाणे म्हणून प्रसिद्धी असल्याने तिथे खूपदा मनोरंजक आणि बोधप्रद चर्चा, व्याख्याने होत असूनही मोजकीच आणि ठरलेली मंडळी गोळा होतात. परवा नेहमीपेक्षा वेगळे म्हणजे नानासाहेब गोरे हजर होते. याच्यावरून नाना निष्कर्ष माणसे काढतील ! पण मला तरी सदाशिवराव आठवले यांच्या व्याख्यानाला नानासाहेबांनी उपस्थित राहणे हा त्यांच्या चोखंदळपणाचा पुरावाच वाटतो. असो.

तर मुद्दा होता की, मराठी सत्ता इंग्रजीसत्तेपुढे कशामुळे हरली ?

### लोकाभिमुखता

मराठी सत्ता बुडाली याचे प्रमुख आणि कधीकधी एकमेव कारण असे दिले जाते की, आधुनिक शस्त्रे, आधुनिक ज्ञान, अर्वाचीन विद्या यांची उपासना मराठ्यांनी केली नाही. इंग्रजांच्या मानाने ते फार मागासलेले होते. म्हणून पाश्चात्य संस्कृती आणि विज्ञान यांच्यापुढे त्यांचा निभाव लागला नाही. दुसरेही एक कारण असे देतात की, एकंदर हिंदू समाजाच्या जाती-जातींतून अनेक चिरफळ्या झाल्याने तो एकसंध उरला नव्हता. तीच स्थिती मराठी समाजाचीही होती. त्यामुळे मराठी राज्य इंग्रजांच्या प्रहारापुढे मातीची मूर्ती फुटावी तसे फुटले! ही दोन्ही कारणे थोडीफार खरी असली तरी ती मराठी सत्तेच्या ऱ्हासाची प्रमुख कारणे नव्हेत असे प्राचार्य आठवले यांनी स्पष्टपणे सांगितले. मराठी राज्यातील कर्त्या पुरुषांत भांडणे होती; ती विकोपाला जाऊन लढायाही होत होत्या; क्वचित् प्रसंगी रागाच्या भरात विरोधकाच्या जातीचा उद्धारही होत असे. या सर्व गोष्टी खऱ्या असल्या तरी जातीयवाद ज्याला म्हणता येईल असा वाद मराठी राज्यात नव्हता. कारण जातीवरून सरदारांचे तट पडत नव्हते. तोच प्रकार वैज्ञानिक प्रगतीचा. मराठे विज्ञानात इंग्रजांचे मागे असले तरी इंग्रजांची प्रगती निर्णायक ठरावी इतकी झालेली नव्हती.

पूर्वीच्या काळी सत्ता संपुष्टात येण्याची अनेक कारणे असत. साथीचे रोग येत आणि सारे राजघराणे मृत्युमुखी पडे; पूर किंवा दुष्काळ अशा नैसर्गिक आपत्तींनी देश उजाड बने आणि राजवंश उरला तरी राज्यच उरत नसे; बाहेरून संहारक रानटी टोळ्यांचे जबरदस्त हल्ले होत आणि त्यापुढे कोणतीच सत्ता टिकण्याचा संभव नसे. अशा दैवी आपत्ती सोडल्या तर राज्य नाहीसे होण्याचे दुसरे कारण म्हणजे आनुवंशिकतेने निष्कर्तृत्व, चैनी, विलासी, लंपट, जुलमी, अत्याचारी असा पुरुष गादीवर येई. प्रजा गांजून जाई. प्रजेच्या राजवटीविषयीच्या औदासीन्याचा किंवा कधीकधी विद्रोहाचा फायदा घेऊन दुसरा एखादा कर्तृत्ववान, उमदा, प्रजावत्सल, महत्त्वाकांक्षी पुरुष सिंहासन हस्तगत करून नव्या राजवंशाची स्थापना करी. नंद, मौर्य, गुप्त, शुंग, कण्व, चालुक्य, राष्ट्रकूट वगैरे घराण्यांच्या सत्ता अशाच स्थापन झाल्या आणि संपल्या. सारांश लोकशाही, लोककल्याण, लोकांचा सत्तेतील सहभाग या कल्पना प्रसृत झालेल्या नव्हत्या तेव्हाही सिंहासनाचे अधिष्ठान प्रजेने केलेला राजवटीचा स्वीकार हेच होते. लोकाभिमुखता जितक्या अंशाने राजापाशी असे तितक्या अंशाने ते राज्य प्रजेला स्वीकारार्ह वाटे.

ही लोकाभिमुखतेची कसोटी मराठी राज्याला लावली तर काय दिसते ? ही सत्ता त्या कसोटीला कितपत उतरते ?

### लुटारूंचे राज्य

छत्रपती शाहूंच्या आगमनापासून मराठी राज्य स्वतंत्र असे नव्हतेच. ते मोगलांच्या

मांडलिकांचे राज्य होते. शिवाजीच्या राज्यात आणि या नव्या राज्यात असलेला हा फरक केवळ तांत्रिक नव्हता. एका मोठ्या ध्येयापासून मराठी समाज आणि मराठी विचार ढळल्याचा तो द्योतक होता. परिणाम असा झाला की, शिवकालीन ध्येयवाद नाहीसा होऊन मराठी राज्य न राहता मराठी सत्ता किंवा निरनिराळ्या प्रमुख सरदारांची दौलत असे त्या राज्याचे स्वरूप झाले. राज्याचे राज्यपण जाऊन सत्तेत रूपांतर झाल्यामुळे प्रजेचे प्रजापण जाऊन शिरजोरांना उपभोगाची साधने पुरविणारे गुलाम अशी लोकांची स्थिती झाली.

मराठी राज्याच्या अखेरीला तर अनेक केंद्रांत विभागलेल्या मराठी सत्तेला एकच उद्योग उरला होता; तो म्हणजे लूटमार! महाराष्ट्राबाहेरच्या विभागांना तर मराठ्यांची ही लूटमार असह्य झाली होती. मराठ्यांनी महाराष्ट्राबाहेरच्या सत्ताधीशांचा पराभव करावा, खंडणी घ्यावी हे समजू शकते; पण तिथल्या प्रजेला लुटावे, नागवावे, अकिंचन करून सोडावे याला काय म्हणावे? त्यामुळे परप्रांतातील हिंदु प्रजा मराठ्यांना आपलीशी करता आली नाही. त्याचा फटका पानिपतावर बसलाच. एक अमराठी सत्ता परक्या अब्दालीविरुद्ध मराठ्यांच्या मदतीला आली नाही.

परंतु एवढ्याने मराठी सरदार शहाणे झाले नाहीत. त्यानंतरही परप्रांतांवर स्वाऱ्या करताना त्यांनी लूट हाच मुख्य हेतु ठेवला. पुढे परप्रांतांवर स्वाऱ्या करण्याजोगी परिस्थिती उरली नाही, तेव्हा त्यांनी मराठी जनतेलाच लुटायला सुरुवात केली. शेवटच्या बाजीरावाच्या काळात असे उल्लेख सापडतात की, पुण्यातल्या प्रतिष्ठित श्रीमंतांची यादी पेशवा तयार करी. दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांच्या वाड्यांवर धाडी पडत. चीजवस्त पेशवा जप्त करी आणि त्या गृहस्थाची बायको आवडली तर तिलाही शनिवारवाड्यावर घेऊन जाई! आप्पा बळवंत मेहेंदळ्यांसारख्या मातब्बर सरदाराने या बेअब्रूच्या भीतीने 'अमृतप्राशन' करून जीव दिला!

या लुटारूपणाच्या जोडीला भ्रष्टाचाराचा बुजबुजाट होताच. मंत्र्युत्तम नाना फडणीस यांना लांचेच्या चिठ्ठ्या येत. कोणास मामलेदारी दिल्यास मामलेदारीचे एक वर्षाचे उत्पन्न नानास लांच म्हणून द्यावे लागे. एकदा सैनिकांना घोडे वाटण्यात आले. तेव्हा प्रत्येक घोड्यामागे नानाने दोन-दोन रुपये सैनिकांकडून वसूल केले. नानांच्या लाडक्या नायकिणीच्या साजिंद्याला कर माफ असे. इतकेच काय, पण खर्ड्याच्या लढाईत निजामाचा संपूर्ण पराभव झाल्यावर त्याचे राज्य संपवून टाकावे अशी सार्वत्रिक मागणी असताना नाना फडणिसाने निजामाकडून जहागिरीची लाच घेतली आणि त्याचे राज्य कायम ठेवले!

अशा तऱ्हेचे लुटीवर जगणारे आणि भ्रष्टाचाराने पोखरलेले राज्य कधी ना कधी जाणारच होते. प्रजेच्या निष्ठेचे अधिष्ठान त्या राज्याला मिळणारच नव्हते. मराठी राज्य संपवून इंग्रजी राज्य आल्याने उलट प्रजेला दिलासाच मिळाला आणि तिची पहिली प्रतिक्रिया इंग्रजांचे स्वागत करावे अशीच होती!

## कर्तबगारीला सारे माफ असते!

सभेला उणेपुरे पन्नास-साठ लोकच हजर होते. सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे बहुतेक सर्व जण जोर ओसरलेल्यांपैकीच होते. त्यातल्या अनेकांना घरी गेल्यावर आखडलेल्या अवयवांना सैल करण्यासाठी गरम पाण्याच्या पिशव्यांची तरतूद करावी लागत असणार असे वाटत होते; परंतु अशी ही सभा देखील प्राचार्य आठवल्यांच्या या घणाघाती आणि निर्भीड व्याख्यानाने तापल्यासारखी झाली. बहुसंख्य श्रोते हे फ्रिजमध्ये पडल्यात जमा असे असले तरी पावणेदोनशे वर्षांपूर्वीच्या राज्यकर्त्यांशी असलेले आपले नाते त्यांना आठवत होते आणि त्याचा अभिमानही त्यांना होता. त्यामुळे सभेत एकच कुजबूज सुरू झाली. त्या कुजबुजीच्या अनेक लाटा एकत्र होत आठवल्यांच्या विरुद्ध कोलाहलाचा आणि त्वेषाचा एक भोवरा उभा राहिला.

वातावरण असे गढूळ बनले असताना तात्या खरे अध्यक्षीय समारोपासाठी उभे राहिले. तात्यांचा आवाज मुळातच चिरका असून त्यांना आता वृद्धापकाळानुसार कंपही निर्माण झाला आहे. तरीपण इतिहासातील तपशिलावर त्यांची जबरदस्त पकड असल्याने त्यांच्या व्याख्यानात मनोरंजक चुटके नेहमीच ऐकायला मिळतात. वक्त्याने मांडलेल्या तात्त्विक मुद्द्याला चपखळ अपवाद ठरेल अशी हकीकत ते तत्काल सांगून जातात. पोतदारांचेही असेच होते. तपशिलाच्या भाराने वाकलेला हा इतिहासाचा अभ्यास कितपत फलदायी आहे असा प्रश्न मला नेहमीच पडतो.

खऱ्यांनी प्राचार्य आठवल्यांनी मराठी राज्याला लावलेली लोकाभिमुखतेची कसोटी कालाच्या संदर्भात कितपत वाजवी आहे, असा प्रश्न केला. त्यांचे म्हणणे असे की, पूर्वी प्रजा राजाला निराळ्या कोटीतला मनुष्य समजत असे. तो जे करील त्याची शहानिशा करण्याचा आपल्याला अधिकार नाहीच, असे प्रजा मानीत होती. त्यामुळे राजकारणाविषयी ती उदास असे. म्हणून अमुक राजवटीचा ती स्वीकार करत होती किंवा ती राजवट उलथून पाडणाऱ्याला ती शाबासकी देत होती अशातला भाग नाही. मुसलमान राज्यकर्ते काय जुलमी आणि भ्रष्टाचारी नव्हते? आणि इंग्रज तरी काय धुतल्या तांदळासारखे स्वच्छ थोडेच होते?

दुसरे असे की, जुलूम कशाला म्हणायचे? आज आपण साखरेची किंमत रुपयाने वाढली किंवा कर एखाद्या टक्क्याने वाढवला तरी जुलूम झाला असे म्हणतो आणि मोर्चे काढतो; पण पूर्वी तसे नव्हते. ज्या गोष्टी आज अमानुष वाटतात त्या तेव्हा सर्रास होत होत्या. एखादा कायदा अगदीच अडचणीचा वाटला तर हरताळ पाळत असत; पण एरवी राज्यकर्ते करतील ते मुकाट सोसणे एवढाच शिरस्ता होता. तेव्हा मराठे जुलमी होते म्हणून त्यांच्या राज्याच्या अपहरणाचे स्वागत जनतेने केले या म्हणण्यात जरा अतिशयोक्ती आहे.

राज्य गेले ते जुलमामुळे नाही किंवा भ्रष्टाचाराने नाही. ते कर्तबगारीच्या अभावाने आणि इंग्रजांच्या शस्त्र-सामर्थ्यामुळे गेले. राजा कर्तबगार असला की, त्याचा जुलूम, भ्रष्टाचार, अनीती सारे खपते; पण निष्कर्तृक राजा शिरजोरांच्या हातून उखडला गेला की, तो जुलमी, दुराचारी आणि भ्रष्ट ठरतो!

हल्लीच्या अनुभवाने मला प्राचार्य आठवल्यांपेक्षा तात्या खऱ्यांचेच मत अधिक पटते! □

# अस्वस्थ आसाम

**लेखांक तिसरा** — **विनय सहस्रबुद्धे**

## एक काचार जिल्हयाचा अपवाद वगळता अन्यत्र कुठेही अमुक एक समाजघटक आंदोलनापासून अलिप्त राहिला असं झालं नाही.

आसामातील सध्याच्या जनआंदोलनाची विस्तृत पार्श्वभूमी गेल्या दोन लेखांकांतून स्पष्ट झाली आहे. या लेखांकात या जनआंदोलनाची सुरुवात कशी झाली आणि ते कसे विकसत गेले ते पाहायचे आहे. हे आंदोलन चालविणाऱ्या ऑल आसाम स्टुडंटस युनियनचे अध्यक्ष प्रफुल्लकुमार महंता यांची मुलाखतही या लेखांकासोबत आहे, ती आंदोलनाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणारी आहे.

ज्या विदेशी नागरिकांच्या समस्येवर हे आंदोलन उभे राहिले ती विदेशी नागरिकांच्या प्रचंड प्रमाणावरील घुसखोरीची समस्या आमजनतेसमोर ठळकपणे आली ती तत्कालीन जनता सरकारमुळेच. १९७८ च्या निवडणुकीत राज्यात जनता पक्ष सत्तेवर येण्यापूर्वी आसाम सातत्याने काँग्रेसची साथ करीत राहिला आहे. आणीबाणीत आसामात मुख्यमंत्री शरदचंद्र सिन्हांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचीच राजवट होती. याच सिन्हांनी आणीबाणीत इंदिरा-संजय यांना खुश करण्यासाठी गोहाटीत अ. भा. काँग्रेसचे अधिवेशन भरविण्यात पुढाकार घेतला व खास 'जवाहरनगर' उभारून हे अधिवेशन मोठ्या थाटामाटात पार पाडले. मात्र आणीबाणीत हुकुमशाहीचा वरवंटा या राज्यात फारसा जाचकपणे फिरला नाही, म्हणूनच १९७७ च्या जनतालाटेतही आसामातील लोकसभेच्या १३ पैकी १० जागा काँग्रेसनेच जिंकल्या.

आसाम हा काँग्रेसचा परंपरागत बालेकिल्ला राहण्यात बांगलादेशीय घुसखोरांनी डोळे झाकून सतत काँग्रेसलाच केलेल्या मतदानाचा मोठा वाटा आहे. या संदर्भात आसामातील एका ज्येष्ठ पत्रकाराने दिलेली माहिती उल्लेखनीय आहे. या पत्रकाराच्या सांगण्यानुसार श्री. देवकांत बरुआंसह अनेक काँग्रेसी नेत्यांना परकीय नागरिकांच्या या हमखास मिळणाऱ्या मतांची इतकी छातीठोक खात्री असे की, खुद्द देवकांत बरुआच एकदा म्हणाले होते की, 'माझ्या मतदारसंघात मी हिंदू मतांची अजिबात पर्वा करीत नाही. मुस्लिमांचीच केवळ मते मिळाली तरी मी सहज निवडून येईन !' बरुआंच्या त्या मतदारसंघातले सर्व परकीय घुसखोर एकजात मुस्लिम होते हा तपशील नोंद घेण्यासारखा आहे.

१९७८ मध्ये आसामात विधानसभेच्या निवडणुका झाल्या; पण या वेळी प्रथमच काँग्रेसला आपलं बहुमत गमवावं लागलं. याला प्रामुख्याने काँग्रेसमधील फूट कारणीभूत आहे. देवकांत बरुआ, श्रीमती रशिदा हक् चौधरी, शरदचंद्र सिन्हा, वेदव्रत बरुआ ह्या काँग्रेसनेत्यांनी स्वर्णसिंग काँग्रेसमध्ये राहणे पसंत केले तर ललितकुमार दोले, तरुण गोगोई, श्रीमती अबिदा अहमद, अनुरा तैमूर प्रभृतींनी इंदिरा काँग्रेसचा आश्रय घेतला. ज्येष्ठ नेते दोन गटात विभागले गेल्याने आणि देशातील कांग्रेसविरोधी जनतालाटेचो

जाणीव झाल्याने आसामात प्रथमच सत्ताधारी काँग्रेस पराभूत झाली. १२९ सदस्यांच्या विधानसभेत जनताला पूर्ण बहुमत मिळू शकले नाही. मार्क्सवादी कम्युनिस्ट व काही अपक्षांच्या पाठिंब्यावर सरकार स्थापन करण्यात मात्र यश मिळालं.

जनता पक्षांतर्गत घटकांपैकी समाजवाद्यांचं काम या भागात इतरांपेक्षा अधिक चांगलं होतं. अर्थात मुख्यमंत्रीपदासाठी संघटना काँग्रेसच्या नेत्या व तत्कालीन केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री श्रीमती रेणुका बारकातकी यांचेही प्रयत्न होते, तरीही समाजवादी नेते श्री. गोलप बोरबोरा यांच्यात गळचा अखेर नेतृत्वाची माळ पडली. जनता पक्षाच्या सत्ताग्रहणामुळे काँग्रेसची तीस वर्षांची सद्दी संपली आणि सत्तेवर येण्यासाठी काँग्रेसजन ज्या परकीय घुसखोरांना आश्रय देत असत त्यांचे हितसंबंध जपणारे सत्तेतून दूर झाले.

आसामात सत्तेवर येतानाच जनता पक्षाने परकीय नागरिकांना आसामातून घालवून देण्यासाठी प्रभावी उपाय करण्याचे आश्वासन दिले होते. सुदैवाने आधीच्या पंतप्रधानांपेक्षा त्या वेळचे पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी या प्रश्नाचे गांभीर्य अधिक चांगल्या प्रकारे ओळखले होते. त्यामुळे परकीय नागरिकांच्या समस्येवर सर्व उपाय योजण्याच्या सूचना तर त्यांनी राज्यसरकारला दिल्याच; पण या कामासाठी लागेल ती सर्व प्रकारची मदत केंद्रसरकारकडून देण्याचे आश्वासनही दिले.

मुख्यमंत्री गोलप बोरबोरा यांच्या जनतासरकारने या प्रश्नावर आधीपासून कडक धोरण ठेवले व सत्ताग्रहणानंतरच्या वर्षभरात काही छोटीमोठी पाउलेसुद्धा उचलली. या प्रश्नावर आसामच्या जनतेचे समाधान होण्यासाठी काही ठाम कृती करण्याचा राज्य-सरकारचा विचार असतानाच काँग्रेस खासदार हिरालाल पटवारी यांचं मार्च १९७९ मध्ये निधन झालं व त्यामुळे तिथे पोटनिवडणूक घेणं भाग पडलं. पटवारी जिथून निवडून आले त्या मंगलदेई लोक-सभा मतदारसंघात पोटनिवडणूक घेण्याची तयारी म्हणून एप्रिल–मे १९७९ च्या सुमारास मतदारसंघात याद्या अद्ययावत बनविण्याचं काम सुरू झालं. विदेशी नागरिकांच्या प्रश्नावर काही कृती करण्या-बाबत वचनबद्ध असलेल्या जनता सरकारनं या वेळी निवडणूक-याद्या तपासण्याचं काम अधिक काटेकोरपणे करायचं ठरविलं. जिथे पोट-निवडणुक होऊ घातली होती त्या मंगलदेई मतदारसंघात खास अधिकारी तैनात भरून, अवैध मार्गाने भारतात आलेल्या आणि स्थायिक झालेल्या परदेशी नागरिकांची नावे शोधण्यासाठी खास व्यवस्था केली गेली. याच दरम्यान ऑल आसाम स्टुडंटस् युनियनच्या मंगलदेई शाखेनेही सुमारे ७५ हजार नागरिकांच्या मतदारयाद्यांतील नावांना हरकत घेतली व या समस्येच्या सोडवणुकीसाठी जनमत तयार करण्याचे प्रयत्न सुरू केले.

मंगलदेई पोटनिवडणुकीच्या निमित्ताने विदेशी नागरिकांच्या समस्येवर काही ठाम पाउलं उचलण्यास राज्यसरकारनं सुरुवात केली यामागे आणखीही एक कारण आहे. एप्रिल १९७९ मध्ये या पोटनिवडणुकीची तयारी सुरू होण्यापूर्वी ऑक्टोबर १९७८ मध्ये उटकमंड येथे राज्यांच्या मुख्य निर्वाचन अधिकाऱ्यांची एक परिषद झाली होती. या परिषदेसमोर बोलताना मुख्य निर्वाचन आयुक्त श्री. शामलाल शकधर यांनी आसामातील 'चिंताजनक परिस्थितीचा' आवर्जून उल्लेख केला होता. आसामातील परकीय घुसखोरांच्या वाढत्या समस्येबद्दल चिंता व्यक्त करून ते म्हणाले होते की, 'या घुसखोरांच्या भारतातील बेकायदेशीर वास्तव्याबाबत ब्र देखील न काढता आणि त्यांच्या भारतीय नागरिकत्वाच्या मूलभूत प्रश्नाकडे डोळेझाक करून काही 'राजकीय नेते' या घुसखोरांची नावे मतदार-याद्यात घुसविण्याचे जे प्रयत्न करीत आहेत ते अधिक चिंताजनक आहेत.'

निर्वाचन अधिकाऱ्यांच्या या परिषदेनंतर काही दिवसांनी, म्हणजे नोव्हेंबर १९७८ मध्ये कायदामंत्र्यांच्या अनुपस्थितीत एका प्रश्नाला उत्तर देताना माजी रेल्वेमंत्री मधू दंडवते यांनी राज्यसभेत सांगितले होते की, ईशान्य भारतात आणि विशेषतः आसामात अवैधपणे घुसलेल्या बांगलादेशीयांची नावे मतदारयाद्यात घुसविण्यात आल्याची बाब निर्वाचन आयोगाच्या लक्षात आली आहे. ह्या प्रश्ना-वरील कारवाईबाबत आयोग विचार करीत असून दरम्यान बांगला देशीयांची ही घुसखोरी रोखण्यासाठी योग्य उपाययोजना करण्याचे आदेश गेल्या ऑगस्टमध्येच गृहमंत्रालयाने दिले आहेत.

## शकधर यांचा 'अबाउट टर्न'

श्री. शकधर व श्री. दंडवते यांच्या निवेदनांवरून हे पुरेसे स्पष्ट झाले आहे की, आसामातील या घुसखोरांची नावे मतदारयाद्यांत आहेत याची पूर्ण कल्पना केंद्र सरकारला आणि मुख्य म्हणजे निर्वा-चन आयोगालाही होती. अशा स्थितीत मंगलदेई मतदारसंघातील सुमारे पाऊण लाख मतदारांच्या वैधतेबद्दल आलेल्या आक्षेपांच्या छाननीला स्वतःच्या स्वायत्ततेची मधूनच जाणीव होणाऱ्या मुख्य निर्वाचन आयोगाचा विरोध असण्याचे कारण नव्हते. सुरुवातीला तसा तो नव्हताही ! एप्रिल-मे १९७९ च्या सुमारास राज्याच्या निर्वाचन अधिकाऱ्यांनी मतदारांच्या वैधतेला घेतलेल्या गेलेल्या आक्षे-पांची छाननी करून सुमारे ४० हजार मतदारांची नावे मतदार याद्यांतून काढून टाकण्याचा निर्णय घेतला. चाळीस हजार हा आकडा खूप मोठा वाटला तरी एवढ्या मोठ्या प्रमाणात घुसखोरी होणे अशक्य नाही. अप्पर आसामातील चहा आणि तागाच्या क्षेत्रांत मंगलदेई येत असल्याने हजारो बांगलादेशी या ना त्या मार्गाने या भागात घुसले असणे स्वाभाविक आहे.

मंगलदेई मतदारसंघातील ४० हजार मतदारांची नावे काढून टाकण्यात येत असल्याच्या सरकारी घोषणेमुळे या मागणीसाठी आंदो-लन करणारी विद्यार्थी संघटना व अन्य स्थानिक संघटनांचे नीतिधैर्य वाढते न वाढते तोच मुख्य निर्वाचन आयुक्त शामलाल शकधर यांनी 'एकाही मतदाराचे नाव वगळले जाणार नाही' अशी घोषणा करून एक बाँबगोळाच टाकला. उटकमंडच्या परिषदेत आसामातील घुसखोरांच्या समस्येवर चिंता व्यक्त करणारे हे महाशय एकदम 'अबाउट टर्न' करून नावे वगळण्याच्या विरोधात कसे गेले हे पाहणे उद्बोधक ठरेल.

मंगलदेई मतदारसंघातील मतदारांच्या याद्यांमधून विदेशी नाग-रिकांची नावे काढून टाकण्याची प्रक्रिया सुरू होत असतानाच या मतदारांवरच ज्यांचे राजकीय भवितव्य अवलंबून होते अशा अनेक राजकारणी पुढाऱ्यांनी हालचाली सुरू केल्या आणि थेट शकधर-

साहेबांकडे धाव घेतली. ' मंगलदेई मतदारसंघातील याद्यांमधून अनेक अस्सल भारतीय नागरिकांची नावे काढण्यात आली आहेत, भारतीयांनाही या परकीयांची नावे हुडकण्याच्या मोहिमेत सताविण्यात येत असून साक्षात जनता पक्षाच्या राजवटीत नागरिकांचे लोकशाही अधिकार हिरावून घेण्यात येत आहेत ' इ. प्रकारचा प्रचार सर्व माध्यमातून पद्धतशीरपणे सुरू झाला. काही जणांनी मुस्लिमांचीच नावे काढली जात आहेत असा कांगावा करून सरकारला बदनाम केले. या सगळ्या पद्धतशीर प्रचाराचा एकत्रित परिणाम मुख्य निर्वाचन आयुक्तांवर झाला आणि त्यांनी नावे वगळण्यास प्रतिबंध केला. खुद्द तत्कालीन पंतप्रधान मोरारजी देसाई या प्रश्नावर कोणत्याही तडजोडीच्या विरुद्ध असताना, आपल्या ' स्वायत्तपणाची ' तीव्र ' जाणीव असल्याने की काय, शकधरसाहेबांनी हा निर्णय तातडीने जाहीर केला. एवढ्यावर मुख्य निर्वाचन आयुक्त थांबले नाहीत ! त्यांनी यापुढे जाऊन असेही जाहीर केले की, ज्या ज्या व्यक्तींची नावे आज ( १९७७ च्या सुधारित याद्यांप्रमाणे ) मतदारयाद्यात आहेत ते ते सर्व भारताचे नागरिक आहेत असे समजण्यात येईल. वस्तुतः मतदारयादीत नाव असले की लगेच तेवढ्यावरच त्या व्यक्तीचे भारताचे नागरिकत्व सिद्ध होते असे नाही. अशा स्थितीत, आपल्या अधिकारकक्षेबाहेर जाऊन मतदारयादीतील सर्वांना भारतीय नागरिक म्हणून जाहीर करण्याचे निर्वाचन आयुक्तांना काहीही कारण नव्हते.

शकधर यांच्या या घोषणेमुळे असमियांच्या जखमेवर मीठ चोळल्यासारखे झाले. ऑल आसाम स्टुडंट्स युनियने या निर्णयाचा तीव्र निषेध केला आणि आंदोलनाचे रणशिंग फुंकले.

ह्या साऱ्या घडामोडींच्या दरम्यान केंद्रात मोरारजी देसाईंचे जनता सरकार कोसळले. त्यापाठोपाठ चरणसिंग सरकारनेही राजीनामा दिला आणि लोकसभा निवडणुकीची वाट पाहत, केंद्रात काळजीवाहू सरकारची राजवट सुरू झाली. केंद्रातील जनता सरकार जसे पक्षांतरामुळे कोसळले तसेच सप्टेंबर १९७९ मध्ये गोलप बोरबोरांचे मंत्रिमंडळही कोसळले. आसाम विधानसभेचे त्या वेळचे सभापती आणि मोरारजी देसाईंचे एके काळचे सहकारी जोगेंद्रनाथ हझारिका यांनी मुख्यमंत्री बोरबोरांविरुद्धच्या बंडाचे नेतृत्व केले. त्यातच चार-पाच मुस्लिम आमदारांनी बॅ. गुलाम उस्मानी यांच्या नेतृत्वाखाली राज्यात लोकदलाची स्थापना करून जनता सरकार अल्पमतात आणले. जनता सरकारच्या पतनानंतर अर्स कॉंग्रेस, इंदिरा कॉंग्रेस, मार्क्सवादी कम्युनिस्ट, उजवे कम्युनिस्ट इ. अर्धा डझन पक्षांच्या पाठिंब्यावर १६ जणांच्या नव्याने निर्माण झालेल्या, आसाम जनतादलाचे नेते श्री. जोगेन्द्रनाथ हझारिका यांचे मंत्रिमंडळ सत्तेवर आले.

दरम्यान विदेशी नागरिकांच्या प्रश्नावर मंगलदेईत सुरू झालेले आंदोलन राज्यवादी बनले आणि ऑल आसाम स्टुडंटस युनियन (आसू)च्या पुढाकाराने सुरू झालेल्या या आंदोलनाला सर्व स्तरांतून पाठिंबा मिळू लागला. विद्यार्थी संघटनेने सुरू केलेल्या या आंदोलनात 'परकीय नागरिकांची नावे मतदारयाद्यांतून काढून टाका आणि नंतर त्यांना आसामातून हाकलून द्या !' ही प्रमुख मागणी होती. त्यामुळे बांगला देशातून आलेल्या बंगाल्यांच्या वर्चस्वाखाली दबलेला, अपमानित झालेला, न्यूनगंडामुळे आत्मविश्वास हरवून असमिया समाज या एकाच मुद्द्यावर खऱ्या अर्थाने ' एकत्र ' झाला आणि विद्यार्थ्यांचे आंदोलन हळूहळू जनआंदोलन होण्यास सुरुवात झाली. मंगलदेई प्रकरणापूर्वी काही महिने आधी ' आसाम ' जातीयवादी (असमिया भाषेत जातीयवादी म्हणजेच राष्ट्रवादी) दल या एका राज्यपातळीवरील पक्षाने ' बहिरागत हटाओ ' ही घोषणा देऊन बहिरागत विरोधी चळवळ सुरू केली होती, ह्याचीही नोंद घेतली पाहिजे. ' बहिरागत ' या असमिया शब्दाचा अर्थ ' बाहेरून आलेला ' असा होत असल्यामुळे आसामच्या बाहेरून आलेल्या सर्वांनाच हटविण्याची मागणी या आंदोलनातून पुढे आली. (अली) ( मुस्लिम), कुली ( बिहारी ), नेपाळी, बंगाली मारवाडी अशा सर्वांनाच ' बहिरागत ' या संज्ञेत गोवण्यात आल्याने हे आंदोलन बिगरअसमिया भारतीयांविरुद्धही जाणार अशी लक्षणे दिसू लागली. आसामात आजही ही सर्व मंडळी मोठ्या संख्येने आहेत. रिक्षा ओढणारे, अक्षरशः हालअपेष्टात दिवस काढणारे हजारो बिहारी आहेत. नेपाळ्यांची संख्याही प्रचंड आहे. ' आसाम रायफल्स ' या आसामच्या नावाने स्थापन केलेल्या भारतीय सेनेतील सशस्त्र दलात असमियांपेक्षा नेपाळीच जास्त आहेत. हे आंदोलन आपल्याविरुद्ध जाण्याची शक्यता आहे हे लक्षात येताच त्यांनी ' असमिया की खोपडी और नेपाली की खुकडी ' अशा घोषणांची पत्रके जागोजागी लावून ' आम्हाला हाकलून द्याल तर जीव गमवाल! ' असा गर्भित इशाराही दिला. सुदैवाने आसामातील राष्ट्रवादी मंडळींनी हा, असमियाविरुद्ध अन्य भारतीय यांच्यातील संघर्षाचा धोका ओळखला व बहिरागत विरोधी आंदोलन ' विदेशी विरोधी ' एवढेच राहील अशी दक्षता घेण्यात यश मिळविले. हजारो बिहारी आणि मारवाडी मंडळींच्या पिढ्यान्‌पिढ्या आसामात गेल्या आहेत. त्यामुळे सुरुवातीसच त्यांच्याविरुद्ध होऊ पाहाणाऱ्या या आंदोलनास असमिया जनतेनेही साथ दिली नाही. आसाम जातीयतावादी दलाच्या ज्या डॉ. नासेर अहंमद यांनी हे आंदोलन ' बहिरागत विरोधी ' करण्याचे प्रयत्न केले त्यांची त्यांच्याच पक्षातून हकालपट्टी झाली. या सगळ्याचा परिणाम ' बहिरागत विरोधी आंदोलन ' हळूहळू केवळ ' विदेशी विरोधी ' बनले.

या आंदोलनाचा मोहरा बांगला देशातून आलेल्या परकीयांविरुद्धच राहिल्याने ते खरंखुरं जनआंदोलन होऊ शकले हेही नमूद केले पाहिजे.

दरम्यान हे आंदोलन हळूहळू राज्यव्यापी बनत गेले. ऑल आसाम स्टुडंटस् युनियन ही विद्यार्थी संघटना यात सुरुवातीपासून अग्रभागी होती आणि आजही हे आंदोलन मुख्यत्वे याच संघटनेच्या हातात आहे. सुमारे वीस वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या या संघटनेचे स्वरूप आपल्याकडच्या पदव्युत्तर विद्यार्थी संघटनांसारखे आहे. या संघटनेला विद्यापीठांची मान्यता आहे व सरकार–दरबारीदेखील ही संघटना आसामातील विद्यार्थ्यांची एकमेव प्रातिनिधिक संघटना म्हणून ओळखली जाते. आज कोणत्याही राजकीय पक्षाशी निगडित नसलेली ही विद्यार्थी संघटना सुरुवातीस सत्ताधारी कॉंग्रेसला सर्वाधिक जवळची अशी होती. अर्थात प्रत्यक्ष राजकारणात या संघटनेने उघडउघड भाग घेतल्याचे आढळत नाही. दरवर्षी मत-

दानाने या राज्यव्यापी संघटनेच्या अध्यक्ष व सरचिटणिसाची निवड होते.

## बोरा यांचा विलगतावाद

थेट मंगलदेई प्रकरणापासूनच ही संघटना आंदोलनात आघाडीवर राहिली आहे. पुढेपुढे मात्र हे आंदोलन केवळ विद्यार्थ्यांचे राहिले नाही. २७ ऑगस्ट ७९ रोजी अखिल आसाम गणसंग्राम परिषदेची स्थापना झाली व या आंदोलनात सहभागी झालेल्या ११ संघटनांची सुसूत्रचालन समिती या निमित्ताने अस्तित्वात आली. ऑल आसाम स्टुडंटस् युनियनसह श्री. निवारण बोरा व श्री. गिरीन बरुआ यांच्या नेतृत्वाखालील अनुक्रमे पूर्वांचलीय लोकपरिषद आणि आसाम जातीयवादी दल हे दोन प्रादेशिक पक्ष, तसेच आसाम साहित्यसभा, बारो साहित्यसभा इ. संघटना या गणसंग्राम परिषदेच्या सदस्य आहेत. यापैकी पूर्वांचलीय लोकपरिषद व जातियवादी दल हे दोन्ही प्रादेशिक पक्ष आंदोलनाला अधिक उग्र स्वरूप द्यावे व त्याचे नेतृत्व संपूर्णतः आपल्या हाती यावे यासाठी विलगतावादी भूमिका जाहीरपणे घेत आले आहेत. श्री. निवारण बोरा आज हे मान्य करीत नसले तरी भारतापासून फुटून निघून स्वतंत्र युनायटेड स्टेट्स ऑफ आसाम स्थापन करण्याची कल्पना त्यांच्याच सुपीक डोक्यातून आली आहे हे आसामात सर्वांना माहीत आहे. श्री. बोरा हे जुने समाजवादी आहेत; पण समाजवाद्यांचे जनता पक्षातील विलिनीकरण त्यांना पसंत नसल्याने सप्टेंबर १९७७ मध्ये त्यांनी पूर्वांचलीय लोकपरिषद या पक्षाची स्थापना केली. या आंदोलनाच्या निमित्ताने त्याचा हा पक्ष सामान्य जनांपर्यंत पोहोचला असला तरी त्याचा अर्थ श्री. बोरा यांना शेकडो अनुयायी कार्यकर्ते मिळाले आहेत असा मात्र नाही. स्वतः दिसायला मंगोलियनांसारखे असलेले श्री. बोरा, 'अवघा पूर्वांचल सांस्कृतिकदृष्टया भारतापेक्षा भिन्न असून आम्ही मंगोलियन वंशाचे आहोत' हे वारंवारदा ठासून सांगतात. आसामवर केंद्र सरकारने केलेल्या अन्यायाची कहाणी ते अगदी रंगवून व सविस्तर तपशिलांसह सांगतात. सर्व आकडेवारी आणि सनावल्या त्यांना पाठ आहेत आणि या दारूगोळयाच्या बळावर एकामागून एक आरोपांची सरबत्ती ते केंद्र सरकारवर करीत असतात. आसाम आणि सबंध ईशान्य भारतासाठी वेगळे नियोजन मंडळ असावे ही त्यांची मुख्य मागणी आहे. आसामच्या आर्थिक मागासलेपणाविषयी त्यांच्या अन्य महत्त्वाच्या मागण्यांचा उल्लेख याआधीच्या लेखांकात आला आहेच. 'विद्यमान केंद्रीय राज्यमंत्री श्री. निहार लासकर हे अधिकृतपणे भारताचे नागरिक नाहीत' असा एक खळबळजनक आरोप श्री. बोरा यांनी केला आहे; पण अधिक चौकशीअंती त्यात तथ्य नसल्याचे आढळले. माहीतगार सूत्रांच्या सांगण्यानुसार राज्यमंत्री लासकर यांचे वडील स्वातंत्र्यपूर्वी बराच काळ आधी आसामात स्थायिक झाले आहेत व त्यांनी स्वातंत्र्यचळवळीतही भाग घेतला होता. पुढे ते घटनासमितीचे काही काळ सदस्यही होते. श्री. बोरा व त्यांचा पक्ष छुपेपणाने विलगतवादी प्रचार कसा करतात याविषयी त्याबाबतच्या सविस्तर विवेचनात माहिती येईलच. तूर्त, काही काळ गणग्राम परिषदेचे अध्यक्ष असलेले श्री. निवारण बोरा या आंदोलनातील एक महत्त्वाची व्यक्ती आहेत एवढे लक्षात ठेवले पाहिजे.

गणसंग्राम परिषदेच्या स्थापनेनंतर, निदर्शने व मोर्चे, निरोधने अधिक जोमाने सुरू झाले. सप्टेंबरपासून शाळा–कॉलेजेही बंद पडली आणि सारे वातावरण अक्षरशः आंदोलनमय झाले. याच काळात केंद्रातील चरणसिंग सरकार कोसळल्याने मध्यावधी निवडणुकीची सरकारी पातळीवर तयारी सुरू झाली. या तयारीचाच एक भाग म्हणून १८ सप्टेंबरला राज्यसरकारने एका प्रसिद्धिपत्रकात हे जाहीर केले की, लोकसभेची निवडणूक उंबरठयावर येऊन ठेपली असताना परदेशी नागरिक हुसकवण्याच्या भानगडीत न पडता ज्यांची नावे मतदारयाद्यात आहेत त्या सर्वांना भारताचे नागरिक म्हणून मानण्याचे शासनाने ठरविले आहे, मतदारयाद्यांच्या छाननीचे काम लोकसभा–निवडणुकीनंतर हाती घेण्यात येईल.

एकीकडे मतदारयाद्यांतून परकीयांची नावे काढून टाकण्यासाठी जनआंदोलन उत्साहात सुरू होते आणि दुसरीकडे या आंदोलनाकडे, दुर्लक्ष करून, त्याची घोर अपेक्षा करून सर्व घुसखोरांना नागरिक म्हणून स्वीकारण्यास सरकार मान्यता देण्यास निघाले होते. त्यातही 'लोकसभा निवडणुकीनंतर याद्यांची छाननी करू' हे म्हणणे म्हणजे आंदोलन करणाऱ्यांची क्रूर चेष्टा करण्यासारखे होते. प्रतिनिधी योग्य तऱ्हेने निवडले जावेत म्हणूनच तर मतदारयाद्यांची छाननी करायची ! ह्या सगळयाकडे दुर्लक्ष करून राज्यसरकार निवडणुकी-पूर्वी छाननी शक्य नसल्याचे सांगून वर पुन्हा निवडणुका झाल्याच पाहिजेत अशी भूमिका घेत होते. श्री. शकधर यांच्या निर्णया-पाठोपाठ राज्यसरकारच्या या पत्रकानेही असंतोषाला खतपाणी घातले आणि घराघरातली असमिया व्यक्ती, मग ती कामगार असो, दुकानदार असो, विद्यार्थी असो वा आणखी कोणीही असो अधिकच त्वेषाने आंदोलनात सहभागी झाली !

राज्यसरकारने अशी उरफाटी भूमिका घेण्यामागेही तशीच खास कारणे होती. श्री. बोर बोरा यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या राजिनाम्या-नंतर या काळात श्री. जोगेंद्रनाथ हझारिका यांचे सरकार आसामात सत्तेवर होते. हझारिका सरकारला अर्धा डझन पक्षांच्या पाठिंब्या-शिवाय सत्तेवर राहणे केवळ अशक्य होते. अशा स्थितीत सर्वांना खूष ठेवण्यासाठी शक्य ते सर्व करून खुर्चीवर चिकटून राहण्याची मुख्यमंत्र्यांची केविलवाणी धडपड होती. काचार, जिथे बांगला देशातून आलेल्यांचं प्राबल्य आहे, तिथून निवडून आलेले आमदार आणि १२९ सदस्यांच्या विधानसभेतील २८ मुस्लिम आमदार यांनी संयुक्तपणे हझारिका सरकारवर दडपण आणलं आणि त्यामुळेच राज्यसरकारने लोकसभा निवडणुकीपूर्वी मतदारयाद्यांची छाननी न करण्याचा निर्णय जाहीर केला, असं मला अनेकांकडून सांगण्यात आलं. अवघ्या १६ आमदारांचा गट विधानसभेत बहुमत टिकवून सत्तेवर राहण्यासाठी कोणतीही धडपड करू शकतो हे लक्षात घेता सर-कारच्या निर्णयामागची ही पार्श्वभूमी अमान्य करता येत नाही.

सरकारच्या या निर्णयाची तीव्र प्रतिक्रिया सर्वत्र उमटली. निदर्श-नांचे सत्र गावागावात सुरू झाले होतेच. आंदोलनांची धार अधिक तीव्र करण्यासाठी त्याच सत्याग्रहांची जोड देण्याचा निर्धार गण-संग्राम परिषदेने केला.

## थक्क करणारा प्रतिसाद

१२ नोव्हेंबर १९७९ पासून सुरू झालेल्या गणसत्याग्रहांमुळे असमियांच्या आंदोलनाचे एक महत्त्वाचे पर्व सुरू झाले. गौहाती, विसपूर, न्यू बोंगाईगाव, नलबारी, नौगाव, दिब्रुगड, जोरहाट, प्रामुख्याने सबंध अप्पर आसाम भागात अक्षरशः लक्षावधी नागरिक ' जय आई आसाम 'चा नारा देत सत्याग्रहात सामील झाले. खुद्द आंदोलनाच्या सूत्रधारांनी देखील अपेक्षिला नसेल एवढा प्रचंड प्रतिसाद या गणसत्याग्रहांना मिळाला. गोरगरीब मजुरांपासून धनाढ्य व्यापाऱ्यांपर्यंत, अशिक्षित गावकन्यांपासून थेट आय. ए. एस. अधिकाऱ्यांच्या ' सॉफिस्टिकेटेड ' कुटुंबियांपर्यंत सर्वजण या सत्याग्रहांमध्ये सामील झाले. आसामात ज्यांना ज्यांना मी भेटलो त्या सर्वांनी या सत्याग्रहांचे ' अभूतपूर्व ' याच शब्दात वर्णन केले. फार काय, पण आंदोलनाला विरोध करणाऱ्या एका बंगाली डॉक्टराने देखील या आंदोलनाला मिळालेला प्रतिसाद थक्क करणारा होता असे प्रांजलपणे सांगितले. १२ नोव्हेंबरपासून १७ तारखेपर्यंत सतत पाच दिवस आसामात हे सत्याग्रह सुरू होते. सुमारे चाळीस लाख परकीयांमुळे ज्यांचं भवितव्य करपून जाण्याची शक्यता होती ती हजारो शाळकरी मुलेसुद्धा पाटी-दप्तर गुंडाळून ठेवून सत्याग्रहात सामील झाली.

नोव्हेंबर हा खरं म्हणजे कडाक्याच्या थंडीचा महिना ! पण लवकर उठून, स्वैपाक आटोपून अंगावर परंपरागत शाल पांघरून हजारो महिला सत्याग्रहात उतरल्या. नियोजित ठिकाणी सर्वजण एकत्र जमले की एखादी छोटीमोठी मिरवणूक काढायची, घोषणांनी सारा परिसर दुमदुमून टाकायचा, नेत्यांची भाषणं ऐकायची आणि पोलिसांची तयारी होताच शिस्तीत रांगा करून तात्पुरत्या उभारलेल्या मंडपवजा कारागृहात तीन–चार तासांच्या कारावासासाठी प्रवेश करायचा, असा सगळा कार्यक्रम आखीवरेखीवपणे त्या सत्याग्रहांपासून सुरू झाला आणि आजही थोड्याफार फरकाने तेच वेळापत्रक सुरू आहे. वरवर पाहता हा सहज सोपा, गमतीचा प्रकार वाटेल; पण लाखो लोकांना सत्याग्रहात उतरविणं आणि उभ्या आसामात सर्वत्र हे सत्याग्रह सुरू असताना हिंसेची एकही ठिणगी पडू न देणं ही सोपी गोष्ट नाही. असमियांच्या या आंदोलनात पन्नास साठ वर्षांपूर्वीच आसामात येऊन स्थायिक झालेल्यांचा ' वंगभाषीय असमिया समाज ' मोठ्या उत्साहानं सामील झाला. शेकडो मारवाडी व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे बंदचं आवाहन पाळलं, हजारो रुपयांचा निधी जमवून दिला आणि वर सत्याग्रहींची खाण्यापिण्याची व्यवस्थाही केली. आसाम सिख असोसिएशन ही शीखांची संघटनाही सामील झाली. एक काचार जिल्ह्याचा अपवाद वगळता अन्यत्र कुठेही अमुक एक समाजघटक आंदोलनापासून अलिप्त राहिला असं झालं नाही. आंदोलनाला मिळालेल्या या अपूर्व प्रतिसादामुळे देशभरातल्या वृत्तपत्रांनी त्याची चांगली दखल घेतली आणि आसामात काही तरी आगळं-वेगळं घडतंय याची उभ्या भारताला जाणीव झाली.

जाता जाता काचार जिल्हा या आंदोलनापासून अलिप्त कसा याचाही खुलासा करायला हवा. आसामच्या दक्षिण भागात बांगला देश, त्रिपुरा, मिझोराम आणि मणिपूरच्या सीमांना लागून काचार जिल्हा आहे. जिल्ह्याचं नाव काचार असलं तरी त्याचं मुख्य ठाणं सुमारे सव्वा लाख वस्तीचं सिलचर शहर आहे. सिलचरमध्ये संपूर्णतः बंगाल्यांचं प्राबल्य आहे आणि आपण आसामात आहोत की बांगला देशात असा संभ्रम निर्माण व्हावा इतकं सगळं बंगालमय वातावरण आहे. शासकीय आणि भौगोलिकदृष्ट्याही आसामचा भाग बनलेल्या काचार जिल्ह्यातील बंगाली भाषी जनतेत अर्धशतकापूर्वीच भारतात आलेल्यांची संख्या मोठी आहे, म्हणजे भारताबाहेर हाकलले जाण्याची भीती खरे म्हणजे त्यांना वाटण्याचे कारण नाही. अशा स्थितीत काचारवासीयांचा आंदोलनाला विरोध का ? हे जाणण्यासाठी मी मुद्दाम सिलचरला जाऊन आलो. सिलचरला गेल्यावर जाणवणारी पहिली गोष्ट म्हणजे असमियांच्या जनआंदोलनाचा मागमूसही सिलचरमध्ये आढळत नाही. एकूणच असमियांबद्दल आणि विशेषतः त्यांच्या आंदोलनाबद्दल भयानक कटुता काचारवासीयांच्या मनात आहे. याची दोन कारणं आहेत. एक म्हणजे असमिया बंगाली परंपरागत संघर्षामुळे परस्परांविषयीचा द्वेष मनात खदखदत आहे व परिणामतः आपल्याच प्रांतातल्या गौहातीऐवजी थेट बांगला देश ओलांडून कलकत्त्याशी संवाद साधण्याची त्यांची धडपड सुरू आहे. त्यातूनच काचार हा स्वतंत्र केंद्रशासित प्रदेश करण्याची, आसामपासून वेगळं होण्याची मागणी पुढे आली आहे. शिवाय असमियांचे आंदोलन यशस्वी होऊन काही बंगाल्यांना बांगला देशात जावे लागले तर त्यात आपलेही भाईबंद असतील अशी भीती त्यांच्या मनात असावी. एकूणच काचारविषयी सविस्तर विवेचन पुढे येईलच, तूर्त तिथे आंदोलन अस्तित्वात नाही एवढी नोंद पुरेशी आहे. काचारप्रमाणेच हाफलाँग आणि मिकीर हिल्स या जिल्ह्यात, जिथे ट्रायबल्स (आदिवासी किंवा वनवासी) मोठ्या संख्येने आहेत, तिथेही आंदोलन जवळ जवळ नाहीच. काचार प्रमाणेच या आदिवासींचीही स्वतंत्र उदयाचल राज्याची मागणी आहे.

जनमताचा विरोध लक्षात न घेता परकीयांची नावे मतदार याद्यातून वगळण्यापूर्वीच लोकसभेची निवडणूक घेण्याच्या राज्यसरकारच्या घोषणेला मुख्य निर्वाचन आयुक्तांनीही पाठिंबा दिला, त्यामुळे निवडणुका आपल्यावर लादल्या जाणार अशी असमियांची स्वाभाविक भावना झाली. देशात सर्वत्र निवडणुका होत असताना आसामातील असामान्य परिस्थितीमुळे तिथल्या १४ मतदारसंघात निवडणुका झाल्या नसल्या तरी त्यामुळे ' घटनात्मक पेचप्रसंग ' वगैरे उभा राहण्याची अजिबात शक्यता नव्हती. अशा स्थितीत स्वतः आसामात जाऊन तिथली परिस्थिती पाहून, जे प्रतिनिधी निवडणार त्यांच्या भावना जाणून निर्णय घेण्याचा विवेक मुख्य निर्वाचन आयुक्तांनी दाखवायला हरकत नव्हती; पण हे झाले नाही. खुर्ची टिकविण्यासाठी दबावाच्या राजकारणाला बळी पडलेल्या हंगामी सरकारने निवडणुका घेण्याचा निर्धार वारंवार व्यक्त करावा आणि निर्वाचन आयुक्तांनी त्याला दुजोरा द्यावा, हे घडतच राहिले.

## अबिदाबाईंची फजिती

गणसंग्राम परिषदेला अखेर निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घ्यावा लागला. ' आम्ही मतदानाला तर जाणार नाहीच; पण कोणी उमेदवारी अर्ज भरायचा प्रयत्न केला तर त्यालाही विरोध

करू', अशी परिषदेने घोषणा केली आणि अवघ्या आसामने ती उचलून धरली. तीन डिसेंबरपासून अर्ज भरण्याची मुदत सुरू झाली आणि कोणालाही निवडणुक-अर्ज भरू न देण्यासाठी गणसंग्राम परिषदेच्या वतीने अहोरात्र निरोधनांचा कार्यक्रमही सुरू झाला. हा प्रचंड लोकक्षोभ पाहून जनता पक्षाने उमेदवारी-अर्जच भरायचे नाहीत असा निर्णय आपणहून घेतला. इतर पक्षांनी, विशेषतः इंदिरा काँग्रेसने 'काहीही करू पण उमेदवारी अर्ज भरू' असा पवित्रा घेतला व अकारण मतदारांनाच चिथावले. वस्तुतः एवढ्या प्रचंड विरोधापुढे उमेदवारी अर्ज भरण्याचा अट्टाहास करणे सूज्ञपणाचे नव्हते; पण आंदोलनाला विरोध केल्याने प. बंगालमध्ये त्याचा फायदा मिळेल असे वाटल्याने की काय, इंदिरा गांधींनी निवडणूक प्रचारात या आंदोलनाचा 'संकुचित' व 'मुस्लिम विरोधी' म्हणून उल्लेख केला. एवढ्यावरच हे थांबले नाही. आसामातील बारपेटा मतदारसंघात अर्ज भरण्यासाठी जाण्याचे शक्य ते सर्व प्रयत्न इंदिरा काँग्रेसच्या उमेदवार बेगम अबिदा अहमद यांनी केले. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी त्या पोलीसपहाऱ्यातून बारपेटाला जाणार आहेत हे कळताच आधीच दोन तीन-दिवस गौहातीतल्या त्यांच्या निवासस्थानाला नागरिकांनी वेढा दिला आणि अहोरात्र शेकडो स्त्री-पुरुष अबिदाबाईंची नाकेबंदी करण्यासाठी सज्ज राहिले; पण बेगमसाहिबा जरा जादाच हिंमतीच्या आंदोलनांपुढे मान न तुकवता सशस्त्र पोलिसांच्या पहाऱ्यात त्या बारपेटाला जाण्यासाठी निघाल्या. बेगम अहमद निघाल्या हे पाहताच संतप्त झालेल्या जमावाने त्यांची गाडी अडविण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी लाठीमार केला, अश्रूधुरांची नळकांडी फोडली आणि या शांततामय आंदोलनात अकारण हिंसेला निमंत्रण दिले. बेगम अहमद यांच्या गाडीपुढे आडवे पडून ती आडवणाऱ्या खरगेश्वर तालुकदारला एका पोलिसाने उठविले आणि

# शेवटचा परकीय नागरिक आसाम सोडून जाईपर्यंत

आसामातील सध्याच्या आंदोलनात अग्रेसर असलेल्या ऑल आसाम स्टूडंटस युनियनचा अध्यक्ष प्रफुल्लकुमार मोहंता नौगावचा राहणारा आहे. विद्यार्थीक्षेत्रात यापूर्वी तो खूप क्रियाशील वगैरे नव्हता; पण गेल्या वर्षी स्थानिक मित्रांच्या आग्रहावरून त्याने युनियनच्या अध्यक्षपदाची निवडणूक लढविली आणि तो निवडून आला. बी. ए. झाल्यानंतर मोहंता आता कायद्याचा अभ्यास करीत असून नौगावच्या लॉ-कॉलेजचा तो विद्यार्थी आहे. पंचवीसच्या आसपास वय असलेल्या मोहंताचे व्यक्तिमत्व रूबाबदार आहे.. नीट वाढविलेली दाढी, बोलके पाणीदार डोळे, विचार करून गंभीरपणे बोलण्याची पद्धत आणि अंगावर काळा ओव्हरकोट, असे विद्यार्थीनेत्यांच्या परंपरागत प्रतिमेला धक्का देणारे मोहंताचे व्यक्तिमत्त्व आहे. गौहातीच्या पानबझार भागानजिक असलेल्या कॉटन कॉलेजच्या स्टुडंटस हॉलमध्ये सुमारे तासभर मोहंताशी गप्पा मारल्या. मोहंता जात्याच अबोल असावा. त्यामुळे त्याच्यापेक्षा त्याचे चारदोन अन्य मित्रच प्रश्नांची उत्तरे द्यायला उत्सुक असत. शेवटी प्रयत्नपूर्वक यांना थोपवून मोहंताला बोलते करावे लागले.

**प्रश्न :** तुमची संघटना वीस वर्षांची जुनी आहे असे सांगितले जाते. मग या आंदोलनापूर्वीची तिची कामगिरी अशी काय होती?

**उत्तर :** स्थानिक पातळीवर छोट्यामोठ्या प्रश्नावर आम्ही आंदोलने छेडली होती. १९७४ मध्ये भडकती महागाई व जीवनावश्यक वस्तूंची चणचण संपावी यासाठी आम्ही राज्यभर आंदोलनाचे प्रयत्न केले व त्याला चांगला प्रतिसाद मिळाला होता.

**प्रश्न :** आणीबाणीत तुमची भूमिका काय होती?

**उत्तर :** अधिकृतपणे आम्ही काही जाहीर केले नव्हते; पण आमचे काही नेते त्या वेळी अटकेत होते. अर्थात उघडपणे आणीबाणीविरुद्ध आम्ही कार्यरत होतो असे म्हणता येणार नाही.

**प्रश्न :** या आंदोलनात तुमची संघटना नेमकी कधीपासून व कशाप्रकारे सहभागी झाली?

**उत्तर :** १९७८ पासूनच या परकीय नागरिकांच्या प्रश्नावर काही ठाम कृती करण्याचा आमचा निर्धार होता. त्याच वेळी एका १६ कलमी मागणीपत्रही आम्ही तयार केले होते. मात्र या साऱ्या प्रकरणाला वेग मिळून त्याचे आंदोलनात रूपांतर झाले ते मंगलदेई पोटनिवडणुकीच्या सुमारास.

**प्रश्न :** परकीय नागरिकांच्या घुसखोरीची ही समस्या खूप जुनी आहे, मग ती सोडविण्यासाठी याआधीच आंदोलन का झाले नाही?

**उत्तर :** एक तर मंगलदेई प्रकरणापूर्वी हा प्रश्न इतक्या जोरकसपणे आमच्यासमोर आला नव्हता. एकाच मतदारसंघात चाळीस हजार परकीय असतील हे आम्हालासुद्धा एक Revealetion होते आणि खरं सांगायचं तर कोणत्याही आंदोलनाला त्याची अशी एक वेळ यावी लागते, ती आता आली, एवढेच. शिवाय या भीषण समस्येबाबत आमच्या राज्यकर्त्यांनी आम्हाला अंधारात ठेवले आणि स्वतःही समस्येकडे दुर्लक्ष केले.

**प्रश्न :** पण त्या राज्यकर्त्यांना तुम्हीच तर निवडून दिले होते. तेही एकदा नव्हे तर अनेकदा.

**उत्तर :** खरंय ! पण ती आमची नकळत झालेली चूक होती.

**प्रश्न :** तुमची संघटना राजकारणापासून अलिप्त असल्याचे सांगितले जाते; पण पूर्वांचलीय लोकपरिषदेचे निवारण बोरा म्हणतात की, 'आसू'चे बरेच सदस्य त्यांचे कार्यकर्ते आहेत.

**उत्तर :** विद्यार्थीदशा संपल्यावर कोणीही आमच्या संघटनेचे सदस्य रहात नाही, त्यामुळे कोण कोणत्या पक्षात गेला याची चिंता आम्ही करीत नाही.

**प्रश्न :** अन्य विद्यार्थीसंघटना, उदा. मार्क्सवाद्यांची एस. एफ. आय. किंवा विद्यार्थी परिषद यांच्याशी तुमचे कसे संबंध आहेत?

**उत्तर :** खरं म्हणजे एक आमची संघटना सोडली तर अन्य सर्वच संघटना आमच्या राज्यात जवळपास अस्तित्वशून्य आहेत.

एका डबक्यापाशी लोटून दिले. आधीच माराने अर्धमेला झालेल्या खरगेश्वरचे नाकतोंड डबक्यात बुडाले आणि तिथेच त्याने प्राण गमविले. खरगेश्वरला पोलिसांनी नव्हे तर अन्य काही लोकांनी डबक्यात लोटले असे पोलीस सांगतात ! काहीही असो, वीस वर्षांचा कोवळा कॉलेजकुमार खरगेश्वर या आंदोलनतला पहिला हुतात्मा ठरला ! आज आसाम विद्यार्थी संघटनेच्या कार्यालयाबाहेर खरगेश्वरचे स्मारक उभारण्यात आले आहे. असमिया विद्यार्थ्यांसाठी ते एक स्फूर्तीकेंद्र बनले आहे.

इतके सारे रामायण घडवून बेगम अहमद हंट्टाने बारपेटाला गेल्या आणि त्यांनी उमेदवारी अर्ज भरला. अन्य कोणाचाच अर्ज न आल्याने अविरोध निवडून येण्याची स्वप्ने पाहणाऱ्या अबिदाबाईंचा अर्ज छाननीत मात्र निर्वाचन अधिकाऱ्यांनी अवैध ठरविला. परिणामतः बारपेटातही निवडणूक होऊ शकली नाही. अन्य १३ पैकी १० मतदारसंघात एकाचाही अर्ज न आल्याने तर अन्य एका ठिकाणी मतदान न झाल्याने, निवडणूकप्रक्रिया पूर्ण झाली नाही. काचार जिल्ह्यातील दोन मतदारसंघात मात्र निवडणूक झाली. केंद्रीय राज्यमंत्री निहार लासकर यापैकीच एका ठिकाणाहून निवडून आले आहेत.

आंदोलनपर्वाचा पूर्वार्ध इथेच संपतो. नवे वर्ष आणि नवे केंद्र सरकार आल्यावर आंदोलनाचा नवा टप्पा सुरू झाला. त्यात काही ठिकाणी हिंसक दंगलीही घडल्या. या हिंसक दंगली, आंदोलनाबाबत विविध राजकीय पक्षांच्या भूमिका, बंगाली पत्रकारांनी केलेला खोडसाळपणा इ. आंदोलनाच्या दुसऱ्या टप्प्यातील घटनांविषयींचं विवेचन पुढच्या लेखांकात.

[ क्रमशः ]

# आंदोलन सुरूच राहील....प्रफुल्लकुमार मोहंता

त्यामुळे यापैकी कोणत्याही संघटनेशी संबंध वगैरे ठेवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. अर्थात असे असले तरी अन्य कोणत्याही संघटनेने आम्हाला पाठिंबा दिला तर आम्ही त्याचे स्वागतच करू.

**प्रश्न** : रा. स्व. संघाबद्दल काय ?

**उत्तर** : रा. स्व. संघ किंवा मुस्लिम लीग इ. जातीय संघटनांशी आमचा कसलाही संबंध नाही.

**प्रश्न** : तुमचे आंदोलन विघटनवादी असल्याचे म्हटले जाते, विशेषतः पूर्वांचलीय लोकपरिषदेवर हा आरोप वारंवार केला जातो, त्याबद्दल काय ?

**उत्तर** : आमच्या आंदोलनाचे उद्दिष्ट भारतापासून फुटून निघणे आहे इ. खोटा प्रचार कलकत्त्यातील वृत्तपत्रे सातत्याने करीत असअसतात, परंतु त्यात तथ्य नाही. अशा प्रकारच्या कोणत्याही विघटनवादी कल्पनेला आमचा तीव्र विरोध आहे. केवळ आम्हीच नव्हे तर आसामातील सर्व जनता या कल्पनेला विरोध करील. पूर्वांचलीय लोकपरिषदेची याबाबत काय भूमिका आहे हे मात्र आम्हास माहिती नाही.

**प्रश्न** : परवा ३ फेब्रुवारीस तुम्ही दिल्लीत इंदिराजींची भेट घेतली ती कशी काय झाली ? पंतप्रधानांचा दृष्टिकोन कसा वाटला ?

**उत्तर** : भेट चांगल्या वातावरणात पार पडली. पंतप्रधान अर्थातच नेहमीप्रमाणे राजकीय मुत्सद्देगिरीची भाषा बोलल्या. कोणीकडून तरी आम्ही नमते घ्यावे अशी त्यांची इच्छा असल्याचे दिसले. त्यासाठी सुरुवातीपासूनच त्यांनी धूर्तपणे मुद्दे मांडले. आमच्या आंदोलनाची प्रशंसा वगैरेही केली; पण खरे सांगायचे तर दिल्लीतली चर्चा फारशी उपयुक्त ठरणार नाही; पंतप्रधानांनी आसामात येऊन इथली परिस्थिती पाहिली पाहिजे, लोकांशी चर्चा केली पाहिजे. त्या म्हणतात मला आसामात यायला वेळ नाही; पण फक्त सहा जणांचा मृत्यू झाला तरी नारायणपूरला त्या धाव घेतात आणि इथे पन्नास जण गोळीबारात वा दंगलीत बळी गेले तरी त्यांना आसामात यावेसे वाटत नाही. हा सापत्न भाव कशासाठी ?

**प्रश्न** : परकीय नागरिकांची समस्या किचकट आहे. नेमके घुसखोर कोणते हे ओळखणेही कठीण आहे. अशा स्थितीत तुम्ही कोणता उपाय सुचवाल ?

**उत्तर** : घुसखोर कोण आणि वैधपणे आलेला भारतीय नागरिक कोण हे ठरविण्यासाठी सध्या कायदेशीर तरतुदी आहेत व आमच्यामते त्या पुरेशा उपयुक्त आहेत. शिवाय सरकारने एकदा मनावर घेतले तर हजारो घुसखोरांना हुडकून काढणे कठीण वाटत नाही. जंगलातले वाघ ते मोजू शकतात मग घुसखोर मोजण्यात अडचण कसली ? तेव्हा या प्रश्नावर काहीही तडजोड करण्यास आमची तयारी नाही. आम्ही आतापर्यंत खूप सोसलं आहे, इतःपर सोसण्याची आमची तयारी नाही. त्यामुळे शेवटचा परदेशी नागरिक आसाम सोडून जाईपर्यंत आमचे आंदोलन चालूच राहील.

**प्रश्न** : पण हे असे आणखी किती दिवस चालू राहणार ? सहा महिने शाळा-कॉलेजे बंद आहेत, व्यापारावरही परिणाम होतोच आहे. लोक कंटाळणार नाहीत ?

**उत्तर** : अजिबात नाही. प्रश्न सुटण्यापूर्वीच आम्ही आंदोलन थांबविले तर लोक आम्हाला दोष देतील. आमचे आणखी एक वर्ष गेले तरी चालेल पण आता मागे हटणे शक्य नाही ! Now or never ही आमची समस्या सोडवून घेण्यामागची भूमिका आहे. आम्ही आता मागे हटलो तर पुन्हा पुढे येता येणार नाही.

**प्रश्न** : निर्वासित आणि घुसखोर यांच्यात फरक करण्यास तुमची तयारी आहे काय ?

**उत्तर** : नाही. त्यातून निर्वासितांना स्वीकारण्याचे सरकाने ठरविलेच तर त्यांचे ओझे एकट्या आसामवर टाकले जाऊ नये. निर्वासितांची वाटणी करून त्यांच्या पुनर्वसनाची जबाबदारी प्रत्येक राज्यावर टाकली जावी असा आमचा आग्रह राहील. *

# पुस्तके

डॉ. सौ. श्यामला वनारसे

# लोकधाटी

## स्वैर टिपणे

लोकधाटी हे श्री. द. ग. गोडसे यांच्या टिपणांचे संकलन पॉप्युलर प्रकाशनाने प्रसिद्ध केले आहे. लोकधाटीचा अभ्यास करताना जाणवलेल्या गमकांची मांडणी करणारी ही टिपणे आहेत.

स्वैर टिपणे असल्यामुळे त्यांची त्या त्या घडीची ढब आहे. ललित, विश्लेषणात्मक, समाजवैज्ञानिक, तौलनिक इत्यादि गट त्यात आहेत. या टिपणांच्या आस्थेचे विषय प्रामुख्याने कलानिर्मितीचे व्यापार आणि सौंदर्यशास्त्रीय संकल्पना यांच्याशी संबंधित आहेत. या आस्थांच्या अनुषंगाने ओवी, 'कौसाळाचा चुडा' हे गीत आणि गोगँ यांची चित्रशैली या तीन विशिष्ट आविष्कारसंघटनांचा त्यांनी विचार केलेला आहे.

हे आस्थेचे विषय महत्त्वाचे आहेत. शैलीची विविधता, संज्ञांचा आग्रहपूर्वक वापर, लोकजीवनाचे जवळिकीने केलेले निरीक्षण, या सर्वांमुळे पुस्तक वाचनीय झाले आहे. टिपणांना नेमकी शीर्षके दिलेली नाहीत किंवा त्यांच्यात युक्तिवादाच्या दृष्टीने क्रम ठेवलेला नाही. एक प्रकारचा सैलपणा आणि प्रभावी चिंतनशीलता हे या लेखनाचे विशेष म्हणता येतील. प्रत्येक टिपण हा एकेक तुकडा आहे आणि या सर्व तुकड्यांच्या मागे एक विचारविश्व उभे आहे. त्याचा अंदाज या तुकड्यांमधे जे विचार व्यक्त झाले आहेत, त्यातून घेतो. त्यांच्या संगतीकडे लक्ष न देता फक्त वैचारिक चवीने ही टिपणे वाचली आणि सोडून दिली असे होत नाही.

या टिपणांमधून हाती लागणारे विचारांचे तुकडे असे मांडता येतील–

१) लोकधाटी आविष्कार भावन-अनुसारी असतात. त्यांना गणितमानी चौकट नसते.

२) लोक-कलावंत म्हणजे शिकारी आणि शेतकरी. त्यांचे जीवन आणि भावन-अनुसारी आविष्कार यांच्यात थेट संबंध आहे. त्यात नागरी रियाझ नाही.

३) लोक–कलावंत माध्यमाच्या स्वातंत्र्याच्या मान व भान ठेवतात.

४) सामूहिक नेणिवेतील साद ग्रामीण भावविश्वात पोचते, तिचे समष्टीला अनुलक्षून साधारणीकरण होते. लव आणि वाक या तत्त्वांच्याद्वारे सार्थ शक्तभार असलेला आविष्कार भावमात्र रूपात सिद्ध होतो.

५) मानवी मन अपार्थिव अवकाश आहे आणि या अदृश्य अपार्थिव अवकाशाचे अस्तित्व ही एक सत्यस्थिती आहे. मनाचा व्यवहार कळला की ग्रामीण कलावंताची भावनप्रक्रिया कळेल. ती वर क्र. ४ मधे सांगितल्याप्रमाणे असते.

६) ग्रामीण कलावंतांची आविष्कारप्रक्रियाच वेगळ्या धारणेची असते. ती नागर आविष्कारापेक्षा प्रकारतः भिन्न असते.

७) लोकधाटी आविष्कारांना अनियमित लवचिक गतिमानता, मुक्त, जिवंत, ठाम अलिप्तता, एकसंध पूर्णत्व आणि सार्थ शक्तभार ही वैशिष्टये असतात.

या विचारांमधूनच त्यांनी ओवीची गेयता आणि त्यात व्यक्त होणारे ग्रामीण स्त्रीमन, 'कौसाळाचा चुडा' या गीतातील ग्रामीण भावविश्वाशी निगडित सामाजिक-ऐतिहासिक आशय व जीवननिष्ठा यांचा विचार केला आहे आणि गोगँ या युरोपीय चित्रकाराच्या 'आदिमानवी' शैलीचे विश्लेषण केले आहे.

दुसरा एक स्पष्टपणे जाणवणारा रोख म्हणजे लोकधाटीच्या कौतुकाचा आणि नागरकौशल्याच्या बाबत नाराजीचा. हा रोख आवर्जून सांगायला हवा. कारण त्यातून मिळणाऱ्या यथादर्शात मांडणीची एक संगती आहे.

या सर्व मांडणीबाबत काही गोंधळ लक्षात येतात. 'लोकधाटी आविष्कारांचा अभ्यास करताना केलेली स्वैर टिपणे' असे म्हटल्यावर या अभ्यासाचा हेतू आणि पद्धती कोणती ? असा प्रश्न येतो. पुस्तक वाचून त्याचा उलगडा होत नाही. कारण पुस्तक कधी ललितशैलीने लेखकाचा अनुभव सांगते, तर कधी शिकारी–शेतकरी' यांचे साधर्म्य सांगणारी वर्णनपरता वापरते. एखादे टिपण सौंदर्यशास्त्रीय पातळीवरील संकल्पनांचे विश्लेषण करते, तर कधी मनोविश्लेषणवादी विचारव्यूह मांडते. लोकधाटीचा अभ्यास अनेक बाजूंनी करता येतो. त्यापैकी तार्किक तात्त्विक पातळी आणि वास्तव प्रत्यंतराधिष्ठित पातळी यांची स्पष्ट जाणीव न ठेवल्यामुळे संज्ञांचा वापर 'प्रातिभ' अधिकाराने केला आहे. उदाहरणार्थ मनोविश्लेषणवादी संज्ञा. त्या लेखकाने का मांडल्या ? तर ग्रामीण कलावंताची भावनप्रक्रिया समजण्यासाठी. भावनप्रक्रिया 'समजणे' म्हणजे तो या विशिष्ट संकल्पनाव्यूहात चपखल बसणे, की वास्तव प्रत्यंतराने तिचे वर्णन मिळवणे ? या बाबत नक्की काहीच न धरता कधी वास्तवाचे हवाले तर कधी संकल्पनांचे जाळे असा हा खेळ झाला आहे.

त्यात मग व्यक्तिभेदाचा मुद्दा आला की, 'सामूहिक नेणिवेची साद सर्वांना ऐकू येत नाही' अशी पळवाट शोधावी लागते. कलावंत ही संज्ञाच मग तपासायला हवी, असे वाटते. युंगच्या विचारव्यूहात 'आदिम' या संज्ञेचा वापर 'ऐतिहासिक वास्तव' म्हणून केला आहे की 'तार्किक प्राथमिकता' या अर्थाने केला आहे? परंतु युंग किंवा मनोविश्लेषणवाद हे शब्द न वापरता लेखक 'मन हे अपार्थिव अवकाश आहे आणि या अदृश्य अपार्थिव अवकाशाचे अस्तित्व ही सत्यस्थिती आहे' असे ठामपणे धरून चालतात. ती ती विधाने करत जाण्यापलीकडे जास्त काही करत नाहीत. ती चौकट एकमेव नाही किंवा अंतिमही नाही. ती आकलनासाठी उपयुक्त वाटते का आणि का वाटते याचा कुठेच आगापीछा नाही.

दुसरा गोंधळ 'भावन-अनुसारी' आविष्कार या कल्पनेबाबत. भावन आणि तर्क यांना दोन कोठडयात कोंडून लोकधाटी आणि नागरघाट हा संस्कृतिभेद उभा केलेला आहे. कलावंताच्याच काय पण कोणाही मानवाच्या बाबतीत अशी विभागणी म्हणजे वैचारिकतेचा 'अव्यापारेषु व्यापार' ठरते. पुस्तकभर सतत भेटणारे एक विधान म्हणजे 'लोकधारी गणितमानी चौकट मानत नाही.' जीवनरीतीत निर्माण होणारी 'मान' कल्पना त्या त्या जीवनातील व्यवहाराशी निगडित असते आणि भावन म्हणजे या चौकटीच्या संदर्भात विशिष्ट मूल्य धारण करणाऱ्या वस्तू, घटना, प्रसंग अनुभवता, प्रत्ययतः भिन्न ठरल्याची जाणीव. स्थल किंवा कालमापनाचे व्यक्तिनिरपेक्ष साधन ही काही 'नागर' तर्कमानी नव्हे. ती मानवी बुद्धीने हेरलेली एक आकलनाची गरज आहे. फक्त स्वतःच्या भावन-अनुसारी आचरणाने जीवन रचले जाऊ शकत नाही आणि फक्त तर्क-अनुसारी आचरणानेही जीवन पूर्ण होत नाही. चार भिंती आणि एक छप्पर उभं कसं राहील यासाठी भावन निरुपयोगी आहे, तर या घरात सुख नांदावं, या घरात समृद्धी यावी यासाठी केलेली पूजा, काढलेली चित्रं, स्थापलेल्या मूर्ती यांच्यात 'भावन' निगडित आहे. तर्काचे प्रांत आणि भावनांचे प्रांत अशी काही चौथाई–सरदेशमुखी त्यात नाही. जो माणूस घर बांधताना ओळंबा घेतो, तोच त्या घरात शिरताना तोरण बांधतो, शुभ बोलतो इत्यादी. मानवी संस्कृती कोणत्याही टप्प्यावर असली तरी भावन आणि तर्क असे विघटन होत नाही. याच संदर्भात दुसराही मुद्दा आहे. लोक कलावंत पढीक नसतात, भावन-अनुसारी आविष्कार करणारे, भावमात्र रूप टिपणारे असतात. याउलट नागर कलावंत गणितमानी चौकटीत वाढतात, रियाझ करतात, माध्यम आणि तंत्र यांना गुलाम बनवतात आणि तर्कानुसारी आविष्कार करतात असे लेखकाने विवरण केले आहे. लोक-कलावंत म्हणजे कोण? तर 'सामूहिक नेणिवेची साद' ऐकू येणारे. नागर कलावंत म्हणजे कोण? तर पाठयज्ञान, तंत्रज्ञान यांना गुलाम करून वस्तुनिष्ठ चित्रणाची कास धरणारे. या वर्गीकरणाचा पाया आणि त्याची आधारभूत संकल्पना या दोन्ही गोष्टी गोंधळलेल्या आहेत. लोक–आणि नागर–हे कलावंतांचे वर्गीकरण म्हटल्यानंतर, कलावंत ठरण्याचे निकष आधी आणि त्याच्यानंतर लोक किंवा नागर ठरण्याचे निकष येतील. अगदी लेखकाच्या मांडणीनुसारही 'सामूहिक नेणिवेची साद' ऐकू येणे हे कलावंत ठरण्याचे लक्षण असेल तर लोक आणि नागर यांच्यात भेद करण्याचे अन्य लक्षण कोणते? ते सांगता आले नाही तर लोक–आणि नागर–हा भेद कलावंत आणि न–कलावंत असा ठरेल. अशी चूक लेखकाला करावयाची असेल असे वाटत नाही आणि म्हणूनच हा गोंधळ स्पष्ट केल्याशिवाय पुढे पाऊल पडणार नाही.

भावन-अनुसारी आविष्कार त्या त्या व्यक्तीच्या भावनांशी बद्ध असतो, त्याला व्यक्त होण्यासाठी दुसऱ्या व्यक्तीपर्यंत पोचण्यासही साधनांची रचना करावी लागते. 'रुक्मणा दळते गुलाल' ही शब्दरचना गुलाल म्हणून 'भावणारे' पीठ, रुक्मणा म्हणून 'भावणारी' गृहिणी हे 'दर्शन' ओवीत व्यक्त करणारी रचना आहे. कांतोतियाची जैसी जाती । सोनयाही मान देती । ना तरी मानविती । अंगेंचि सडी ।। या ओवीतही 'भावलेले' दर्शनच आहे. हे सर्वच आविष्कार भावन-अनुसारी आहेत. त्यांच्या जोडीला वेगवेगळ्या जीवनशैली, लेखनसंदर्भ आहेत; परंतु कलावंत भावनांखेरीज दर्शन घडवण्याचा उद्योग करत नाही. वर्णनात्मक भाषा, चित्रात, छायाचित्रात, चलचित्रात केलेली नोंदणी म्हणजे कला असे कोणी म्हणत नाही; परंतु या माध्यमातील कलावंत भावमात्र रूप पकडण्यासाठीच कॅमेरा लावतात किंवा आपापली साधने वापरतात. वस्तुनिष्ठ चित्रण करण्यानेही कलावंत भावन-अनुसारी वाटच शोधत असतो. हरिभाऊंची 'यमू' वास्तव चित्रणाचा नमुना आहे म्हणूनच त्यांच्या कादंबरीने 'दर्शन' घडवले आणि हेमिंग्वे, कामू, सार्त्र किंवा रन्वा, गोगँ, व्हॅनगॉग या सर्वांनी जो जो शोध घेतला तो तो त्यांच्या त्यांच्या भावन-अनुसारी आविष्कारासाठी घेतला. त्यात लोक–काय आणि नागर–काय?

म्हणजेच, भावन-अनुसारी ते लोक–आणि तर्कानुसारी ते नागर–हे कलावंतांचे वर्गीकरण कच्चे आहे.

प्रश्न आहे तो कलावंतांच्या कृती जीवनरीतीत कशा समाविष्ट होतात याबद्दल. शिकारीचा यातुविधी म्हणून काढलेले चित्र, शिकारकौशल्य आणि शिकारीचे यश या सर्वांना कार्यकारणभावाने बांधणाऱ्या शिकारी मानवाचे चित्र त्या बंधाचा भाग असते. ते काढावेच लागते, ते काढणे हाही तीर–कामठ्याप्रमाणेच शिकारीचे साधन आणि यशाची हमी–निदान आश्वासक दिलासा आहे. इथे कला आणि कला, कला आणि जीवन, कला की जीवन? कलेसाठी कला की जीवनासाठी कला असले प्रश्न उद्भवलेले नाहीत. ज्या वेळी सावज हेरणारा, चित्र काढणारा आणि तीरकामठा चालवणारा असे कार्यविभाग निर्माण होतील तेव्हाही चित्र काढण्याचा यातुविधी शिकाऱ्याच्या बाहूत शक्ती आणतो. सावज हेरणाराची नजर तीक्ष्ण करतो असे नाते निर्माण होईल. सांस्कृतिक विकास होत असताना धातुविधीचे कार्यकारणसंबंधातील स्थान बदलले. कलावस्तू जनजीवनात रुतलेल्या अवस्थेपासून कलावस्तूंना 'केवळ संवेदनासाठी' अशी वेगळी कोटी प्राप्त होण्याच्या अवस्थेपर्यंत येताना अनेक स्थित्यंतरे झाली. त्यात लोक–आणि नागर–यांना स्थान आहे. या क्षेत्रातील अभ्यासांचा फक्त सोयिस्कर संदर्भ उचलून शिकारी आणि शेतकरी हा एकत्र कसा गणता येईल एवढेच या टिपणांनी टिपले आहे, त्यामुळे त्यातील भेदांमुळे मिळू

शकणारी दृष्टी हरवली आहे.

लोकधाटीच्या अभ्यासाने नागर कलावंतांचे प्रश्न स्पष्ट होण्यास मदत होईल का? गोगँसारख्या चित्रकाराकडे वळताना गोगँची जीवनरीत त्यांच्या कलाकृतींशी कशा प्रकारे नाते ठेवत होती? त्यांच्यापुढील प्रश्नांचे स्वरूप काय होते? याचा उलगडा करण्यासाठी त्यांच्या कलाकृतीचे आस्वादक यांचे नाते तत्त्वत: समजावून घेणे आणि वास्तवात प्रत्यंतर घेणे यासारख्या अभ्यासाची दिशा लेखकाला हवी होती का? जी दिशा घेतली आहे, त्यातून गोगँ 'आदिमानवी' बनले हे लोकधाटीचे मोठेपण आणि त्यांच्या आकृती नागरी दृष्टीने सौष्ठवप्राप्त झाल्या हे गोगँना करावे लागलेले परंपरेचे 'सोपेकरण' असले उत्तर मिळाले आहे! गोगँ ज्या काळात जसे होते, तसे ते भावन–अनुसारी आविष्काराचीच वाट धुंडत होते ह्याकडे दुर्लक्ष केल्याने 'संकरित' विरुद्ध 'शुद्ध' असा खोटा वाद उपस्थित करण्यापलीकडे फारसे काही घडू शकलेले नाही.

या पुस्तकात इतरही अनेक वादस्थळे आहेत; परंतु त्यातील बहुतेक वर उल्लेखलेल्या (१) वैचारिक पातळीची अनिश्चिती आणि (२) भावना-क्रिया आणि आविष्कार यांच्या विषयीची समजूत या दोन गोंधळातून निर्माण झालेली आहेत.

निरीक्षण आणि जवळीक ही या पुस्तकाची जमेची बाजू आहे. मात्र विचारांचा तरंगतेपणा पाहून आश्चर्य वाटते. लोककलांच्या संदर्भात आधुनिक सामाजिक विज्ञानाचे अभ्यास पाहता ही स्वैर टिपणे ललित लेखनात जमा होतील. त्यांनी सौंदर्यशास्त्रीय विचारांचे रूप घेतल्याने हा विस्तारपूर्वक प्रपंच केला. ◻

**लोकधाटी :**
लेखक : द. ग. गोडसे
पॉप्युलर प्रकाशन, १९७९
किंमत : सोळा रुपये.

## संध्याकाळचे पुणे : पृष्ठ ५ वरून

माझा असा अनुभव आहे की ज्या चळवळीला गीते चांगली मिळतात त्या चळवळींना जोर येतो. वरील दोन्ही गीते चांगली होती. आठ मार्चला निघावयाच्या मोर्चासाठीही सभेत एक पत्रक देण्यात आले. त्याचा आरंभ असा होता, '८ मार्च! जगांतील बायांचा अन्ययाविरुद्ध लढयाच्या संकल्पाचा दिवस' या दिवशी दुपारी ३॥ ते ५॥ स्त्रियांचा मोर्चा फुले मंडई ते संभाजीपूल चौक असा जाणार होता. त्यासाठी देशातील सर्व स्त्रियांना हे आवाहन होते. त्यांच्या मागण्या खालील होत्या.

(१) मथुरा–तुकाराम केसचा पुर्नविचार करावा.

(२) स्त्रीविरुद्ध पक्षपात लक्षात घेऊन कायदा व कायद्याच्या अमलबजावणीत सुधारणा सुचविण्यासाठी कायदेतज्ज्ञांची व सामाजिक स्त्री कार्यकर्त्यांची समिति नेमावी.

(३) स्त्रियांवरील अत्याचाराची ताबडतोब चौकशी करण्यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांचे व स्त्री–संघटना–प्रतिनिधींचे कायम स्वरूपी ट्रायब्यूनल नेमावे.

(४) सूर्यास्तानंतर स्त्रीला कोणत्याही कारणासाठी पोलिसचौकीत नेऊ नये, या गुन्हा अन्वेषणापद्धती संहितेच्या १६० कलमाची कडक अंमलबजावणी करावी.

(५) प्रत्येकाला रोजगार मिळावा.

(६) पाळणाघरांची सोय व्हावी.

(७) रेशनवर जादा साखर, स्वच्छ धान्य व रॉकेलचा पुरवठा व्हावा.

हे पत्रक पहिल्यांदा उल्लेख केलेल्या नऊ स्त्री संघटनांतर्फे होतं.

परिसंवादाचे शेवटी अध्यक्ष सत्यरंजन साठे म्हणाले, 'कायद्याने बलात्कारावर संपूर्ण तोडगा निघेल असे मला वाटत नाही. बलात्काराचे बाबतीत इंडियन पिनल कोड असे आहे: (१) इच्छेविरुद्ध संभोग होणे (२) संमतिवाचून संभोग होणें (३) भीति दाखवून संभोग होणे (४) नवरा आहे अशा समजुतीने संभोग होणे (५) सोळा वर्षांखालील मुलीशी संभोग. हे संभोग बलात्कारात धरले आहेत.

या प्रकारांना अर्थात पहाणारा साक्षीदार नसतो. परिस्थितिजन्य पुराव्यावर काम चालते. १) वैद्यकीय तपासणीतून २) कपडे फाटले आहेत का? ३) दुखापती व यातून सुटका होऊ शकते.

चित्तरंजन साठे हे लॉ कॉलेजचे प्राचार्य आहेत. ते वकिलीतील व्यवसायबंधूंबद्दल म्हणाले, 'आमच्या व्यवसायबंधूंची कारकीर्द चांगली नाही. साक्षीदार फोडतात, पोलिसांशी हातमिळवणी करतात. खऱ्याचे खोटे व खोटयाचे खरे करणाऱ्या वकिलाचे कौतुक होते. वकील स्त्रीच्या चारित्र्याबद्दल वाटेल ते प्रश्न विचारतात. त्यातून आरोपी निर्दोष सुटतो. कारण अशा प्रश्नांची उत्तरे स्त्रिया देऊच शकत नाहीत. आमची कायदेपद्धति विषमतेवर आहे. हा व्यवसाय प्रस्थापितांच्या बाजूने आहे. हे खटले सारखे सुटत असतात. बलात्कार नाही हे सिद्ध करण्याची जबाबदारी पुरुषाची हवी.'

अध्यक्ष सत्यरंजन साठे यांचे समारोपाचे भाषण झाल्यावर आभारप्रदर्शनाचे भाषणात डॉ. पोरे म्हणाल्या, 'स्त्रीमुक्तिआंदोलन-संपर्क समितीतर्फे हा परिसंवाद आयोजित केला. यासाठी येणारा खर्च आम्ही काही स्त्रिया करतो. टिळक स्मारक मंदिराचे हे सभागृह अतिशय अल्प भाडयात आम्हाला उपलब्ध झाले यासाठी येथील व्यवस्थापकांचे आभार मानते. आठ मार्चच्या मोर्चात आम्ही पंतप्रधानांना उद्देशून निवेदन केले आहे. या मोर्चात बहुसंख्येने सामील होण्याची मी सर्व स्त्रीपुरुषांस विनंती करते.'

यानंतर ही परिसंवादाची सभा संपली. निधीसाठी केलेल्या डब्यात इतरांप्रमाणे यथाशक्ति द्रव्य टाकून मी सभागृहातून खाली उतरून बाहेर आलो. ◻

# जेव्हा शेतकरी जागा होतो : पृष्ठ ३ वरून

शेतकरी आंदोलनाचीच हानी होणार आहे. शेतकऱ्यांच्याच संघटनेने अशा प्रकारचे आंदोलन चालवताना ह्याचा विचार का करू नये ? सरकारवर अवलंबून राहण्याऐवजी त्यांनी त्यांचीच offices का काढू नयेत ? शेतकरी व ग्राहक यात निर्माण होणारी दरी अशा पद्धतीने भरून काढणे शक्य होणार नाही काय? स्वतःचीच Export Houses देखील का काढू नयेत ? स्वतःचेच कारखाने का काढू नयेत ? शक्य आहे. प्रथमतः भांडवलाचा प्रश्न येईल; पण त्यापेक्षाही त्यासाठी प्रश्न आहे तो सर्वस्व अर्पण करून पूर्ण वेळ काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा ! आणि हे जर का शक्य झाले तर शेतकरी आंदोलनाला constructive approach येईल.

अर्थात त्यासाठी आवश्यकता आहे चळवळीची, संघटनेची. आजपर्यंत ज्यांनी यशस्वी चळवळी केल्या त्यांनी यशस्वी संघटना बांधल्या नाहीत आणि ज्यांनी यशस्वी संघटना बांधल्या त्यांनी यशस्वी चळवळी उभारल्या नाहीत.

आणि हा ड्रॅगन जागा होतोय त्याच वेळेस ह्याचा विचार करायला हवा आहे त्यांच्या नेत्यांनी, आजूबाजूच्या समाजाने. ह्या ड्रॅगनचा उपयोग आपला हिंदुस्थान पुढे नेण्यासाठी सुद्धा होईल–जर याचा योग्य उपयोग करून घेतला तर आणि जर त्याची पावले अयोग्य दिशेने पडली तर त्यातून घडेल ते सामाजिक विघटन–

म्हणून म्हणतोय
ड्रॅगन जागा होतोय
कांद्याच्या आंदोलनातून
उसातून, भुईमुगातून
पेटून उठलाय स्वतःची
अस्मिता ओळखून
म्हणून सज्ज व्हा स्वागताला
सामाजिक भूमिकेतून.
¤

आजच शेतकऱ्यांची प्रकर्षाने जाणीव व्हायचं कारण गेले काही दिवस चाकण भागात चाललेलं कांदाआंदोलन. कांद्याने अनेकांच्या डोळ्यांतून अनेक प्रकारचे अश्रू काढलेत. इंदिराजींनी उत्तरेतल्या निवडणुका कांदा प्रश्नावरच जिंकल्यात. त्यामुळेच एका समीक्षकाने म्हटले होते – This election was faught on Onion–ground. तेव्हापासून कांदा गाजतोय. ह्याच कांद्याने इंदिराजींच्या आणि व्यापाऱ्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू काढले तर गिऱ्हाईक शेतकरी व जनता पक्षाच्या डोळ्यांतून दुःखाश्रू काढले.

हिंदुस्थानमध्ये एकूण २०,००,००० टन कांद्याचे उत्पादन होते. त्यापैकी ७०% कांदा महाराष्ट्रात पिकतो आणि त्यातला ६०% कांदा पुणे आणि नासिक ह्या भागात होतो आणि त्यामुळे हिंदुस्थान हा कांद्याचा महत्त्वाचा निर्यातदार ठरला. निर्यातबंदीच्या आधीच्या वर्षीत जवळजवळ १,८०,००० टन कांदा आपण मध्यपूर्व, युरोप, रशिया, सिलोन, द. पूर्वआशिया ह्या देशांना निर्यात केला आणि निर्यातव्यापार सुरू झाल्यापासून शेतकऱ्यांना त्यांच्या कांद्याला चांगला भाव मिळायला सुरुवात झाली.

कांद्याच्या प्रश्नाचा प्रथम भडका उडाला तो १९७७ साली. जनता पक्षाच्या राजवटीमध्ये कांद्याचे भाव खाली आणण्यासाठी तडकाफडकी निर्यातबंदी केली आणि कांद्याचे भाव खाली घसरले. त्या वेळेस कांदा ५ पैसे किलोने विकला जात होता. कित्येक ठिकाणी तो जाळून टाकावा लागला. आंदोलनाची ठिणगी पडली. मोहन धारिया धावत आले आणि त्यांनी नाफेडमार्फत कांदा विकत घेण्याचे आदेश देऊन आंदोलन मागे घ्यायला लावले. प्रश्न तात्पुरता सुटला होता. ह्यातूनच चाकण भागात शेतकरी संघटनेची स्थापना झाली. ह्या संघटनेला अध्यक्ष नाहीत. पदाधिकारी नाहीत. अत्यंत Infermal संघटना आहे असे श्री. शरदराव जोशी यांनी सांगितले. ह्या संघटनेचे नाव पण 'शेतकरी संघटना' आहे. सभासद साधारणतः ६,००० आहेत. रोज सभासदांची संख्या वाढत आहे.

श्री. शरदराव जोशी ह्या संघटनेचे नेते, संस्थापक आणि सर्व काही. थोरच माणूस आहे. एखाद्या संघटनेला असला नेता लाभणे म्हणजे ह्या सभासदांचे पूर्वजन्मीचे कर्तृत्वच आहे. मूलभूत विचार करणारा हा माणूस साधारणतः ४५ ते ५० वर्षांचा असावा. दहा वर्षे युनोच्या संख्याशास्त्र, अर्थशास्त्र आणि गणकशास्त्र ह्या शाखांचे ते प्रमुख होते. सोलापूरच्या वाणिज्य कॉलेजचे संस्थापक सदस्य स्वतः आय, ए. एस. आहेत. तसेच भारतीय पोस्टल सेवेमध्ये डायरेक्टर म्हणून काम केलंय. स्वतःची शेती चाकणजवळ आंबेगाव गावात आहे. त्यात मुख्य पीक कांदा हेच. त्यामुळे प्रत्यक्ष कांदा प्रश्नाचा अभ्यास. बोलण्यात थोडासा कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाचा प्रभाव जाणवला. असा हा माणूस गेले सहा-सात दिवस उपोषणाला बसला होता. कारण मी भेटलो ह्या वेळेस ज़वळजवळ ४० ते ५० मिनिटे चर्चा झाली. अत्यंत चांगल्या वातावरणात.

गेले जवळजवळ महिनाभर हे आंदोलन चालू आहे, ह्या हंगामातले. एका शेतकऱ्याने मला सांगितले की, नाफेडच्या अधिकाऱ्यांनी ५० ते ७० पैसे हा भाव मान्य केला होता. नंतर मात्र त्यांनी ४५ ते ५० पर्यंत क्विंटल कांदा घेऊ असे सांगितले. परवा नाफेडचे अधिकारी चाकणला आले होते. श्री. गुप्ता आणि श्री. वेंकटरामन. त्यांना घेराव झाला. रस्ता बंद करणे हा प्रकार तर कित्येक दिवस चालू आहे. पुणे–नासिक–रस्ता बंद आहे. एकही एस. टी. काय, साधे दुचाकी वाहन इकडून तिकडे जाणं मुष्किल आहे आणि आता तर मुंबई–पुणे–रस्ता बंद करण्याचा शेतकरी संघटनेचा विचार आहे. गंमत म्हणजे हे आंदोलन अत्यंत शांतपणे चालू आहे. विवेकी नेतृत्व असले की काय होते त्याचेच हे प्रात्यक्षिक आहे. नुकतेच ५२४ जणांना पोलिसांनी अटक करून नेले आहे. ७ दिवसांचा remand मिळालाय. लोकांची बैलगाडीसकट अटक करून घेण्याची तयारी आहे. उपोषणाचा कार्यक्रम चालूच आहे. स्त्रिया पण भाग घेत आहेत. सिताबाई वाघ आणि भागिरथीबाई लोणभर ह्या दोन स्त्रिया काल उपोषणाला बसल्या होत्या. सिताबाईंच्या दोन मुलांना अटक करून नेली आहे. त्यांची स्वतःची तुरुंगात जायची तयारी आहे. रोज मोर्चे येत असतात, रोज सत्याग्रह होत असतात.

ह्या सर्व चाकणभागातले सर्वात महत्त्वाचे पीक म्हणजे कांदा. विकून मिळणाऱ्या पैशावर संपूर्ण वर्षाचा प्रपंच अवलंबून असतो आणि पावसाळ्यात फक्त ह्या भागात पाणी असतं. दारिद्र्य तर पाचवीला पुजलेले. बियाणे, अवजारे विकत घेण्यासाठी शेतकऱ्यांना बँकांनी पैसे दिलेले असतात कर्जापोटी. त्याची वसुली कांदा-विक्री नंतर होते. सध्या साधारणतः ५५००० पोती कांदा नुसता पडून आहे. काही कांदा तर कुजायला लागला आहे. पुढील भवितव्याचा प्रश्नच आ वासून उभा आहे.

शरदराव जोशी यांच्या म्हणण्याप्रमाणे अजूनही ८० लक्ष टन कांदा आपण निर्यात करू शकू. फक्त तसा निर्णय घ्यायला हवाच. तशी अजूनही परवानगी नाही. त्यांनी तर सरळसरळ आरोप केला. नाफेडच्या ह्या Policies शेतकऱ्यांच्या दुःस्वासापोटी निघाल्या आहेत. सरकारच्या धरसोड वृत्तीमुळे हिंदुस्थान वर्षाला ३० कोट रुपयांच्या चलनाला मुकला आहे आणि आता तर शेतकरी समाज उभा आहे खंबीरपणे पाय रोवून न्याय मिळविण्यासाठी, सर्वस्व पणाला लावून.

परवा एक घटना घडली. शरदराव सांगत होते, आंदोलन चालवताना येणाऱ्या अडचणीविषयी. शेतकऱ्याची आर्थिक हलाखीची स्थिती लक्षात घेऊन एका सभेत असे जाहीर केले की, ज्यांना नाफेडचा कांदा ४० ते ५० पैसे किलो ह्या भावाने विकायचा आहे त्यांनी तो विकावा. कठीण आर्थिक परिस्थिती असूनसुद्धा आश्चर्याची गोष्ट म्हणजे, एकही शेतकरी माल विकायला पुढे आला नाही. उलट ह्या वर्षी आमचे कांदे कीड पडून नष्ट झाले तरी चालतील; पण न्याय मिळेपर्यंत आम्ही वाकणार नाही, अशी त्यांची भूमिका होती.

ह्या आंदोलनामुळे पैशाअभावी अनेकांची घरातील लग्ने थांबलीत. शिवाय इतर अनेक प्रश्न आ वासून उभे आहेत. अगदी ऐतिहासिक शब्दात वर्णन करायचे तर आधी लगीन कोंडाण्याचे मग रायबाचे हा निर्धार प्रत्येकाच्या कृतीतून, शब्दातून दिसतोय.

शेवटी निघताना ह्या भागातले एक कांद्याचे मोठे दलाल लतीफ काझी भेटले होते. त्यांनी कांद्याचे गणित मांडून दाखविले. एकरी कांद्यावर साधारणतः रु. २८०० ते रु. ३,००० इतका खर्च येतो. एका एकरामध्ये ६० क्विंटल कांदे होतात. सध्याचा भाव रु. ४० प्रत्येक क्विंटलला असा आहे. त्यामुळे सध्या फक्त प्रत्येक एकरी रु. २४०० एवढेच पैसे मिळतात. सध्या शेतकरी संघटनेची मागणी आहे ५० रुपये ते ७० रुपये. म्हणजेच सरासरीस ५५ रु. प्रत्येक क्विंटलला म्हणजेच रु. ३३०० प्रत्येक एकरी भाव पडेल. त्यातून ४०० ते ५०० रु. एकरी शेतकऱ्यांना मिळू शकतील.

आंदोलन सुरू झाले आणि त्याचे यश निश्चित झाले. कारण विषयच असा सर्वव्यापी आहे, सर्व समावेशक आहे की, आंदोलन न पेटणे हे नवलच. ह्यामध्ये सर्वांचाच व्यक्तिगत स्वार्थ असल्याने प्रत्येकाने रस घेणे स्वाभाविकच आहे. स्वार्थ जेव्हा व्यक्तिगत मर्यादा ओलांडून समाजसापेक्ष होतो तेव्हा त्यास निःस्वार्थ म्हणतात.

फक्त प्रश्न आहे आंदोलनाने दुसरे प्रश्न सुटतील का ?

¤

## शरद जोशी यांच्या मुलाखतीतून....

- शेतकऱ्यांची कामगारसंघटनेच्या धर्तीवर संघटना उभी करणे.
- शेतकरी सध्या अप्रस्थापित आहेत त्यांना प्रस्थापित करणे.
- गावोगाव शेतकऱ्यांना जागे करून पुढील लढ्याची तयारी करणे.
- बटाट्याला किमान रु. १ भाव मिळावा. कांद्याला किमान ५० ते ७० पैसे भाव मिळावा. भुईमुगाला किमान रु. २–५० भाव मिळावा.
- ३० वर्षात कोरडवाहू शेतकऱ्यांची स्थिती सुधारली नाही. इंग्रजांचा वसाहतवाद जाऊन 'इंडिया'चा वसाहतवाद सुरू झाला. सर्व पक्ष त्या वसाहतवादाचे प्रतिनिधित्व करतात.
- चरणसिंग हा पहिलाच माणूस ज्याने शेतकऱ्यांच्या फायद्याचे तत्त्वज्ञान मांडले आहे. त्यांच्या कोलांटउड्या मान्य नाहीत.
- आजपर्यंत ९९% शेतकरीचळवळ अयशस्वी ठरली त्याचे कारण सरकारच्या Policies. त्याच्यापाठीमागे व्यापाऱ्यांची संघटना आहे. जवळजवळ ६,००,००० गावांचा प्रश्न आहे. तो याच म्हणजे आंदोलनमाध्यमाद्वारे सोडवावा लागेल. ह्या बाबतीत ज्यांनी केवळ ग्रामसुधारणेचे प्रयत्न केले आहेत त्यांचा फारसा उपयोग होणार नाही.
- शेतकरी संघटनेचा मार्ग कामगारसंघटनेच्या मार्गावरून जातो. शहरी लोकांची नाडी आवळली तरच शेतकऱ्यांचा फायदा होईल.
- कोरडवाहू शेतकऱ्यांनी परंपरागत पिके सोडून नवीन पिकांचे, पदार्थांचे उत्पादन करावे. ह्यातून finished products चे उत्पादन करावे.
- शहरातल्या सुशिक्षित लोकांच्या मदतीची गरज नाही. शेतकऱ्यांनाच जर पैसे मिळाले तर ते स्वतःच समृद्धी करू शकतील. संस्कृती पैशाच्या पाठीमागे येईल.
- राजकीय अस्थैर्य हे ७५ टक्के लोकसंख्येचा भाग असलेल्या शेतकरी समाजाकडे दुर्लक्ष झाल्याने निर्माण झाले आहे.
- शेतकरी आंदोलनाची सुरुवात हे 'Indian' राज्य कोसळू लागल्याचे प्रतीक आहे.

*

# शेतकरी तितुका मेळवावा

विजयकांत साळुंके

चाकण परिसरात कांद्याला रास्त भाव मिळवून देण्यासाठी शेतकरी संघटनेने गेल्या आठवडयात सुरू केलेल्या आंदोलनाचे साद-पडसाद महाराष्ट्रभर उमटले आहेत. दिल्लीचे कान बंद असल्याने त्यांना जाग आली नसावी. मात्र पुण्या-मुंबईतील वृत्तपत्रांनीही या आंदोलनात उत्साह दाखवल्याने शेतकरी संघटना व तिचे एकखांबी नेतृत्व करणाऱ्या शरद जोशी या सुविद्य नेत्याविषयी लोकांना उत्सुकता वाटू लागली आहे.

शरद जोशी यांना एकूण नेता या शब्दाविषयी राग असल्याने ते स्वतःला कार्यकर्ता म्हणवून घेतात. त्यांनी दोन वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या शेतकरी संघटनेत म्हणूनच कुठलेही पद नाही. सभासदांना शेतकरी संघटनेचे सैनिक संबोधण्यात येते. शरद जोशी या संघटनेची व्याख्या 'शेतकऱ्यांची शेतकऱ्यांसाठी शेतकऱ्यांनी केलेली संघटना' अशी करतात. अन्यायाला उत्तर संघटना हे असल्याने त्यांनी शेतकऱ्याला संघटित करण्याचा ध्यास घेतला असावा.

शेतकरी संघटनेने १९४० च्या आसपास साने गुरुजींनी लिहिलेले गीत 'संघटनेचे गीत' म्हणून स्वीकारले आहे.

उठू दे देश पेटू दे देश
येथून तेथून सारा पेटू दे देश
–कोटी कोटी आता उठू दे किसान
निर्भयपणे आपली उंच करो मान

शेतकरी संघटनेचे कलापथक चाकण, राजगुरुनगर व भामनगर खोऱ्यात गावोगावी दर आठवडयाला होणाऱ्या सभांतून सेवादलाच्या धर्तीवर शेतकऱ्यांना जागे करीत फिरते.

शेतकऱ्यांची संघटना म्हणजे वाळूचा पूल. कधीच बनायचा नाही. पुष्कळांनी प्रयत्न केले. सरदार पटेलांनी बार्डोलीला शेतकरी संघटित केले. गांधीजींनी चंपारण्यात त्यांना सत्याग्रहासाठी उभे केले तेवढेच.

तसे पाहिले तर भारतात शेती–शेतीत व शेतकऱ्यांतही खूप मोठा फरक आढळतो. येथे पंजाब–हरयाणातील ३००–४०० एकरांची टॅक्टर व इतर यंत्रसामुग्री वापरली जाणारी आधुनिक शेतीही मोडते आणि कोकणात डोंगरावर कसेबसे बांध घालून, त्यावर पालापाचोळा जाळून केली जाणारी शेतीही आढळते. दूध, द्राक्षेवाले-सधन बागायतदारही यात येतात.

देशात शेतकऱ्यांची वस्ती साडेसहा लाख खेडयांतून विखुरलेली आहे. मोठी शहरे व राजरस्त्याच्या आसपासची शेती वगळता बाकीची खेडी कच्च्या रस्त्यांनी पायवाटेने जोडलेली आणि बराचकाळ तुटलेलीच.

आपल्याकडे शेतकरी हा फटकळ, व्यक्तिवादी समजला जातो. शेतीच्या वादाबरोबरच गावातील भांडणे, मानापमानाच्या कल्पना, घराघरातील हेवेदावे सर्वत्र. तशात आपला देश जातीव्यवस्थेने ग्रासलेला, ब्राह्मण शेतकऱ्यास इतर शेतकऱ्यांशी आपले काही आतडयाचे संबंध आहेत याची जाणीव नसते. मराठा अथवा जाट शेतकरी हरिजन शेतकऱ्याला आपला समजतच नाही.

निवडणुकांमुळे गावातली राहिलीसुहिली एकी सुद्धा तडकून जाते. वेगवेगळे पक्ष आणि उमेदवार नगारे वाजवीत फिरू लागले की गावकऱ्यांची डोकी फिरू लागतात.

निवडणुकीच्या राजकारणाचा आणि शेतकरी जीवनाचा अर्थाअर्थी संबंध तसा फारसा राहिलेला दिसत नाही. तरी सुद्धा गावातल्या एका टोळीने एक बाजू घेतली की दुसऱ्या फळीने दुसरा पक्ष घेतलाच. यामध्ये पक्षाच्या जाहीरनाम्याचा, कार्यक्रमाचा वा उमेदवाराच्या लायकीचा काहीही संबंध नसतो. एकूण काय शेतकरी हा फुटीर समाज आहे. त्याची संघटना बांधणे जिकिरीचे व चिकाटीचे खरे.

शेतकऱ्यांचे इतके विविध आणि इतके मोठे प्रश्न आहेत की त्यातील नेमके कोणते हाती घ्यावेत हे ठरवणे कठीण. याबाबत शरद जोशी यांचे म्हणणे असे–'शेतकरी संघटना बांधण्यासाठी सर्व शेतकऱ्यांना ज्यात स्वारस्य वाटेल अशा सर्वमान्य मागण्या मांडण्यात आल्या पाहिजेत.'

आपल्या विकासासाठी आपण तातडीने, उभारीने काही करू शकत नाही अशी एकदा धारणा झाली की संघटनेसाठी लागणारा उत्साह निर्माण होऊ शकत नाही आणि तेजोभंग झालेला तळमळीचा शेतकरी कार्यकर्तासुद्धा गावोगावी उत्सव, भजनीमंडळ, काकड-आरत्या, ग्रामपंचायतीचे राजकारण आणि निवडणुका अशा कामात आपले मन रमवू लागतो.

ग्रामीण मतदारसुद्धा लहान गटात विखुरलेला. त्यामुळे शहरी पुढाऱ्यांना ग्रामीण कार्यक्रमांना महत्त्व देण्याचे प्रयोजन वाटत नाही. ग्रामीण भागातील आमदार–खासदार फारसे काही करू शकत नाहीत. ते त्यांच्या धन्यामागे मेंढयांच्या कळपाप्रमाणे फिरतात. ही नेतेमंडळीसुद्धा मोठे जमीनदार, बागायतदार, साखरकारखानदार-वर्गापैकीच असल्याने ग्रामीण भागापेक्षा शहरी लोकांशीच त्यांचे हितसंबंध गुंतलेले असतात.

देशात सध्या शेतकऱ्यांचा कळवळा सगळयांनाच आला असल्याचे दृश्य गेले काही वर्षे दिसू लागले आहे. सर्वच राजकीय पक्ष, स्वयंसेवी संघटना, शासकीय–निमशासकीय संघटना, कारखानदार, बुद्धिजीवी सगळे ग्रामीण दारिद्र्यावर सरसावून बोलू लागले आहेत. त्याचबरोबर योजना, प्रकल्प निघत आहेत. फायदा घेणारा वर्ग मात्र राजकीय पक्ष, नोकरशाही व थोडाफार ग्रामीण भागातील वतनदारांचा. कोरडवाहू शेतकरी कोरडाच राहिला आहे. त्यामुळे भारतात दोन स्पष्ट भाग दिसतात. परदेशी सहकार्याने उभारलेल्या उद्योगधंद्यांनी सधन झालेला, राजकीय वतनदारांचा लंडन-न्यूयॉर्कला सघन संपर्क असलेला पाश्चिमात्य तोंडवळयाचा एक वर्ग व दुसऱ्या बाजूला शतकानुशतके वेगवेगळया राज्यकर्त्यांनी शोषून 'चिपाड' केलेला दुसरा वर्ग. इंग्रजांनी स्थानिक स्वामिभक्तांचा वर्ग तयार केला. तसेच नवीन 'देशी' राज्यकर्त्यांनी मूठभर बागायतदार–जमीनदार व महाजनवर्ग हाताशी धरला आहे. देशातील शेतकऱ्यांनी आंदोलने–उठाव करू नये म्हणून जय किसान, गरिबी हटाओ यासारख्या सवंग घोषणा आणि इतर 'कालबद्ध' (?) कार्यक्रमाचे ढोंग केले जाते; पण प्रेरणेचा अभाव असल्याने ही फसवणूक शेतकऱ्याच्या लक्षात येऊ लागली आहे.

## मूळ प्रश्न शेतीमालाचे भाव

ग्रामीण भारताच्या दारिद्र्याचे मूळ तेथे होणाऱ्या उत्पादनाला मिळणाऱ्या अपुऱ्या मोबदल्यात आहे अशी शेतकरी संघटनेच्या शरद जोशींची धारणा आहे. शेतमाल पावसाळयाच्या शेवटास बाजारात येतो. शेतकऱ्याला थांबण्याची ताकद नसते. त्याला चालू उत्पादन-खर्च भरून निघेल न निघेल इतपतच मोबदला मिळतो. भांडवली खर्च, त्यावरील व्याज हा सारा खर्च कधीच भरून येत नाही. चांगले पीक आले तर भाव पडतात आणि कसाबसा खर्च भागतो. ओला–सुका दुष्काळ आला तर भेसूर उपासमारीची टांगती तलवार असतेच.

कोणत्याही सात वर्षांच्या चक्रात देशात ५३ टक्के पीक येते. मात्र हा व्यावसायिक धोका पत्करण्याचा मोबदला शेतकऱ्याला काहीच नाही. ही व्यवस्था जोपर्यंत आहे तोपर्यंत शेतकऱ्याची परिस्थिती

कधीही सुधारू शकणार नाही.

शरद जोशी तर म्हणतात, 'कारखानदारी मालाचा ज्या पद्धतीने उत्पादनखर्च काढण्यात येतो त्याच पद्धतीने अनेक शेतीमालाचा उत्पादनखर्च काढला पाहिजे. हे करताना पीक बुडण्याचा धोका लक्षात घेतला पाहिजे. शेतमजुरीचा योग्य दर, व्याज, घसारा, व्यवस्थापनासंबंधी खर्च हे सर्व धरून शेतीमालाची किंमत ठरविण्यात आली पाहिजे आणि तिची हमी शासनाने घेतली पाहिजे.

तुटवडयाच्या वर्षातही सक्तीने वसुली करणारे शासन शेतीमालाची मुबलकता झाल्याबरोबर मुखवटा बदलून यापुढे 'किंमती मागणीपुरवठयाच्या तत्त्वानुसार ठरतील' अशी भूमिका घेऊ शकणार नाही हे सध्याच्या चाकण कांदा आंदोलनाचे सूत्र आहे. हंगामात सर्व पीक एकदम बाजारात आल्याने खर्चाइतकाही मोबदला मिळत नाही. खोटीचा परिणाम शेतमजुरीच्या दरावर होतो, तसेच शेतकरी कुटुंबाच्या राहणीमानावरही.

स्वातंत्र्यानंतर किसानचळवळीकडे दुर्लक्षच झाले. आज कोणताही राजकीय पक्ष शेतकऱ्यांच्या साहाय्यावाचून तग धरू शकणार नाही, अशी परिस्थिती आहे. कामगार आणि व्यावसायिक आपापल्या पातळयांवर संघटित झाले तरी शेतकरी मूक राहिला. सरदार पटेलांचा 'शेतकरी हा शेळयांच्या कळपातील सिंहाचा छावा आहे' हा विचार कॉंग्रेसमुद्धा विसरली.

शेतकरी तितका एक करणे, त्यांचा एकमेकांशी संबंध बांधणे, त्यांना संघटित करून माणूस म्हणून जगता यावे यासाठी लढा करण्याचे व्रत शरद जोशी यांनी पत्करले आहे.

मात्र संघटनाकार्यात अनेक अडचणी येतात. ज्यांची संघटना बांधायची त्यांच्यात काही तरी साम्य हवे. एकसूत्रता हवी. एकमेकांची संपर्क साधण्याची, विचारविनिमयाची संधी आणि साधने हवीत. कारण विचारांच्या देवघेवीशिवाय संघटना होऊच शकत नाही आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सर्वांचे किमान एक समान ध्येय असावे लागते. निश्चित उद्दिष्टाखेरीज संघटना बांधता येत नाही आणि टिकवता तर अजिबात येत नाही.

शेतकरी संघटना कुठल्याही राजकीय पक्षाच्या आधाराने वाढू दिली जाणार नाही असा शरद जोशी दावा करतात. कोणत्याही राजकीय पक्षाचा आसरा न घेता संघटना उभी करण्यात मोठी अडचण येते. त्यांचे म्हणणे, "आजच्या राजकारणाचे स्वरूप नीट न समजण्यामुळे गावोगावी अनेक शेतकरीमंडळी भ्रमाने या ना त्या पक्षाच्या मागे गेली आहेत. अशा काही निष्ठावंत मंडळींना शेतकरी संघटनेच्या बाहेर ठेवायचे म्हटले तर संघटना दुबळी राहील. या वाट चुकलेल्या कार्यकर्त्यांना शेतकरी संघटनेकडे ओढून आणले पाहिजे.'

## कांद्याच्या लढयाचे महत्त्व

शरद जोशी म्हणतात 'देशातील ४० टक्के कांदा महाराष्ट्रात होतो. त्यापैकी निम्मे उत्पादन पुणे–नाशिक जिल्ह्यात होते. या भागात होणारा कांदा निर्यातयोग्य दर्जाचा असतो. तेव्हा संघटित लढा केल्यास कांद्याचा भाव निश्चितपणे शेतकरी ताब्यात ठेवू शकतील. कांदा सोडल्यास इतर कोणत्याही शेतमालाबाबत प्रभावी लढा उभारणे या भागातील कोरडवाहू शेतकऱ्यांना अशक्य आहे. म्हणून हा लढा परिणामकारक आहे. त्याचे परिणाम देशभर जाणवतील. कांद्याचा लढा देशभरच्या शेतकरी क्रांतीची सुरुवात ठरू शकेल.'

कांद्याचे भाव ज्या पद्धतीने ठरविण्यात येतात त्याविषयी शेतकरी संघटनेच्या बऱ्याच हरकती आहेत. गेल्या वर्षात सर्व वस्तूंच्या विशेषत: डिझेल, खते, औषधे, वाहतूक, मजुरी यांच्या किंमती वाढल्या असता कांद्याची किंमत कमी कशी ठरवण्यात येते?

त्यांचे म्हणणे, 'शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांच्या प्रातिनिधिक संघटनाच ठरवतील. 'नाफेड' किंवा शेतीमाल किंमती समिती'-सारख्या आकडेमोडीचा सोयिस्कर खेळ करणाऱ्या संस्थांचे हे काम नव्हे.'

शेतीउत्पादनाचे विविधीकरण, पूरक अन्नाच्या उत्पादनावर कर, पारंपारिक उत्पादने बंद करून नवी पिके घेणे, पूरक जोडधंदे, कच्च्या शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या कारखान्यांची उभारणी, शीतगृहे, कोणते शेतमाल तारण म्हणून ठेवून घेऊन वापरावयास पैसे देणारी व्यवस्था या उपायांनीमुद्धा शेतीमालास रास्त किंमती मिळणे शक्य होईल.

या उपायात बुडित भांडवल व चालू खर्च आणि मोठया प्रमाणावर गुंतवणुकीची गरज लागेल. शेतकऱ्यास त्याच्या चालू मालाला जरी रास्त भाव मिळाला तरी फार थोडया काळात स्वत:च्या बळावर, वर सुचवलेली उपाययोजना हळूहळू का होईना पण त्याला स्वत:ला करणे शक्य होईल; परंतु भाव नाहीत तोपर्यंत भांडवल नाही. भांडवल नाही तोपर्यंत भाव नाहीत अशा कात्रीत शेतकरी सापडला आहे. शेतकऱ्याला रास्त भाव देणे याचा अर्थ बहुसंख्य जनतेचे दारिद्र्य नष्ट करणे नव्हे काय?

संयुक्त राष्ट्रसंघात मोठया हुद्द्याची नोकरी सोडून देऊन कोरडवाहू शेती फायदेशीर कशी करता येईल या ध्यासाने झपाटलेल्या शरद जोशी यांनी सद्य:स्थितीच्या अभ्यासातून काढलेल्या निदानाच्या आधारे शेतकरी संघटित करण्याचा प्रयत्न चालवला आहे. त्यांच्या निदानातील अचूकता संशयास्पद वाटत नाही. त्यांनी कोरडवाहू शेतकऱ्यांच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी चाकणजवळ आंबेठाण गावी स्वत: कोरडवाहू शेतजमिनीवर अभ्यास केला आहे. त्यांच्या मते शेतकरीसंघटना म्हणजे कोरडवाहू शेतकऱ्यांच्या परिस्थितीचा सखोल अभ्यास करून त्यांच्या हलाखीचे अचूक निदान करून त्यावर शास्त्रीय दृष्टीने उपाययोजना हाती घेणारी शेतकऱ्यांची क्रांतिकारी आघाडी आहे.

शेतकऱ्यांचा जन्म पायदळी तुडवले जाण्यासाठी नाही. दुसरा काही आधार नसलेल्या ग्रामीण जनसमाजाला संघटित करण्याचा 'शेतकरी संघटना' हा प्रयत्न आहे असा त्यांचा दावा आहे.

राजकीय नेतृत्व आपल्या चळवळीपासून दूर ठेवण्याचे कारण ते सांगतात, 'जनसामान्यांचे नेतृत्व त्यांनी दूरदर्शीपणाने करायचे ते लोकप्रतिनिधी नव्हा, खनिज द्रव्यावर केवळ सवंग लोकप्रियतेसाठी आपापल्या प्रदेशाचा हक्क सांगतात. राष्ट्राच्या प्रवाहाला वेग नाही हा याचा अर्थ. निवडणुकांमुळे राष्ट्रीय प्रवाहाला वेग येतो हे म्हणणेही खोटे. एकदा निवडणुका संपल्या की शहरी उद्योगधंदे व त्यांचे दलाल सगळया राजकारणाचा ताबा घेतात. नोकरशाही व व्यापारी–दलालच राज्याचे नियंत्रण करतात. नाव कोणत्याही पक्षाचे असो, राज्य दलालांचेच असते.'

म्हणून शरद जोशी यांनी आपली शेतकरी संघटना राजकीय नेतृत्वाच्या कक्षेपासून कटाक्षाने दूर ठेवली आहे. गेल्या तीस-बत्तीस वर्षांत राजकीय पक्षांना शेतकऱ्यांचे दैन्य घालवता आले नाही. तेव्हा आम्हाला प्रयत्न करू द्या. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी कोणते मार्ग अनुसरायचे ते शेतकऱ्यांनाही एकदा ठरवू द्या, असे त्यांचे म्हणणे आहे. मात्र राजकीय नेत्याबाबत त्यांना आकस असावा असे दिसत नाही. त्यांच्यातील गुणी कर्तबगार माणसांचे त्यांना साहाय्य हवे आहे ते स्टेजवरील भाषणासाठी नव्हे तर सामान्य कार्यकर्ता म्हणून. □

## मुंबई वार्ता

पृष्ठ ७ वरून

करावी अशी मागणीच नव्हे काय ?

अर्थात विशिष्ट गटाच्या महिलांना यात सहभागी करून न घेता सर्वसामान्य गृहिणींपर्यंत हा प्रश्न पोहचवणे हे बलात्कारविरोधी संघाचे पहिले काम राहील. ※

## □ जिंकलेल्या जागांबाबत तडजोड नाही

—प्रा. राम कापसे

विधानसभेच्या निवडणुकांना आता पुरते दोन महिनेही लागणार नाहीत असे दिसते. या संदर्भात विविध पक्षोपपक्षांच्या हालचाली सुरू झालेल्या दिसतात. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत पराभव पत्करावा लागलेल्या जनता पक्षाची या संदर्भात कितपत तयारी आहे ? त्यांची राजकीय हालहवाल समजावून घेण्यासाठी विसर्जित विधानसभेतील जनता पक्ष प्रतोद व एक प्रमुख आमदार प्रा. राम कापसे यांची भेट घेतली.

विधानसभा निवडणुकासंदर्भात बोलताना ते म्हणाले की, 'ही निवडणूक कशा प्रकारे लढवावी, हे ठरविण्याकरता जनता पक्षाच्या राज्यस्तरांवरील नेत्यांनी गेल्या महिन्यात जिल्हास्तरावर दौरे काढले. हे दौरे पूर्ण झाले असून साधारणपणे कार्यकर्त्यांत तीन प्रवाह दिसतात. एक म्हणजे पक्षाने स्वतंत्रपणे निवडणूक लढवावी, दुसरा म्हणजे जिल्हास्तरावर जागासंदर्भात समविचारी पक्षांशी तडजोड करण्यात यावो व तिसरा म्हणजे इंदिरा कॉंग्रेसच्या विरोधात एकास एक उभा करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात यावा ! हे मत वा हे प्रवाह केंद्रीय कार्यकारणीच्या बैठकीत मांडण्यात येणार आहेत.'

समांतर कॉंग्रेस अर्स कॉंग्रेसमध्ये विलीन झाल्याने काही प्रश्न उद्‌भवणार नाही असेही त्यांनी सांगितले. त्यांचे म्हणणे असे की, लोकसभा निवडणुकीआधीच प्रजातंत्र–समांतर व अर्स कॉंग्रेस या तीनही कॉंग्रेस एकत्र आल्या होत्या. आता त्याला फक्त औपचारिक स्वरूप आले इतकेच ! यामुळे 'तडजोडीस' (जागांसंबंधीच्या) बाध येईल असे त्यांना वाटत नाही.

'पुरोगामी लोकशाहीदला'चा प्रश्न आता साहजिकच निघाला. प्रा. कापसेनी सांगितले की, 'जनता'ची केंद्रीय कार्यकारणी जसे सांगेल वा जो निर्णय देईल त्याप्रमाणे 'पुलोद' म्हणून निवडणुका लढवायच्या अथवा नाही हे महाराष्ट्र प्रदेश जनता पक्ष ठरवेल.'

विधानसभा निवडणुका जवळ येऊ लागल्यावर 'डाव्या आघाडीचा' पुन्हा उद्‌घोष चालू झाला आहे. त्या संदर्भातही प्रश्न विचारला. प्रा. कापसेनी सांगितले की, ५२ सालापासूनच्या निवडणुकांत पहिली घोषणा डाव्या आघाडीसंबंधी असतेच; परंतु डाव्या पक्षांना तितकेसे स्थान नसल्याने नंतर हा विचार बारगळतो. डाव्या पक्षांना महाराष्ट्रात विशेष स्थान नाही म्हणून 'डावी आघाडी' यात काही तथ्य नाही. एकंदरीत कापसे यांना डाव्या आघाडीचे बळ विशेष नाही, असे वाटते.

'इंदिरा कॉंग्रेसविरोधी मतांची विभागणी 'न्याय्य' तडजोड झाल्यास टाळली जाईल' असेही श्री. कापसे यांनी स्पष्ट केले. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे गेल्या खेपेची विधानसभा निवडणूक व लोकसभा निवडणूक यांच्या आधारावर योग्य जागावाटप झाल्यास एकास एक उमेदवार उभा राहू शकेल.

श्री. कापसे यांच्या म्हणण्याप्रमाणे लोकसभा निवडणुकीनंतर जनता पक्षातून विशेष पक्षांतर झालेले नाही. हे स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, समांतर कॉंग्रेसमधून वा पुलोदमधून एखाद्याने दिलेला राजीनामा व केलेला कॉंग्रेस ( इं ) प्रवेश म्हणजे 'जनता' पक्षातून कोणी बाहेर पडले असे नव्हे. खुद्द जनता पक्षातून अर्जुनराव कस्तुरे व इसाक जमलानावाला व काही मोजकीच मंडळी बाहेर पडली. हे सांगून त्यांनी 'कॉंग्रेस ( इं ) कडे लोकांची रीघ लागली आहे' वगैरे विधाने ही नीट समजून घेऊन केली जात नाहीत हे स्पष्ट केले.

या मुलाखतीत प्रा. राम कापसे यांनी एक महत्त्वाची गोष्ट स्पष्ट केली ती म्हणजे लोकसभा निवडणुकीत ज्याप्रमाणे पूर्वी जिंकलेल्या १६ जागा जनता पक्षाने लढवल्याच होत्या, त्याचप्रमाणे गेल्या विधानसभा निवडणुकीत 'जनता पक्षाने' जिंकलेल्या १०० च्या आसपास. जागांविषयी तडजोड संभवत नाही, त्यांचे हे म्हणणे म्हणजे जागावाटप करताना वारे कोणत्या दिशेला वाहतील याचा अंदाजच होय.

'आम्ही पूर्वी जिंकलेल्या जागात आमचे कार्यकर्ते प्रचारासही लागले आहेत,' हेही त्यांनी स्पष्ट केले. केंद्रीय अर्थसंकल्प नुकताच साजरा झाला असल्याने तो विषय मुलाखतीत येणे अपरिहार्य होते. त्याविषयी बोलताना श्री. कापसे म्हणाले की, 'करवाढ वा कर्जपुरवठा यापैकी कोणत्याही मार्गाने जरी अंदाजपत्रकातील तूट भरून काढण्याचा सरकारने प्रयत्न केला तरी त्याचा बोजा किमतीवर पडणार आहे व भाववाढ होणारच आहे. या होणाऱ्या भाववाढीचा प्रश्न आम्ही विधानसभा निवडणुकीच्या वेळी लोकांसमोर आग्रहाने मांडू !'

एकंदरीत पाहता होणाऱ्या भावभाढीचा इशारा आपल्या निवडणूकप्रचारात जनता पक्ष जरूर देईल असे वातावरण आहे. 'बाबू जगजीवनराम यांच्या पक्ष बदलाने महाराष्ट्र जनता पक्षावर कोणताही परिणाम होणार नाही!' असेही प्रा. कापसे म्हणाले. याचे कारण स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, 'बाबूजींच्या सी. एफ. डी. चे जे आमदार बी. ए. देसाईंसारखे अनुयायी होते, त्यांनी बहुगुणांबरोबरच पक्षत्याग करून आपला मार्ग मोकळा केला होता. आता आणखी विशेष फाटाफूट होईल असे दिसत नाही !'

देशाच्या राजकीय रंगमंचावर गेली तीन वर्षे सतत गाजत राहिलेला दुहेरी सदस्यत्वाचा प्रश्नही बोलण्याच्या ओघात निघाला. प्रा. कापसे यांचे म्हणणे या संदर्भात स्पष्ट दिसले. 'जनता पक्षाचे नेते शिवाजी शिंदे व खा. मधू दंडवते इत्यादींना हा प्रश्न अजूनही शिल्लक आहे असे वाटते; परंतु त्याचबरोबर या जनसंघेतर नेत्यांना तो प्रश्न निवडणुकीच्या वेळेसच धसास लावण्याची घाई होणार नाही' असे प्रा. कापसे म्हणाले. त्यामुळे निवडणुकीच्या वेळेस दुहेरी सदस्यत्वाचा प्रश्न येणार नाही, असे त्यांचे मत !

पक्षाच्या तिकिटवाटपसंदर्भातही त्यांनी खुलासा केला. 'सर्वच माजी आमदारांना 'टर्म' पूर्ण केली नाही म्हणून तिकिटे मिळतील.' असे प्रा. कापसे यांना वाटत नाही; 'परंतु तिकीट परत न मिळालेल्यांची संख्या थोडी असेल,' असेही ते म्हणाले.

मनमोकळेपणे पार पडलेल्या या मुलाखतीतून तरी लोकसभा निवडणुकीच्या धक्क्यातून जनता पक्ष सावरला आहे असे प्रतीत होत होते; परंतु सर्वसाधारणपणे अर्स कॉंग्रेसप्रमाणेच तोही येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत 'एकला चलो रे' या भूमिकेचा आग्रह धरेल असे दिसते. एकूण राजकीय नाट्यास पुन्हा सुरुवात झाली आहे. विधानसभा-बरखास्तीने 'नांदी' झाली आहे. निवडणूक-प्रचार ही पहिल्या प्रवेशाची सुरुवात असेल ! □

## चित्रपट

सदानंद बोरसे

# खंजर

एक अतिशय मोठा उद्योगपती होता. त्याला एकुलता एक मुलगा होता. त्या मुलाने त्याच्या पाचव्या वाढदिवशी वडिलांकडे एक हिरवा पिंगपाँगचा चेंडू मागितला – त्याच्या वडिलांनी त्याला सांगितले, 'बेटा आपल्याकडं एवढा पैसा आहे. दौलत आहे आणि तू साधा पिंगपाँगचा चेंडू तोही हिरवा कशाला मागतोस ? मी तुला छानशी आगगाडी आणून देतो.' असे म्हणून वडिलांनी पोराला एक खेळण्यातील आगगाडी भेट दिली. त्यानंतर दरवर्षी हाच प्रकार होत राहिला. तो मुलगा हिरवा पिंगपाँगचा चेंडू मागायचा आणि वडील त्याला दुसरी काही तरी भेट द्यायचे. अखेर त्या मुलाच्या चोविसाव्या वाढदिवसाला वडिलांनी त्याला एक खरेखुरे विमान भेट दिले. दुर्दैवाने त्यांच्या पंचविसाव्या वाढदिवशी त्या मुलाला त्याच विमानात अपघात झाला. मृत्युशय्येवर पडलेल्या आपल्या पोराला वडिलांनी विचारले, "बेटा, तुला काय हवं ?' पोराने अडखळत 'डॅडी, मला हिरवा पिंगपाँगचा चेंडू पाहिजे.' वडिलांना अतिशय आश्चर्य वाटले आणि ते म्हणाले, 'पोरा, आतापर्यंत प्रत्येकवेळी तू माझ्याकडं हिरवा पिंगपाँगचा चेंडू मागितला आणि दर वेळी मी तुला दुसरंच काही तरी देत आलो. आता मरणाच्या दारातही तू तेच मागतोस, याचं कारण काय ?' तो मुलगा अडखळत सांगू लागला, 'डॅडी, मी तुमच्याकडे पिंगपाँगचा हिरवा चेंडू मागत होतो; कारण – का रण – का ऽ र ऽ –' आणि एवढे बोलून तो मेला.

'विनोद' या नावाखाली असा एक भलामोठा पीळ काही जण मारतात. तशाच प्रकारचा पण त्याहून किती तरी मोठा पीळ 'रहस्यपट' या नावाखाली 'खंजर'मधून मारण्यात आला आहे.

चित्रपटाच्या सुरुवातीला एक काळी गाडी एका वस्तुसंग्रहालयाबाहेर येऊन थांबते. वातावरण काळोखे,. भीतीदायक, धूसर इत्यादी इत्यादी. त्या गाडीतून एक व्यक्ती उतरते. तिचा पोषाख बाकी साधाच; पण एक मोठा ओव्हरकोट आणि नाकापर्यंत ओढून घेतलेली हॅट; त्यामुळे तिला एकदम रहस्यमयपणा वगैरे वगैरे लाभलेला. ती व्यक्ती त्या वस्तुसंग्रहालयाच्या व्यवस्थापकाला–प्रकाशला भेटते, तर दोघांची ओळख निघते. ती व्यक्ती म्हणजे खासगी गुप्तहेर उस्मान. उस्मान आपली एक डायरी प्रकाशला देतो. त्यातून एका खंजिराचा फोटो दाखवतो. उस्मानचा लगेच खून होतो. या डायरीसाठी काही अज्ञात व्यक्ती प्रकाशच्या मागे लागतात. त्या डायरीत 'उदय का गढ, ड्रॉइंग का मास्टर, राजा की मंडी' असे तीन परवल लिहिलेले असतात. त्यापैकी उदय का गढ प्रकाश शोधून काढतो, त्या ठिकाणी थोडी मारामारी आणि दरम्यानच्या काळात पाच-सात खून होऊन एकदम सिनेमा संपतोच. तो खंजीर, ड्रॉइंग का मास्टर, राजा मंडी सगळे एकदम हिरवा पिंगपाँगचा चेंडू बनून जाते.

गुरुदत्त फिल्म्सच्या बॅनरखाली दत्तारामनीच दिग्दर्शित केलेले मेमसाब, कैद हे रहस्यपटसुद्धा खूपच बरे आणि बरेच डोके वापरून काढलेले होते. मुख्य म्हणजे त्यात जे काय लहान-मोठे रहस्य असेल ते शेवटी कसेबसे का होईना उलगडलेले असायचे; पण 'खंजर'मध्ये कथालेखक राम गोविंद आणि दिग्दर्शक दत्ताराम यांनी रहस्य उकलून न दाखवता ते तसेच कायम ठेवून रहस्यपटांचा हा एक नवीनच प्रकार सुरू केला आहे.

दोन अत्यंत सारख्या दिसणाऱ्या बहिणी हा परवा परवाच 'काली घटा'मध्ये पाहिलेला प्रकार 'खंजर'मध्ये आहेच. (रीना रॉयची दुहेरी भूमिका) शिवाय अत्यंत सारखे दिसणारे बाप व मुलगा अशा दुहेरी भूमिकेत अमजदखानही आहे. आत्यंतिक हिडीस व ओंगळ शारीरिक हालचालींना प्रेक्षकांना हसवू इच्छिणारे मेहमूदमियाँ आहेत. (संपूर्ण चित्रपटात सुसह्य होतो तो एकटा नवीन निश्चल.) याशिवाय जी दाखविल्याशिवाय रहस्य निर्माणच होत नाही, अशी पडकी खिंडारे, त्यात घुमणारे गाणे, फिरणारी स्त्री इत्यादी नेहमीचे भानामतीचे खेळही 'खंजर'मध्ये पाहायला मिळतातच; पण मेंदूचे ऑपरेशन करून लोकांना वेडे बनविण्याचा एक जेम्स बाँडी प्रकारही आयात करून मांडून ठेवला आहे. एवढी सगळी मांडामांड करूनही अखेर मूळ रहस्य उलगडत नाही ते नाहीच. ☐